

महाराष्ट्राचे जिल्हे

कोल्हापूर

महाराष्ट्राचे जिल्हे

कोल्हापूर

किंमत २५ नये पैसे

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि विभागाचें प्रकाशन

अनुक्रमणिका

कोल्हापूर जिल्हा

१. परिचय

दख्खन देशांत एकेकाळीं जिथें शौर्याची शर्थ झाली, कीर्तीच्या नौबती झडल्या, पराक्रमाची परमावधि झाली, रणशिंगांनी दऱ्या खोरीं दुमदुमून गेली, धर्मनीतीच्या स्वराज्याचे निशाण डौलानें फडकलें, स्वामिनिष्ठा शिगेला पोचली, सह्याद्रीच्या सौंगड्यांच्या सामर्थ्यानें सीमा ओलांडली, वीरांनीं वैभव वाढविलें, आणि बुद्धीनें बहादूरी गाजविली, तो महाराष्ट्राचा मानबिंदू म्हणजे कोल्हापूर. महाराष्ट्राचें आराध्यदैवत स्वराज्यसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शानें पावन झालेली ही मंगल भूमी. त्या महान् राष्ट्रपुरुषाच्या अलौकिक कर्तृत्वानें निर्माण केलेला अमर इतिहास ही कोल्हापूरची प्रेरणा आणि परंपरा.

दिव्य परंपरा

महाराष्ट्राच्या पश्चिम बाजूला पौराणिक कालापासून अनेक ऋषिमुनींच्या व लाखों भाविकांच्या श्रद्धेला पोसणारें दक्षिण काशी या नांवानें संबोधलें जाणारें कोल्हापूर हें तीर्थस्थान सुमारें १८०० वर्षांची धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जतन करीत आहे. येथील महालक्ष्मीचे (अंबाबाई) भव्य आणि सुंदर हेमाडपंती पद्धतीचें देवालय म्हणजे प्राचीन शिल्प कौशल्याचा उत्कृष्ट नमुना आहे. श्री अंबाबाई आणि येथून बारा मैलावर असलेले केदारलिंग (जोतीबा) या दोन जागृत दैवतांनी महाराष्ट्रांतील आणि बाहेरील कोट्यावधी लोकांना कोल्हापूरचा परिचय करून दिला आहे. चालुक्य, सिंधन, शालीवाहन इत्यादि राज्यांचा इतिहास या भागानें पाहिलेला आहे. स्वराज्य संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांनी फार परिश्रमानें आणि अतुल पराक्रमानें संपादन केलेल्या स्वराज्यांतील एक अवशेष म्हणून श्री ताराराणीनें स्थापन केलेलें कोल्हापूरचें हें छोटें राज्य संस्थानाच्या रुपानें भारतीय स्वातंत्र्यकालापर्यंत अस्तित्वांत होतें. संस्थानांच्या विलीनीकरणानंतर कोल्हापूर हें मुंबई राज्यांतील एक घटक म्हणून नांदू लागलें. कोल्हापूरचा परिचय म्हणजें येथील कला, कारागिरी, शिक्षण, साहित्य, संगीत आणि क्रीडा इत्यादि क्षेत्रांतील श्रेष्ठ परंपरेची ओळख. कै. छत्रपती शाहू महाराज यांच्या दूरदर्शी, ध्येयवादी आणि उदार धोरणानें स्थापन झालेल्या शैक्षणिक संस्था आणि त्यांच्या आश्रयानें वाढलेली कला आणि क्रीडा या गोष्टी कोल्हापूरचें खास वैशिष्ठ्य दाखवितात. इतिहासाचा थोर वारसा, धार्मिक उच्च

अधिष्ठान, निसर्ग सौदर्यांचीं संपन्नता, कुशल कारागिरांनी कमावलेली कीर्ति, समाज सुधारकांची कष्टपूर्ण कामगिरी,त्यागपूर्ण जीवन कंठणाऱ्या थोर लोकांची साधना अशा अनेक गोष्टींचा सुंदर संगम म्हणजे कोल्हापूर. कोल्हापूरच्या आकर्षणामध्यें करवीरवासिनी महालक्ष्मी,वाडी रत्नागिरीचा जोतीबा, नरसोबावाडीचे दत्त मंदिर, पंचगंगा घाट, बाहुबली हीं तीर्थस्थानें, . . . पन्हाळा, रांगणा, विशाळ गड, भुदरगड, सामानगड, नेसरीची खिंड, पावनखिंड, हीं ऐतिहासिक स्थळें,राधानगरी, गगनबावडा आंबा, ही निसर्गरम्य ठिकाणें, प्रगतीचे द्योतक असलेले सहकारी साखर कारखाने, शिवाजी उद्यम नगर, इचलकरंजीची औद्योगिक वसाहत, कोल्हापूर शहरांतील रंकाळा तलाव, राजवाडे, उद्यानें, इत्यादि सौंदर्य स्थळें, शैक्षणिक संस्थांच्या भव्य इमारती यामुळें विशेष भर पडली आहे. पूर्वीच्या कोल्हापूर संस्थानचा आता कोल्हापूर जिल्हा बनला आहे.

स्वाभाविक रचना

पश्चिमेला रत्नागिरी जिल्हा, उत्तरेला सांगली जिल्हा, दक्षिणेला व पूर्वेला म्हैसूर राज्याचा प्रदेश यांच्या सरहद्दीनी मर्यादित केलेल्या या जिल्ह्यांत शिरोळ, हातकणंगले, करवीर, कागल, शाहूवाडी, राधानगरी, गडहिंग्लज, भुदरगड आणि राज्य पुर्नरचनेनंतर १ नोव्हेंबर १९५६ रोजीं या जिल्ह्यांत समाविष्ट करण्यांत आलेला बेळगांवचा चंदगड तालुका असे एकूण नऊ तालुके व आजरा, गगनबावडा, व पन्हाळा हे तीन महाल आहेत. रेखांश १५–३० आणि १५–४५ ते १७–० आणि १७–१५ यांमध्यें व अक्षांश ६९–३० आणि ६९–४५ ते ७०–३० व ७०–४५ मध्यें येतो. या जिल्ह्याचा पश्चिम भाग सह्याद्री पर्वताची मुख्य रांग व छोटचा छोटचा अनेक फाटचांनीं व्यापलेला आहे. कोल्हापुरचा कोंकणाशी संबंध जोडणारे अंबा, फोंडा व अंबोली हे तीन घाटांचे रस्ते सह्याद्रीच्या माथ्यावरून रत्नागिरी जिल्ह्यांत उतरतात. गगनबावडा महालांतील ३९ गांवें सह्याद्रि पर्वताच्या पश्चिम पायथ्याला वसलेली आहेत. तो भाग तळकोंकण म्हणून ओळखला जातो. बावडा घाट फोडून तळकोंकण दळणवळणाच्या दृष्टीनें कोल्हापूरला जोडण्याचे प्रयत्न हल्ली चालू आहेत. पश्चिमेकडील पहाडी प्रदेश सोडला तर इतर भागांतील भूपृष्ठाची समुद्रसपाटीपासूनची उंची सामान्यपणें १२०० ते २००० फुटांपर्यंत येते.


पर्जन्यमान

सह्याद्रीमुळें बावडा, शाहूवाडी वगैरे पश्चिम भागांत पावसाचें प्रमाण अतिशय म्हणजे ३०० इंचांपर्यंत आहे. नैॠत्य मान्सून वाऱ्यापासून मिळणारा पाऊस पूर्वेकडे कमी कमी होत जातो. कांहीं ठिकाणी फक्त ४० इंच किंवा त्याहूनहि कमी पाऊस पडतो. पर्जन्यमानाची विविधता अगदीं थोडचाथोडचा अंतरावर दिसून येते. बावडा महाल, शाहूवाडी, राधानगरी, चंदगड या तालुक्यांतील पावसाचें प्रमाण पन्हाळा, भुदरगड, कागल या तालुक्यांत दिसून येत नाहीं. करवीर तालुक्याचा पूर्व भाग, हातकणंगले व शिरोळ या भागांत पावसाचें प्रमाण अगदी कमी कमी होत जाते. समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्यांना ज्या ठिकाणी सह्याद्रीचा अडथळा येतो तेथे पाऊस स्वाभाविकपणें जास्त पडतो.

हवामान

या जिल्ह्याचें हवामान सौम्य, थंड व समशीतोष्ण आहे. पश्चिमेकडील डोंगराळ भागांत दाट झाडीमुळें व पावसाचें प्रमाण अधिक असल्यामुळें त्या भागांतील हवा पावसाळचांत दमट व उन्हाळचांत थंड असते. मार्च ते जून हा उन्हाळचाचा मोसम असतो. मे आणि जून या महिन्यांत कमाल उष्णतामान सरासरी ९२ते ९७फॅ. व किमान उष्णतामान ६७ ते ७० फॅ. इतके असते. जून ते ऑक्टोबर हा पावसाळी मोसम असून पश्चिम भागांत या वेळीं ७० फॅ. इतके उष्णतामान राहते. जानेवारी महिन्यांत कडाक्याची थंडी भासते. या मोसमांत किमान उष्णतामान सरासरी ५२ ते ५५ फॅ. व कमाल उष्णतामान ८२ ते ८७ फॅ. पर्यंत असते.

स्वाभाविक रचना



जिल्ह्याचें एकूण क्षेत्र २०,२०, ४३८ एकर आहे. शाहूवाडी, बावडा, राधानगरीचा कांहीं भाग व चंदगडचा बराच भाग जंगल पर्वतानी व्यापलेला असल्यामुळें जमीन चढउताराची आहे. या भागांत प्रामुख्यानें कुरुंदाचे खडक आढळतात. डोंगराच्या उतारावरील जमीन अगदीं निकस आहे. भात–नाचणीचे पीक येऊं शकेल असाच जमिनीचा मगदूर आहे. सह्याद्रि पर्वतामध्यें उगम पावून पूर्वेकडे वहात जाणाऱ्या नद्यांच्या कांठची जमीन कसदार आहे. चंदगडचा कांहीं भाग, राधानगरीचा थोडा भाग व आजरा या भागांतील जमीन तांबडमातीची आहे. करवीरच्या पूर्व बाजूला बराच मोठा टापू काळ्या जमिनीनें व्यापलेला आहे. कांहीं भाग डोंगराळ व माळरानाचा आहे. पूर्वेकडील तालुक्यांत सपाट भूपृष्ठ दिसत असले तरी जिल्ह्याचा पश्चिम भाग पर्वत डोंगर–टेकड्यांनीं व्यापलेला आहे. जास्त पावसामुळें तिकडे दलदलीचे टापूहि निर्माण झाले आहेत. डोंगराच्या चढणीमुळें बऱ्याच ठिकाणी घाटाचे रस्ते करावे लागले आहेत. मुरमाच्या जमिनीतहि मुबलक पाणी पुरवठ्यानें आतां ऊंसाचे पीक काढले जाते.

भूभाग

कोल्हापूर जिल्ह्यामध्यें एकूण १०९९ गांवें असून त्यापैकीं १९ मोठीं गांवें आहेत. कोल्हापूर हें एकच शहर आहे. १९६१ च्या खानेसुमारीप्रमाणें जिल्ह्याची लोकसंख्या १५,९८,४०० आहे. यांत ८,१३, ३७२ पुरुष व ७,८५,०२४ स्त्रिया असून त्यांपैकी ३,२४,६३० पुरुष साक्षर आणि ९४,३५१ स्त्रिया साक्षर आहेत.

लोकसंख्या

दृष्टिक्षेपांत कोल्हापूर जिल्हा

लोकसंख्या		१५,९८,४००(१९६१)
क्षेत्रफळ	:	२९०० चौरस मैल.
तालुके	:	९ महाल : ३
गांवें	:	१०९७ (शहरें व मोठीं गांवें : १९, खेडीं: १०७८)
नगरपालिका	:	१० :
ग्रामपंचायती :		६४८
लागवडीलायक क्षेत्र	:	२०,७४८६ : एकर
लागवडी खालील क्षेत्र	:	९९९,४५४ एकर
जंगलाखालील क्षेत्र	:	३,७८,१०५ एकर
प्रमुख पिकें	:	भात, ज्वार, भुईमूग, ऊंस, नागली.
सहकारी संस्था	:	१४५६
त्यांतील सभासद	:	२ लाखाच्या वर, शेअर भांडवल : ९० लक्षांवर
महाविद्यालयें	:	७
अध्यापक विद्यालयें	:	६६
धंदेशिक्षण संस्था	:	१
माध्यमिक शाळा	:	१५७
प्राथमिक शाळा	:	१४५७
रजिस्टर्ड मॉंटेसरी स्कूल्स	:	१६
दवाखाने : सरकारी	:	१८, लोकलबोर्डाचे ३०
प्राथमिक आरोग्य केंद्रें	:	१५
पोस्ट व तार ऑफिसेस	:	२४

सब पोस्ट ऑफिसेस	:	३४
ब्रँच पोस्ट ऑफिसेस	:	२२१

पोस्टांत टेलिफोन व्यवस्था असलेलीं गांवें : २१

शहरांतील टेलिफोन्स : (१) कोल्हापूर ७०० (२) इचलकरंजी २०० (३) गडहिंग्लज ५० (४) जयसिंगपूर ५०.

एस. टी. मार्ग	:	२०४	(सबंध डिव्हिजन)
एस. टी. गाड्या	:	२०२	(सबंध डिव्हिजन)

पब्लिक ट्रस्ट ॲक्टखालीं नोंदलेल्या संस्था १८६४

अल्पबचत (१९६०–६१) ४१ लाख रुपये

विद्युत् पुरवठा झालेलीं गांवें ९५

सहकारी बँका	:	५३
ऑईल मिल्स	:	११
कापड गिरण्या	:	१
साखर कारखाने	:	४
ऑईल इंजिनचे कारखाने	:	८६
प्रमुख बाजारी पेठा	:	कोल्हापूर, वडगांव, जयसिंगपूर, इचलकरंजी, गडहिंगलज, मलकापूर.
निर्यात माल	:	गूळ, साखर, ऑईल इंजिन्स, तंबाखू, चांदीचे दागिने.
वैशिष्टयपूर्ण गोष्टी	:	इचलकरंजीचीं पातळें, कोल्हापुरी वाहाणा, चांदीचे दागिने,
फॅक्टरीज	:	३०२

२. ऐतिहासिक पार्श्वभूमि

छत्रपतींच्या गादीचा वारसा आणि भूतपूर्व कोल्हापूर संस्थानची राजधानी अशी ऐतिहासिक उज्ज्वल परंपरा, दक्षिण काशीचें धार्मिक महात्म्य, कला, क्रीडा, शिक्षण, विद्या, उद्योग आणि नैसर्गिक सुबत्ता यांमुळें प्राप्त झालेलें वैशिष्ठ्यपूर्ण स्थान अशा अनेकविध पैलूंनीं मंडित झालेल्या करवीर नगरीचें सुरेख कोंदण म्हणून कोल्हापूर जिल्हा अखिल महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे.

ज्या अंबाबाईच्या प्राचीन देवस्थानामुळें कोल्हापुरास दक्षिण काशी म्हणून धार्मिक महात्म्य प्राप्त झालें आहे, त्या देवस्थानाइतकाच कोल्हापूरचा इतिहासहि प्राचीन आहे. महाराष्ट्रामध्यें अत्यंत पुरातनकालीन अशी जीं कांहीं देवस्थानें आहेत त्यांत कोल्हापूरचें अंबाबाईचें देवस्थान हे सर्वांत जुनें देवस्थान गणलें जातें. सुमारें दीड हजार वर्षांपूर्वी म्हणजे इ. स. ६३४ च्या सुमारास चालुक्य राजा कर्णदेव यानें महालक्ष्मीचें मंदिर बांधून त्यांत मूर्तीची प्रतिष्ठापना केली. कोल्हापूरचा इतिहास या मंदिराशी निगडित आहे.

तीन कालखंड

कोल्हापूरच्या इतिहासाचें अवलोकन केल्यास कालानुक्रमें साधारणतः त्याचे तीन कालखंड पडतात. प्राचीन हिंदु राज्यकर्त्यांचा इ० स. १३४७ पर्यंतचा काल, त्यानंतर मुसलमान राज्यकर्त्यांचा इ० स. १७०० पर्यंतचा काल आणि त्यानंतरचा मराठी राज्याचा काल.

कूरवीर

कांहीं शिलालेख, दंतकथा व पुराणें यांच्या रूपानें कोल्हापूरचा प्राचीन इतिहास आजहि आपल्याला उपलब्ध होऊ शकतो. पुराणांत या प्रदेशाचा कूरवीर असा उल्लेख आढळतो. कारण महालक्ष्मी ही देवी या स्थानास महापुराच्या पाण्यापासून आपल्या गदेनें (कूर) वांचवीत होती. या भागाच्या जवळपास असलेल्या एका टेकडीवर कोल्हापूर नांवाच्या राक्षसाचा वध झाला तेव्हांपासून या भागास कोल्हापूर नांव पडलें, असें दुसरी एक दंतकथा सांगते. गुजरातचे प्रसिद्ध जैन लेखक हेमचंद्र यांच्या काव्यात, हेमाद्रीच्या चतुर्वर्ग चिंतामणि ग्रंथांतील विश्वकर्म शास्त्र, सरस्वती पुराण यांमध्यें कोल्हापूरचा व कोल्हापूरच्या महालक्ष्मीचा उल्लेख आढळतो. जैन वाङमयांतील हरिसेन रचित बृहत् कथाकोशांत दहाव्या शतकांतील लोककथेशीं कोल्हापूरचा संबंध दाखवला आहे. त्यावरून त्या आधी निदान दोन शतकें तरी हें शहर त्या नांवानें ज्ञात असावें. कोल्हापूर शहर ज्यापासून विस्तारीत झालें तें मूळ गांव पंचगंगे कांठच्या टेकडीवर वसलेलें होतें व ब्रह्मपुरी या नांवाने तें ओळखलें जातें. साधारणतः २॥ ते ३ हजार वर्षांपूर्वी कोल्हापूर शहराच्या आसपास म्हणजे नर्मदेपासून

भारताच्या दक्षिण टोंकापर्यंत आंध्रभृत्य राजे राज्य करीत असावेत. त्यानंतर कदंब, चालुक्य, राष्ट्रकू-शिलाहार, देवगिरीचे यादव या राजकर्त्यांच्या आधिपत्याखालीं हा प्रदेश असावा.

यादवांच्या नंतर हा प्रदेश मुसलमानी राजवटीखालीं गेला. पुढें १४९८ मध्यें बहामनी राज्याकडून हा प्रदेश विजापूरकडे गेला. पुढें १६७३ मध्यें शिवाजी महाराजांनीं सिद्दी जोहरच्या ताब्यांत गेलेला पन्हाळा परत मिळविला आणि नंतर दोन वर्षांनीं १६७५ मध्यें कोल्हापूर काबीज केलें. १७०८ मध्यें ताराबाईनें राजधानीचें ठिकाण कोल्हापूर येथें आणलें. तोपर्यंत पन्हाळा हेंच मराट ठ्यांचें राजधानीचें ठिकाण होतें. १७०८ ते १९४८ पर्यंत कोल्हापूरचे राजसिंहासन भूषविणाऱ्या सर्व छत्रपतींनीं आपापल्या परीनें कोल्हापूर संस्थानच्या कीर्तींत भर घातली आणि प्रजेच्या उन्नतीसाठीं व सुखसोयींसाठीं सदैव प्रयत्न केले. १९४८ मध्यें इतर संस्थानांप्रमाणेंच कोल्हापूर संस्थानहि भारतीय संघराज्यांत विलीन झालें.

कोल्हापूरचे प्रजादक्ष छत्रपति राजर्षि शाहू महाराज

छत्रपति शिवाजी महाराजांच्या घराण्यांतील अत्यंत क्रांतिकारी विचारांचा आणि कृतीचा राजा म्हणून ज्यांचा उल्लेख करावा लागेल आणि सामाजिक सुधारणा व अस्पृश्यता निवारण या बाबतींत अत्यंत मोलाची कामगिरी करणारा समाजोद्धारक राजा म्हणून ज्यांचा अभिमानानें निर्देश करता येईल असे राजर्षि छत्रपति शाहू महाराज हेच होत.

कोल्हापूरच्या गादीवर राजर्षि शाहू महाराज विराजमान झाले ही घटना कोल्हापूरच्या किंब-हुना महाराष्ट्राच्या जीवनाचें नवीन पान उघडणारी ठरली. १८८४ ते १९२२ पर्यंतची त्यांची ३८ वर्षांची कारकीर्द महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाला उत्थापनाचें, विकासाचें व जागृतीचें बालामृत देणारी ठरली. दलित समाजाच्या उद्धाराचें व विकासाचें जें चित्र आज आपणांस पहावयास सांपडतें, त्यांचें कांहीं अंशीं श्रेय राजर्षि शाहू महाराजांनाच द्यावें लागेल. आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी त्यांनीं केलेली ही क्रांति सबंध भारताच्या इतिहासात उल्लेखनीय ठरली असें म्हटल्यास अतिशयोक्तीचें होणार नाहीं. महात्मा ज्योतिबा फुल्यांनी महाराष्ट्रांत चालू केलेल्या सत्यशोधक चळवळीला शाहू महाराजांनी सक्रीय सहकार्य केलें. त्या चळवळीच्या अनुषंगानें जातिभेदाला वाव न देतां अस्पृश्योद्धाराचें, दलितांना सवलती देण्याचें व मागासलेल्या जनतेच्या उद्धाराचें कार्य केलें.

राजर्षि शाहू महाराजांनीं आपल्या संस्थानांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें केलें. मागासलेल्या वर्गां-तील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरितां खास सवलती दिल्या. निरनिराळ्या जातींच्या विद्यार्थ्यांसाठीं वसतिगृहें स्थापन केलीं. मागासलेल्या समाजांतील लोकांना सरकारी नोकरींत घेऊन त्यांच्यासाठीं जादा सवलतीचें धोरण ठेवलें. त्यांनीं जनतेला त्वरित न्याय मिळण्याची सोय केली. युरोपियन अधिकाऱ्यांच्या जागांवर हिंदी अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. कोल्हापूर शहराच्या सर्वांगीण सुधारणेचा कार्यक्रम हातीं घेतला. त्यांची राहणी अत्यंत साधी, पण विचारसरणी अलौकिक पुरुषाला साजेशी होती. त्यामुळेंच त्यांना प्रजा राजर्षि म्हणून संबोधते. हे राजर्षि ता. ६ मे १९२२ रोजीं निधन पावले.

राजर्षि शाहू महाराजांनंतर त्यांचें कार्य त्यांचे सुपुत्र राजाराम महाराज यांनीं नेटानें चालविलें. त्यांनीं प्रामुख्यानें शैक्षणिक सुधारणांवर भर दिला. त्यांच्याहि कारकीर्दीतील कोल्हापूरच्या राजकीय सुधा-रणा प्रगतिशील ठराव्यात अशा आहेत. कोल्हापूर नगरपालिका, इलाखा पंचायत (नुकतेच बरखास्त

छत्रपति राजाराम महाराज

झालेलें जिल्हा लोकलबोर्ड), स्वतंत्र हायकोर्ट, वगैरेच्या कामकाजास जोरदार चालना त्यांच्या कारकीर्दीतच मिळाली. त्यांनीं अनेक शिक्षणसंस्थांना मुक्त हस्तानें मदत केली. व अनेक शिक्षणसंस्था स्थापन करण्यास चालना दिली. पुण्याच्या खालोखाल कोल्हापूरला शैक्षणिक केंद्राचा जो दर्जा प्राप्त झाला तो राजाराम महाराजांच्या शैक्षणिक सुधारणांमुळेंच होय. राजर्षि शाहू महाराजांनीं बहुजनसमाजाला आपल्या हक्काबद्दल जागृत केलें. राजाराम महाराजांनीं त्यांना शिक्षणाची दालनें उघडीं करून त्यांच्या भावी विकासाचा मार्ग मोकळा करून दिला.

---

३. शासन व्यवस्था

कोल्हापूर शहर हें कोल्हापूर जिल्ह्याचें शासन व्यवस्थेचें केंद्र आहे. या ठिकाणीं निरनिराळ्या सरकारी खात्यांच्या, निमसरकारी संस्थांच्या व खासगी संस्थांच्या जिल्हा कचेऱ्या आहेत. पूर्वीच्या कोल्हापूर संस्थानाचें राजधानीचें ठिकाण असल्यामुळेंहि या शहरास प्रथमपासून महत्त्व प्राप्त झाले आहे. कोल्हापूर शहराच्या उत्तरेकडील बाजूस नागाळ्यानजिक जिल्हाधिकारी कचेरी असून जिल्ह्याचा महसूल, कूळ कायद्याची अंमलबजावणी, विकास योजना , स्थानिक विकास कामें, वतनें, ग्रामपंचायतींवरील नियंत्रण, धान्यपुरवठा, स्थानिक स्वराज्य संस्था, अल्पबचत, इत्यादि विषयक कारभार येथून केला जातो. जिल्हाधिकारी हेच डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट असल्यानें त्यांच्या कचेरीमार्फत जिल्ह्यांत शांतता व सुव्यवस्था राखणें, बंदूक परवाने देणें, परदेशी जाण्याचे परवाने देणें, गिरण्या, हॉटेल्स, खानावळी चालविण्यास परवाने देणें, करमणुकीच्या कार्यक्रमांस परवाने देणें, वगैरे कामें केलीं जातात. तसेंच जिल्हाधिकारी हेच जिल्हा विकास मंडळ, देवस्थान मंडळ, जिल्हा पंचायत मंडळ, जिल्हा सैनिक मंडळ, पोलीस सल्लागार समिति, जिल्हा समन्वय (co-ordination) समिति, जिल्हा पुरवठा समिति आदि समित्यांचेहि अध्यक्ष असल्यानें सदरहू बाबतींतहि त्यांच्या कचेरीकडून नियंत्रण केलें जातें.

तीन विभाग

कोल्हापूर जिल्ह्याचे पूर्वी उत्तर भाग व दक्षिण भाग असे प्रांत ऑफिसचे दोनच विभाग होते. पण ऑगस्ट १९६० पासून या जिल्ह्याचे तीन विभाग पाडण्यांत आले आहेत. सदरचे विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालीं असलेले तालुके वा महाल खालीलप्रमाणें आहेत.

अ. नं.	विभागाचें नांव	तालुके व महाल
१.	करवीर विभाग	करवीर, हातकणंगले, शिरोळ व कागल
२.	शाहूवाडी विभाग	शाहूवाडी, पन्हाळा, बावडा व राधानगरी.
३.	गडहिंग्लज विभाग	गडहिंग्लज्, भुदरगड, चंदगड व आजरा.

करवीर व शाहूवाडी या दोन विभागांच्या प्रांत अधिकाऱ्यांचीं कार्यालयें कोल्हापुरांत जुना राजवाडा इमारतींत आहेत व गडहिंग्लज विभाग प्रांत अधिकाऱ्यांचें कार्यालय गडहिंग्लज् येथें आहे. आपल्या विभागांतील मामलेदार व महालकरी कचेऱ्यांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याचें कार्य प्रांताधिकारी कर-

तात. तसेंच कूळ कायदा, वेतन, वगैरे संबंधीचे दावे या अधिकाऱ्यांपुढें चालतात. प्रांताधिकारी सबडिव्हिजनल मॅजिस्ट्रेट म्हणूनहि काम करतात.

तालुक्याचे मामलेदार व महालाचे महालकरी हे जमीन महसूल, कूळ कायद्याची अंमलबजावणी, जमिनीची हक्कनोंदणी, पिकांची आणेवारी, जन्ममृत्यु नोंदणी, इत्यादि कामें पहातात. कूळ कायद्याखालील प्रकरणें वाढल्यामुळें सध्यां एकेका तालुक्यास एकाहून अधिक ॲडिशनल मामलेदारांच्या व महालकऱ्यांच्य नेमणुका झालेल्या आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यांतील सर्व तालुके व महाल विकास योजनेच्या कार्यक्रमाखालीं आलेले असून प्रत्येक तालुक्यास वा महालास एकेक गट विकास अधिकारी नेमण्यांत आलेले आहेत. ग्रामीण जनतेचा सर्वांगीण विकास करण्याचें कार्य या अधिकाऱ्यांच्याकडून केलें जातें. शेती, शिक्षण, बांधकाम, सहकार, पंचायत, आरोग्य, पशुसंगोपन या खात्यांचे अधिकारी विकासाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं कामें पहात असतात.

जिल्हा शेतकी अधिकारी

जिल्हा शेतकी अधिकारी, कोल्हापूर यांची कचेरी कोल्हापूर येथें लक्ष्मीपुरींत पूर्वीच्या कोल्हापूर बँकेच्या इमारतींत आहे. त्यांच्या कचेरीमार्फत सुधारक शेतीसंबंधीं प्रचार, खत व बियाणाचें वांटप, पीक स्पर्धा, कीड-प्रतिबंधक उपाययोजना, धूप प्रतिबंधक उपाय योजना वगैरे शेती सुधारणेचें कार्य केलें जातें. विकास योजनेच्या क्षेत्रांत शेती अधिकारी नेमलेले असतात. त्याशिवाय या खात्यामार्फत काम पहाणारे शेती अधिकारी व शेती मदतनीस जिल्ह्यांत कांहीं ठिकाणीं आहेत.

सहकारी विभागाचे प्रमुख

जिल्ह्याचे सहकारी विभागाचे प्रमुख "डेप्युटी रजिस्ट्रार ऑफ को–ऑपरेटिव्ह सोसायटीज," यांची कचेरी बिंदु चौकानजीक आहे. सहकारी संस्था नोंदणें, त्या तपासणें त्यांच्या कार्यपद्धतीवर देखरेख ठेवणें, त्या कार्यक्षम करणें अशीं कामें या कचेरीकडून केलीं जातात.

आरोग्य अधिकारी

जिल्हा आरोग्य अधिकारी यांची कचेरी राजारामपुरींत आहे. जिल्ह्यांतील आरोग्य रक्षण करण्याच्या दृष्टीनें दक्षता घेणें, रोगप्रतिबंधक लस टोंचणें, सांथीच्या रोगाविरुद्ध प्रतिबंधक इलाज करणें, प्राथमिक आरोग्य केंद्रावर देखरेख ठेवणें, दूध वांटप केंद्रें चालविणें, कुटुंबनियोजन केंद्रें चालविणें वगैरे कामें या कचेरीमार्फत केलीं जातात.

शिक्षणाधिकारी

जिल्हा शिक्षणाधिकारी यांची कचेरी राजारामपुरींत आहे. त्यांचेमार्फत प्राथमिक व माध्यमिक शाळांची तपासणी करणें, अभ्यासक्रमासंबंधीं सल्ला देणें, शाळांना विविध योजनांखालीं आर्थिक मदत देणें, शिष्यवृत्ति देणें इत्यादि कामें केलीं जातात. जिल्हा स्कूल बोर्ड अध्यापक विद्यालयें यांवरहि त्यांची देखरेख असते.

डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर

डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर, कोल्हापूर यांची कचेरी बिंदू चौकानजिक असून त्यांचे मार्फत जंगलवाढीच्या योजनांची अंमलबजावणी, वृक्ष–संवर्धन, वृक्ष–संगोपन, जंगल–संरक्षण हीं कामें केलीं जातात.

एक्झिक्युटिव्ह इंजिनियर

एक्झिक्युटिव्ह इंजिनीयर (रस्ते व इमारती) कोल्हापूर यांची कचेरी नवीन राजवाड्यानजिक असून त्यांचे मार्फत रस्ते, इमारती, बंगले, वगैरे कामें केलीं जातात. याशिवाय ठिकठिकाणचे इन्स्पेक्शन बंगले, कोल्हापूरचें सर्किट हाऊस ट्रॅव्हलर्स बंगला, पन्हाळ्यावरील हॉलीडे कॅम्प्स यांचे रिझर्व्हेशनहि या कचेरींतून केलें जातें.

एक्झिक्युटिव्ह इंजिनीयर, (इरिगेशन डिव्हिजन) कोल्हापूर यांची वेगळी कचेरी नुकतीच स्थापन झाली असून ती ताराबाई पार्कनजीक आहे. जिल्ह्यांतील छोटया-मोठया तलावांचीं कामें, बागायत, शेतीसाठीं पाण्याचें वांटप, बंधारे, धरणें बांधणें वगैरे कामें या कचेरीमार्फत केलीं जातात.

समाज कल्याण

जिल्हा समाज कल्याण अधिकारी, कोल्हापूर यांची कचेरी लक्ष्मीपुरींत असून यांचे कचेरीमार्फत मागासलेल्या वर्गाच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं नानाविध योजना राबविल्या जातात. तसेंच फीची सवलत, वसतिगृहांना आर्थिक मदत देणें, नाटय–संगीत–तमाशा आदि सांस्कृतिक महोत्सव साजरे करणें व अशा संस्थांना मदत देणें हीं कामें केलीं जातात.

लेबर ऑफिसर

गव्हर्मेंट लेबर ऑफिसर कोल्हापूर यांची कचेरी जुन्या राजवाडयांत आहे. त्यांच्यामार्फत कामगार वर्गाचें हित पाहणें, मालक-मजूर तंटयांत मध्यस्थी करणें इत्यादि कामें केलीं जातात.

एम्प्लॉयमेंट ऑफिसर

जिल्हा एम्प्लॉयमेंट ऑफिसर, कोल्हापूर यांची कचेरी राजाराम कॉलेज ते बिंदू चौक या रस्त्यावर असून यूथ एम्प्लॉयमेंट विभागहि येथेंच आहे. या कचेरीमार्फत बेकारांची नोंद ठेवून त्यांना योग्य तो रोजगार व नोकरी मिळवून देण्याच्या दृष्टीनें मार्गदर्शन केलें जाते.

सुपरिंटेंडेंट ऑफ प्रोहिबिशन अँड एक्साईज कोल्हापूर यांची कचेरी रंकाळयानजिक असून त्यांचे मार्फत संस्कार केंद्रें चालविणें, स्पिरीट व मद्यार्कयुक्त पदार्थासाठीं परवाना देणें, सिनेमा, कलापथकें आणि करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारें दारुबंदीचा प्रचार करणें हीं कामें केलीं जातात.

सुपरिंटेंडेंट ऑफ फिशरीज, कोल्हापूर यांची कचेरी क. बावडा येथें सर्किट हाऊस नजिक आहे. मत्स्योत्पादन व मत्स्यसंवर्धन हीं कामें त्यांच्या मार्फत केली जातात.

न्यायदान डिस्ट्रिक्ट अँड सेशन्स जज्ज यांचे न्यायालय हें जिल्ह्यांतील वरिष्ठ न्यायालय होय. हें टाऊन हॉलमध्यें आहे. या न्यायालयाचे जिल्हा न्यायाधीश हे प्रमुख असून त्यांना २ मदतनीस जिल्हा न्यायाधीश आहेत. न्यायालयें दोन प्रकारचीं आहेत. १. दिवाणी न्यायालयें व २. फौजदारी न्यायालयें.


न्यायदान व्यवस्था

कोल्हापूर संस्थान असतांना या ठिकाणीं हायकोर्ट होते. संस्थानच्या विलिनीकरणानंतर येथें डिस्ट्रिक्ट जज्ज यांच्या कोर्टाची स्थापना झाली. दिवाणी न्यायालयाचे अधिकार क्षेत्र १ प्रादेशिक व २ आर्थिक असे मर्यादित असते. सिव्हिल जज्ज ज्यु. डि. कोर्टाचे अधिकार क्षेत्र सरकारनें नेमून दिलेल्या कांहीं तालुक्यांपुरतें मर्यादित असते व त्यांचे कोर्टांत १०,००० रु. पर्यंत दावे चालतात. सिव्हिल जज्ज सि. डि. चे कोर्ट जिल्ह्याच्या ठिकाणीं असून या कोर्टात रु. १०,००० वरील रकमांचे दावे चालतात.

कोल्हापूर शहरांत सिनियर डिव्हिजन्सचीं व ज्युनियर डिव्हिजन्सचीं ३ कोर्टें असून कोल्हापूर बाहेर १. इचलकरंजीं, २. गडहिंग्लज, ३. कागल, ४. पन्हाळा, ५. राधानगरी, ६. मलकापूर, ७. कुरुंदवाड ८. जयसिंगपूर, ९. आजरा व १०. चंदगड या ठिकाणींहि दिवाणी कोर्टें आहेत.

फौजदारी स्वरुपाचे सर्व खटले प्रथम ज्यु. मॅजिस्ट्रेट यांच्या न्यायालयांत दाखल होतात. या मॅजिस्ट्रेटच्या क्षेत्र मर्यादा सरकारनें ठरवून दिलेल्या असतात. कोल्हापुरांत जुन्या राजवाडयामध्यें

शासकीय व्यवस्था


भेडसगांव
आंबा
मलकापूर
शाहुवाडी
बांबवडे
कोडोली
पन्हाळा
वडगांव
जयसिंगपूर
हातकणंगले
शिरोळ
नरसोबावाडी
कळे
सांगरुळ
कोल्हापूर
करवीर
इचलकरंजी
कुरुंदवाड
हुपरी
साळवण
कागल
इस्पूली
लिंगनूर
गगनबावडा
राधानगरी
मुरगुड
दार्जीपूर
कापशी
गारगोटी
भुदरगड
गडहिंग्लज
हलकर्णी
सावर्डे
कडगांव
आजरा
नेसरी
चंदगड
तालुका सीमा रेषा
महाल सीमा रेषा
तालुका-महालाचें मुख्य ठिकाण
जिल्ह्याचें मुख्य ठाणे
पोलीस स्टेशन
जिल्ह्याचें मुख्य पोलीस ठाणे
पोलीस आऊटपोस्ट स्टेशन
दिवाणी व फौजदारी न्यायालयें
जिल्हा न्यायालय
नगर पालिका

फौजदारी न्यायालयें

मॅजिस्ट्रेट कोर्ट्स नं. १, २ व ३ अशीं आहेत. इचलकरंजी यथें जॉईंट जज्ज कोर्ट आहे. तसेंच प्रत्येक तालुक्याचे मामलेदार व महालकरी हे तालुका मॅजिस्ट्रेट म्हणूनहि काम पाहतात.

स्थानिक स्वराज्य संस्थाः—कोल्हापूर जिल्ह्यांत १. कोल्हापूर, २. इचलकरंजी, ३. कागल, ४. मुरगुड, ५. गडहिंग्लज, ६. जयसिंगपूर, ७. कुरुंदवाड, ८. वडगांव, ९. मलकापूर, १०. पन्हाळा या ठिकाणीं नगरपालिका आहेत. तसेंच ग्रामीण विभागांत ६४२ ग्राम पंचायती आहेत.

सरकारी आर्थिक व्यवहार

राज्य कारभारविषयक बाबींसंबंधींचा सर्व आर्थिक व्यवहार कोल्हापूर येथील जिल्हा ट्रेझरींतून होतो. तसेंच तालुका पातळीवरील आर्थिक व्यवहार सबट्रेझरींमधून होतोः प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं सब–ट्रेझऱ्या उघडण्यांत आलेल्या असून त्यांची संख्या १२ आहे. या सब–ट्रेझऱ्यांचा कारभार त्या तालुक्याचे मामलेदार अथवा महालकरी यांच्या नियंत्रणाखालीं असतो व आर्थिक व्यवहाराच्या बाबतींत त्या जिल्हा ट्रेझरी ऑफिसर यांच्या नियंत्रणाखालीं असतात. जिल्हा ट्रेझरीचे प्रमुख म्हणून जिल्हाधिकारीं हेच असतात. आणि जिल्हा ट्रेझरी ऑफिसर हे त्यांचे प्रतिनिधी म्हणून काम पहात असतात. जिल्हा ट्रेझरी शनिवार पेठेंत टाऊन हॉलनजिक असून त्याच इमारतींत स्टेट बँकेची शाखाहि आहे. जिल्हा ट्रेझरीचे पैशाचे देवाण-घेवाणीचे सर्व व्यवहार स्टेट बँकेच्या शाखेमार्फत होतात.

पोलिस दल

जिल्हा पोलीस प्रमुख ह्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं कोल्हापूर शहर व तालुक्यांतील शांतता, सुव्यवस्था, गुन्हेगारीस प्रतिबंध, रहदारी नियंत्रण व जनतेला आवश्यक त्यावेळीं मदत देणें इत्यादि कामें जिल्ह्यांतील पोलीस पहातात. जिल्हा पोलीस प्रमुख ह्यांची कचेरी भाऊसिंगजी रोड-वर न्यू पॅलेस जवळ असून त्याच्या समोरच पोलिस हेडक्वार्टर आहे. कोल्हापूर शहरांत लक्ष्मीपुरी, जुना राजवाडा, व शाहुपुरी ह्या तीन ठिकाणीं पोलिस ठाणीं आहेत. पोलीस हेडक्वार्टरवर वायरलेस स्टेशन असून फिरत्या वायरलेस ग्रिडकरितां लक्ष्मीपुरी पोलिस ठाण्यांस कंट्रोल रुम आहे. तसेंच जिल्ह्यांत प्रत्येक तालुक्याच्या व महालाच्या ठिकाणीं पोलीस सबइन्स्पेक्टर्स नेमलेले आहेत. सरकारच्या कायद्याची अंमलबजावणी, दारुबंदी वगैरे कामें पोलीस करतात.

कोल्हापूर जिल्ह्यांत एकूण १९ पोलीस ठाणीं व २० औट–पोस्ट्स आहेत.

पोलिस कल्याणाचीं विविध कामें

पोलीस व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणाकरितां पोलीस वेलफेअर फंडांतून पुढील विविध कामें करण्यांत येतात.

पोलिसांच्या मुलांकरितां सर्व पोलीस लाईनवर दूध पुरवठा केंद्रे सुरु करण्यांत आली आहेत.

पोलीस हेडक्वार्टर्सवर सर्व खेळाच्या साधनांनीं युक्त अशी एक बाग खास मुलांकरितां ठेवण्यांत आली आहे. याखेरीज, कुटुंब नियोजन केंद्र, फिरतें वाचनालय, पोल्ट्री फार्म, शिवण वर्ग, खेळ, इत्यादि सोयी करण्यांत आल्या आहेत.

कोल्हापूर पासून सुमारें २ मैलांवर दक्षिणेच्या बाजूस हवेशीर ठिकाणावर जिल्हा कारागृह बांध-लेले आहे. सदर कारागृहांस संस्थानी काळांत "मध्यवर्ती तुरुंग" म्हणून संबोधण्यांत येत असे. विलिनी-

जिल्हा कारागृह करणानंतर त्यास जिल्हा तुरुंगाचा दर्जा देण्यांत आला. गांवापासून फारशा लांब अंतरावर नसणाऱ्या ह्या तुरुंगांत सुमारें ३५० कैदी ठेवण्याची सोय करण्यांत आली आहे.

सदर तुरुंगामध्यें साधारणपणें १ महिन्यापेक्षां जास्त शिक्षा झालेल्या कैद्यापासून १ ते २ वर्षेंपर्यंत शिक्षा झालेल्या कैद्यापर्यंतचे गुन्हेगार ठेवले जातात. तुरुंग सुधारण्याच्या तत्त्वानुसार कैद्यांना कारागृहामध्यें विविध प्रकारचें शिक्षण दिलें जातें. व शिक्षा भोगून बाहेर गेल्यानंतर कैदी एक जबाबदार नागरिक होण्याच्या दृष्टीनें त्यांच्यांवर संस्कार घडविले जातात. त्यांची मानसिक उन्नति व्हावी ह्या दृष्टीनें सांस्कृतिक कार्यक्रम, रेडीओ, कँटिन आदिची सोय करण्यांत आली आहे. या शिवाय सांस्कृतिक विषयावर व्याख्यानें देण्यांत येतात तसेंच साक्षरता प्रसार वर्गहि चालविण्यांत येतात.

चांगल्या वर्तणुकीच्या कैद्यांना निरनिराळ्या प्रकारच्या क्रीडा स्पर्धांत भाग घेण्याची संधि दिली जाते. त्यादृष्टीनें जवळच असलेल्या क्रीडांगणावर त्यांना निरनिराळ्या प्रकारचे खेळ खेळण्याची सोय केली आहे.

तुरुंगांतून सुटल्यानंतर जीवनोपयोगाच्या दृष्टीनें त्यांना तुरुंगामध्यें विविध प्रकारचें शिक्षण दिलें जाते. सुतारकाम, हातमाग, रंगकाम, धोबीकाम, लोहार काम, चांभारकाम, इत्यादि निरनिराळ्या प्रकारच्या कामांचा ह्यांत समावेश होतो.

सदर तुरुंगामध्यें येणाऱ्या गुन्हेगारांमध्यें बरेचसे गुन्हेगार शेतकरी वर्गांतून आलेले असतात. तुरुंगाच्या आजूबाजूस व "पद्माळा" येथें मिळून १२५ एकर जमीन तुरुंगाच्या मालकीची आहे. त्यांपैकीं सुमारे ६० एकर लागवडीखालील असून कैद्यांच्या मदतीनें निरनिराळ्या प्रकारची भाजी, भात, ऊंस, मिरची, भुईमूग, जोंधळा वगैरे निरनिराळीं खरीप व रब्बी पिकें काढली जातात व त्यांतून जरुरीप्रमाणें सदर तुरुंग, तसेंच कोल्हापूर उप बंदीशाळा व इचलकरंजी उप बंदीशाळा यांना पुरवठा करण्यांत येतो. शेती हें ह्या तुरुंगांतील विविध प्रकारच्या कामापैकीं एक वैशिष्ठचपूर्ण काम आहे. तुरुंगाच्या मालकीची ४६ जनावरें असून एक डेअरीहि आहे. त्यांतून हॉस्पिटल व कँटीन यांना दूधपुरवठा होतो.

तुरुंग कर्मचाऱ्यांच्यासाठीं खालीलप्रमाणें विविध प्रकारचीं कामें केली जातात.

कुटुंबनियोजन केंद्र :– सरकारी कर्मचाऱ्यांमध्यें कुटुंब नियोजनावर उद्बोधक व्याख्यानें अधून मधून देण्यांत येतात. शस्त्र-क्रिया करवून घेण्यासाठीं वैद्यकीय खात्यांतील अधिकाऱ्यांच्या मदतीनें जरुर ती मदत दिली जाते.

दूधकेंद्र : तुरुंगाकरतां दूध केंद्र असून त्यातर्फे कर्मचाऱ्यांना दूधपुरवठा केला जातो. (युनिसेफ)

मुलांच्या करतां जागा : कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठीं बाग व खेळण्यासाठीं क्रीडांगण बांधण्यांत आलेलें आहे.

सिनेमाचे कार्यक्रम : जिल्हा प्रकाशनाधिकाऱ्यांच्या मदतीनें कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना अधून-मधून सिनेमा दाखविल जातात.

शैक्षणिक सोय : कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठीं तुरुंगाच्या मालकीची एक शाळा बांधण्यांत आली असून नगरपालिकेतर्फे शिक्षक ठेवण्यांत आले आहेत.

कर्मचा-यांसाठीं रहाण्याची जागा : तुरुंगातील कर्मचाऱ्यांसाठीं सुमारें २ लाख रुपये खर्चून पुरेशा जागा बांधण्यांत आल्या आहेत.

गांवांतील बिंदू चौकांत एक कारागृह आहे. सदर कारागृह संस्थानी काळांत जिल्हा तुरुंग म्हणून समजण्यांत येत असे. विलिनीकरणानंतर त्यास उप बंदीशाळेचा दर्जा देण्यांत आला असून येथें सर्व आरोपी व १ महिन्यापर्यंत शिक्षा झालेले कैदी ठेवण्याची सोय केली आहे.

इचलकरंजी येथेंहि एक तुरुंग आहे. येथें संस्थानी काळामध्यें सर्व प्रकारचे कैदी ठेवत असत. त्या तुरुंगास उपबंदीशाळेचा दर्जा देण्यांत आला असून येथेंहि आरोपी व १ महिन्यापर्यंतचे कैदी ठेवले जातात.

---

४. कृषि–उत्पादन

कोल्हापूर जिल्हा हा कोंकण व देश यांच्या सरहद्दीवर असल्यानें या जिल्ह्यांत कोंकणांतील व देशावरील अशीं दोन्हीं प्रकारचीं पिकें घेतली जातात. भात, ज्वारी, भुईमूग, नागली, ऊंस, बाजरी, तंबाकू इत्यादि पिकें येथें प्रामुख्यानें होतात. सह्याद्री पर्वतामुळें या जिल्ह्याचे पश्चिम भाग व पूर्वभाग असे विभाग पडले असून या जिल्ह्यांत पसरलेल्या पर्वतरांगांची उंची समुद्रसपाटीपासून ३००० फुटापर्यंत आहे. मात्र जिल्ह्याचा अधिक भाग समुद्रसपाटीपासून १३०० ते २००० फूट उंचीचा आहे.

कालव्यांची सोय

या जिल्ह्यांत वाहणाऱ्या ६ मोठ्या व इतर अनेक उपनद्या यांचे शेतीस पाणी–पुरवठा होण्याच्या दृष्टीनें उपयुक्त असें जाळेंच विणलें गेलें आहे. या जिल्ह्यांत पावसाचें प्रमाण सर्वत्र सारखें नाहीं. शिरोळ तालुक्यांत ७०० मिलिमिटर तर गगनबावडा महालांत ६६३८ मिलिमिटर असें पर्जन्यमान आहे. बाकीच्या सहा तालुक्यांत २००० मि. मिटरहून अधिक पाऊस आणि ४ तालुक्यांत १००० ते २००० मिलिमिटर पाऊस पडतो. या जिल्ह्याचे उन्हाळ्यांतील कमाल तपमान १००° फॅ. व हिवाळ्यांतील तपमान ५५° फॅ. असे सरासरीनें आहे.

या जिल्ह्याचा बराच भाग डोंगराळ असल्यामुळें जमिनींची प्रत प्रत्येक ठिकाणीं वेगवेगळी आहे. या भागांतील जमिनी स्थूलतः पुढील प्रकारांत मोडतात.

(१) तांबड माती, (२) हलकी (वरकस), काळी माती. (३) मध्यम अथवा भारी काळी माती, (४) रेताड जमीन.

या जिल्ह्यांतील जमिनीचें एकूण क्षेत्र २०,२०,४३८ एकर असून तें खालील प्रमाणें विभागलें गेलें आहे.

(१) जंगल	३,७८,१०५ एकर
(२) ओसाड	१,१७,६८१ "
(३) लागवडीलायक	२,०७,४८३ "
(४) गायरान व गवती कुरणें	१६,५५२ "
(५) प्रत्यक्ष पेरली जाणारी जमीन	९,९९,४५४ "
(६) पिकें घेतलें जाणारें क्षेत्र (रब्बी व खरीप धरुन)	१०,२०,७०८ "

तसेंच निरनिराळ्या पिकांखालीं असलेले क्षेत्र खालीलप्रमाणें आहे:–

(१)	भात	२,२५,६१८ एकर
(२)	खरीप ज्वार	१,३७,१६४ एकर
(३)	भुईमूग	१,२३,५४६ एकर
(४)	नागली	८४,२९४ एकर
(५)	ऊंस	६५,२५७ एकर
(६)	तंबाकू	२७,००० एकर
(७)	बाजरी	६,१७४ एकर
(८)	गहूं	५,५७७ एकर
(९)	हरभरा	८,६१५ एकर
(१०)	मका	१०,०९६ एकर

पावसाळ्याच्या उत्तरार्धामध्यें पावसाची अनिश्चितता असते आणि त्यामुळें पिकांची हानि होण्याचा संभव असतो. अशा वेळीं नदीनाल्यांना लहान-मोठे बंधारे घालून पाणी अडवून तें पिकांना देण्याची या जिल्ह्यांत सर्रास प्रथा आहे. पूर्वी शेतकरी लोक कच्चे बांध घालीत असत. आतां विकास योजनेंतून पक्के दगडी अथवा सिमेंट कॉंक्रीटचे बंधारे बांधण्यांत आले आहेत. पाणीपुरवठ्याच्या सोयीसाठीं ८१ बंधारे, ९६६७ विहिरी व १२१ तलाव या जिल्ह्यांत असून मोट, ऑईल इंजिनें, इलेक्ट्रिक पंप यांचा पाणी उपसण्यासाठीं वापर केला जातो. या जिल्ह्यांत या कामीं ४५७१ ऑईल इंजिने वापरांत आहेत.

या जिल्ह्यांतील जमीन धारणेचें प्रमाण खालीलप्रमाणें आहे:–

जमीन धारणेचें प्रमाण	एकूण जमीन धारकांशी शें. टक्केवारी	एकूण क्षेत्राशीं शें. टक्के वारी
(१) ५ एकर पर्यंत	७२.५६	२६.३७
(२) ५ ते १५ एकर	१९.६०	२७.०५
(३) १५ ते २५ एकर	४.५०	१४.३४
(४) २५ ते १०० एकर	३.०४	२६.९६
(५) १०० ते ५०० एकर	०.२०	५.८७
(६) ५०० एकर व त्याहून अधिक	०.१०	५.४१

जिल्ह्यामध्यें शेतीविषयक सुधारणांचे व विकासाचे कार्य शेतकी खातें आणि विकास योजना यांच्या द्वारें केलें जात असे. आतां हें कार्य जिल्हा परिषदेकडे सोंपविलें गेलें आहे.

शेतकी विभागामार्फत या जिल्ह्यांत एकूण ६ बीज संवर्धन केंद्रे चालूं आहेत.

खतें व बी – बियाणासाठीं आजरा येथें तालुका गुदाम असून राधानगरी येथें नवीन गुदाम बांधण्यांत आलें आहे. तसेंच करवीर, पन्हाळा व शिरोळे या विकास गटांच्या निधींतूनहि ३ गुदामें बांधण्यांत येत आहेत. इतर विकासगटांतहि अशी गुदामें लौकरच बांधलीं जातील.

जिल्ह्यांतील पिकें



या जिल्ह्यांत भात शेती योजनेचे ४ गट असून त्याखालीं ९ तालुके आले आहेत. आणखी एक गट लौकरच सुरु करण्यांत येणार असून त्याद्वारें भात पिकविणारे १० तालुक्यांचे सर्व क्षेत्र या योजनेखालीं येईल. या योजनेच्या सध्यांच्या ४ गटांत एकूण ७५,३४२ एकर क्षेत्र सुधारक पद्धतीच्या भात-शेतीखालीं आणलें गेलें आहे. **भात शेती योजना**

खरीप पीक–मोहिमेनुसार भात, खरीप ज्वार, भुईमूग हीं पिकें सुधारक शेती–पद्धतीनें घेण्यांत आलीं.

हिरवळीच्या खताचा शेतकऱ्यांनी अधिकाधिक वापर करावा यांसाठीं योजना हातीं घेण्यांत आली असून प्रतिवर्षी २ हजार बंगाली मणाहून अधिक ताग –बी $\frac{1}{4}$ किंमतीची सूट देऊन विकण्यांत येतें.

अधिक धान्योत्पादनाच्या दृष्टीनें शेतकरी वर्गांत उचित स्पर्धा व आवड निर्माण व्हावी या दृष्टीनें तालुका पातळीवर व जिल्हा पातळीवर प्रतिवर्षी पीकस्पर्धा घेतल्या जातात. खरीप हंगामामध्यें ४ तालुक्यांत ज्वारीच्या व ८ तालुक्यांत भाताच्या स्पर्धा घेण्यांत आल्या. तसेंच ५ तालुक्यांत भुईमुगाची पीक–स्पर्धा सुरूं केली आहे. तसेंच रब्बी–पीक स्पर्धाहि तालुका व जिल्हा पातळीवर घेण्यांत येत आहेत. **पीक – स्पर्धा**

भात शेती योजनेप्रमाणेंच ज्वार सुधारयोजनाहि या जिल्ह्यांत हातीं घेण्यांत आली असून १९६०–६१ सालीं १५०४५ एकर क्षेत्रांत सुधारक पद्धतीनें ज्वार शेती केली आहे. त्याकरितां अमोनियम सल्फेट खताचा पुरवठा करण्यांत आला.

खरीप पीक मोहिमेप्रमाणेंच रब्बी पीक मोहिमहि चालू असून ३२०० एकराहून अधिक क्षेत्रांत या मोहिमेनुसार लागवड करण्यांत आली असून पिकासाठीं रासायनिक खतांचा पुरवठा करण्यांत आला.

इतर योजना :– जंगलांतून पडलेलीं पानें गोळा करून त्यापासून खत तयार करण्याची योजना अंमलांत आणली असून प्रत्येक खड्डयामागें शेतकऱ्यांना उत्तेजनार्थ ६ रु. मदत देण्यांत येते. या योजनेखाली खताचे १७५ खड्डे भरण्यांत आले.

धूप प्रतिबंधक उपाय :– पर्जन्यवृष्टीमुळें उताराच्या जमिनींची होणारी धूप थांबविण्यासाठीं आडवे बांध घालण्याच्या योजनेनुसार राधानगरी तालुक्यातील हसणे गांवीं २०० एकर क्षेत्रांत बांध घातले आहेत. तसेंच चंदगड तालुक्यांतहि २५० एकर क्षेत्रांत हें काम चालू आहे.

शेतीस पाणीपुरवठा करण्याकरितां नवीन विहिरी खोदणे व जुन्या विहिरींची दुरुस्ती करणें या योजनेखालीं २७ नवीन विहिरी खोदण्यांत आल्या आहेत व २१ विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली. तसेंच ऑईल इंजिनें व पंपिंग सेटस् घेण्याकरितां १८२ लोकांना कर्जे दिली आहेत.

त्याचप्रमाणें लांब धाग्याच्या जातीच्या कापसाची (१७० सी ओ २) लागवड करण्याची योजना हातीं घेतली असून २०० वर एकरांत लागवड झाली आहे. या जिल्ह्यांतील ८ नगरपालिकांनीं व कांहीं ग्रामपंचायतींनी मैल्यापासून कंपोस्ट खत तयार करण्याची योजना हातीं घेतली आहे. असें खत तयार करण्यासाठीं सदरहू संस्थांना थोडीफार मदत देण्यांत येते. तसेंच कंपोस्टचे शेकडों खड्डेहि भरले आहेत.

पीक संरक्षण योजना :– पीक संरक्षणार्थ निरनिराळ्या उपाययोजना हातीं घेण्यांत आल्या असून

त्यासाठीं औषधें मारण्याचीं व फवारण्याचीं शेंकडों उपकरणें शेतकऱ्यांना वांटण्यांत आलीं आहेत. त्याच-प्रमाणें प्रगतिशील शेतकरी, सहकारी सोसायटया, ग्रामपंचायती आणि संस्था यांना सवलतीच्या दरांतहि हीं उपकरणें दिली आहेत.

डोंगराळ भागांत काजूची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्याची योजना हातीं घेतली असून शेकडों एकर जमिनींत काजूची लागवड केली आहे.

कृषि पंडित :– ज्वारीचें पीक उत्पादन जास्तींतजास्त करून कृषिपंडित ही भारतीय कीर्तीची मानाची पदवी मिळविणारे श्री. भीमगौंडा दादा पाटील हे या जिल्ह्यांतील तमदलगे (शिरोळ) गांवचे आहेत.

तसेंच कोल्हापूर जिल्हा हा उत्कृष्ट प्रतीचा गूळ निर्माण करण्याबद्दल सर्वत्र ख्यातनाम असून ऊंसाच्या लागवडीमध्येंहि शेतकऱ्यांनीं प्रसंशनीय अशा अनेक नवनवीन पद्धती अवलंबिल्या आहेत.

पशुसंगोपन व संवर्धन :– कोल्हापूर जिल्ह्यामध्यें एकूण जनावरांची संख्या १०,०००० असून त्यांत बैल, गाई, म्हैशी वगैरे ५०००० आणि शेळ्या मेंढ्या व कोंबडी २०००० इतकी आहेत.

कोल्हापूर येथें डिस्ट्रिक्ट व्हेटरिनरी हॉस्पिटल असून त्याला कृत्रिम पशु पैदास केंद्र व डिस्ट्रिक्ट डायग्नोस्टिक सेंटर हीं जोडलेलीं आहेत.

कोल्हापूर क. बावडा येथें कुक्कुट संवर्धन केंद्र असून अंडी उबविण्याचें केंद्रहि तेथेंच आहे. याशिवाय तेथील पोल्ट्री ट्रेनिंग सेंटरमध्यें ग्रामीण जनतेला कोंबडी पालनाचें शिक्षण दिलें जातें. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं जनावरांचा दवाखाना असून त्यांचीं उपकेंद्रें व प्राथमिक केंद्रेंहि आहेत. एकूण आठ मोठे दवाखाने, तेरा लहान दवाखाने, ६ प्राथमिक केंद्रें आहेत. साधारणतः २५००० जनावरांसाठीं एक दवाखाना मिळेल अशी योजना करण्यांत आलेली आहे. सदर ठिकाणीं जनावरांना मोफत औषधोपचार, खच्ची करणें व सांथीच्या रोगांवर गांवोगावीं जाऊन प्रतिबंधक लस टोचणें हीं कामें केली जातात.

याशिवाय तालुक्याचे ठिकाणी कृत्रिम गर्भधारणेची उपकेंद्रे काढण्याचें काम चालूं असून हल्लीं या योजप्रमाणेंच जयसिंगपूर व गारगोटी येथें उपकेंद्रें चालू आहेत. वेगवेगळ्या योजनांखालीं कोल्हापूर जिल्ह्यांत एकूण १०० वळू दिलेले आहेत. त्याचप्रमाणें कोंबडी सुधारणा योजनेखालीं कोंबडी–पालनाकरितां कर्ज दिलें जातें व लहान प्रमाणांत कुक्कुट फार्म काढण्यास मदतहि दिली जाते.

कोल्हापूर येथें शाहुपुरींत सरकारी दूध केंद्र हल्लींच सुरू करण्यांत आलें आहे.

कोल्हापूरपासून सुमारें २ मैलावर क. बावड्याच्या अलिकडे शाहू शेतकी शाळेच्या फार्मलगत ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र आहे या केंद्राची सुरुवात १–४–१९५६ पासून झाली असून तें शाहू शेतकी शाळेशीं संलग्न करण्यांत आले आहे. महाराष्ट्र राज्य सरकारच्या शेतकी खात्याच्या नियंत्रणाखालीं ही संस्था असून केंद्राचे प्राचार्य हे या संस्थेचे प्रमुख आहेत. या केंद्रामध्यें दोन शाळा आहेत.:– (१) ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटर आणि (२) शाहू शेतकी शाळा.

ग्राम सेवक प्रशिक्षण केंद्र व शेतकी शाळा

विकास गटामध्यें काम करणाऱ्या ग्रामसेवकांना आवश्यक तें प्रशिक्षण देऊन तयार करणें हा या शिक्षण केंद्राचा प्रमुख उद्देश असून या केंद्रांतून ३१–३–१९६१ पर्यंत ६९८ ग्रामसेवक प्रशिक्षण घेऊन बाहेर

विकासगट ग्रामसेवकांसाठीं प्रशिक्षण केंद्र

पडले आहेत. या केंद्रांत :– (१) जमिनीची निगा व व्यवस्था आणि शेती विज्ञान. (२) पिकें, (३) बागायत व पीक संरक्षण , (४) पशु संगोपन, दुग्ध व्यवसाय, व्हेटरिनरी सायन्स, (५) सहकार, (६) सार्वजनिक आरोग्य, (७) समाज शिक्षण; (८) मायनर इंजिनीयरिंग, (९) पंचायत, (१०) विस्तार कार्यक्रम आणि नियोजन; (११) ग्रामीण उद्योगधंदे इत्यादि विषय त्या त्या विषयांतील तज्ञ अध्यापकांकडून शिकविले जातात. ग्रामीण भागांत काम करण्यासाठीं उत्तम कार्यकर्ते तयार होण्याच्या दृष्टीनें ग्रामसेवकाकडून प्रत्यक्ष कामें करवून घेण्यावर व प्रात्यक्षिकांवर अधिक भर दिला जातो. तसेंच खेडोपाडी त्यांना मुक्कामास नेऊन व सहली काढूनहि त्यांना शिक्षण दिलें जाते.

शाहू शेतकी शाळा :– ही संस्था जुनी असून पूर्वीच्या कोल्हापूर संस्थानानें ती सुरू केली होती. ता १–६–१९५४ पासून सरकारनें सर्वत्र शाळांतून सुरू केलेला २ वर्षाचा शेती कोर्स याहि शाळेंत शिकविला जात आहे. या शाळेचे ६५ ए. ३४गु. क्षेत्राचे शेतकी फार्म असून ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटरच्या व शाहू शेतकी शाळेच्या विद्यार्थ्यांकडून या फार्मवर प्रात्यक्षिकें करून घेतली जातात. या फार्मवर निरनिराळीं पिकें भाजीपाला, फळे पिकविली जातात. तसेंच शाळेचीं कांहीं जनावरेंहि आहेत.

९. वन संपत्ति

कोल्हापूर जिल्ह्याचें एकूण क्षेत्रफळ २९०० चौरस मैल आहे. जिल्ह्यांची सीमा मर्यादा हीच कोल्हापूर वनविभागाची सीमामर्यादा आहे. जंगलचें एकूण क्षेत्रफळ ६४२.१४ चौरस मैल आहे. यापैकीं ६१२.१४ चौरस मैल क्षेत्र कोल्हापूर वन विभागाच्या ताब्यांत आहे व ३० चौ. मैल क्षेत्र (शेत जमिनी) मुलकी विभागाच्या ताब्यांत आहे. जिल्ह्याचा पश्चिम भाग म्हणजे सह्याद्रीच्या डोंगरांच्या रांगा होत. हा भाग बहुधा सर्व, उताराचा असून लहानमोठ्या नदीनाल्यांनीं युक्त असा आहे. याच डोंगराळ भागांत जंगल अधिक प्रमाणांत आहे. जिल्ह्याच्या पूर्वेकडील भाग सपाट आहे. त्यामध्यें झाडी फार विरळ असून बहुतेक सर्व भाग उजाड आहे.

क्षेत्रफळ व सीमा

जिल्ह्याच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागांत दरसाल सर्वसाधारण पावसाचें प्रमाण १५० इंचापासून ३०० इंचांपर्यंत आहे. जसजसें पूर्वेकडे जावें तसतसें तें प्रमाण कमीकमी होत जातें. अति पूर्वेकडील कांहीं भागांत सर्वसाधारण दरसाल अवघा २० ते ३० इंचांपर्यंत पाऊस पडतो. पर्जन्यमान व हवामान यानुसार या जिल्ह्यांतील जंगल विभागांत खालील प्रकारची वृक्षसंपत्ति आढळून येते.

हवामान, वृक्ष आणि वनस्पति

सदापर्णी वृक्ष

जांभूळ, हिरडा, नागचाफा, सुरंगी, फणस, फणशी, पिसा, तमालपत्र, कोकम, आंबा, अंजनी, पारजांभूळ, शिसव, सावर, बिबला, नाना, किंजळ, आसाणी, कुंभी, कव्हा, चंदन, वगैरे.

ऋतुपर्णी वृक्ष

साग, धामण, शिवण, धावडा, कुंकुफल, कलमआइन, कलम शिसा, हेद, किनई, बांभूळ, खैर, इत्यादि.

औषधोपयोगी वनस्पति

कुडा, वाकेरी, भारंग, वावडींग, सातवी, घायटी, बेडकी, बिबा, बाव्हा, भूईकोहळा, वगैरे.

वन्य पशुपक्षी

येथील जंगलांत खालीलप्रमाणें वन्य पशुपक्षी आढळतात.

गवा, वाघ, चित्ता, (बिबट्या वाघ) सांबर, भेकर, रानडुक्कर, अस्वल, तरस, चितळ, ससे, लांडगे, रानकोंबडी, वगैरे.

जंगलव्यवस्था

जंगलांचे राखीव व संरक्षित असे दोन प्रमुख भाग पाडण्यांत आले आहेत. कारभाराच्या सोयीच्या दृष्टीनें या जिल्ह्याचे आठ पोट विभाग पाडण्यांत आलेले असून त्या भागांस रेंज असें नांव आहे. प्रत्येक रेंजमधील राखीव व संरक्षित जंगलें पुढील प्रमाणें आहेत.

रेंजचें नांव	राखीव जंगलक्षेत्र	संरक्षित जंगल क्षेत्र	एकूण क्षेत्र
	ए. गुं.	ए. गुं.	ए. गुं.
विशाळगड	४७५९२–१३	९२२६–३४	५६८१९–०७
पन्हाळा	३४४७८–२०	९९४५–२६	४४४२४–०६
बावडा	१३४३६–३८	२१६६०–०४	३५०९७–०२
कोल्हापूर	१०१६७–००	७७७७–२५	१७९४४–२५
राधानगरी	५४२४३–०९	१६४८१–३८	७०७२५–०७
भुदरगड	३९०२४–०३	१७४८५–११	५६५०९–१४
आजरा	२७११०–३०	१८११२–२९	४५२२३–१९
चंदगड	६५०३१–१०–६	—	६५०३१–१०–६
	२९१०८४– ३–६	१००६९०–०७	३९१७७४–१०–६

कामाच्या सोयीसाठीं प्रत्येक रेंजचे पुन्हा लहान लहान पोटविभाग पाडले असून त्यांस राऊंड हें नांव दिलें आहे. प्रत्येक राऊंडचे पुन्हा लहान लहान पोट विभाग पाडले असून त्यांस बिट हें नांव आहे. यानुसार या डिव्हिजनमध्यें एकूण आठ रेंजेस, ३४ राऊंडस व १०८ बिटस् आहेत.

तपासणी नाकीं

जंगल उत्पन्नाच्या चोरट्या निर्यातीवर निर्बंध घालण्यासाठीं दरसाल नोव्हेंबर ते मे या मुदतींत मोक्याचें ठिकाणीं तपासणी नाकीं सुरू केली जातात. सध्या मुख्य रस्त्याला लाकूड, कोळसा, इमारती माल यांचे सरकारी व मक्तेदारांकडून दास्तान डेपो केले जातात. व त्यामुळें बारमाही वाहातुक होऊं शकते. त्यामुळें तात्पुरतीं हंगामी नाकी बारमाही करण्याचा विचार आहे.

उत्पन्नाच्या बाबी

जंगलांची नियमित व तंत्रबद्ध तोड यांचा माफक उपयोग व वृद्धि याकरितां एक कार्यक्रम ठरविण्यांत आलेला असून त्यानुसार सर्व कामें नियमित केली जातात. दरसाल कूपांची विक्री किरकोळ उत्पन्नाची विक्री व गवती कूपांची विक्री वगैरेपासून पुढील प्रमाणें सर्वसाधारण उत्पन्न मिळतें.

	मिळणारें उत्पन्न
कूपविक्री–इमारती लांकूड, जळाऊ लाकूड, कोळसा वगैरे	रु. १,८३,४३०
चंदन झाडांची विक्री	२४,०५१

हिरडा, मधमेण, शिकेकाई, काजू वगैरे किरकोळ उत्पन्न	२२,९०२
चारणी व कापणी गवती कुरणें	१२,६२६
	२,४३,००९

जंगल संरक्षण व वाढ यांवरील खर्च

जंगलांचें संरक्षण, त्यांची शास्त्रोक्त वाढ, व त्यांचा नियमित व माफक विनियोग याकरितां कर्मचारी यंत्रणा काम करीत असते आणि या कर्मचाऱ्यांच्या वेतनादाखल दरसाल सुमारें २९४५९८ रु. खर्च येतो.

संगोपन व वृद्धि यांवरील खर्च

ठरवून दिलेल्या कार्यक्रमानुसार तोड झालेल्या कूपांमध्यें नवे वृक्षारोपण करणें, जंगलाच्या हद्दी दुरुस्त करणें, झाडांचें वाढीस मदत करणें, आगीपासून जंगलाचें संरक्षण करणें, कूप छापणें, रस्ते व इमारती दुरुस्त करणें, अशा निरनिराळ्या कामासाठीं दरसाल सुमारें १५५९८३ रुपये खर्च येतो.

जंगलतोड

कोल्हापूर जिल्ह्याच्या विलीनीकरणापूर्वीच्या काळांत चांगल्या प्रकारच्या जंगलांच्या कमी लागवडीमुळें याभागाचें अपरिमित नुकसान झालें आहे. ज्या ठिकाणीं पूर्वी दाट व चांगल्या प्रकारचीं जंगलें होतीं त्यांची भरमसाठ तोड झाल्यामुळें मातीची धूप होऊन खडक उघडे पडले आहेत. जंगलांची वृद्धि व विकास घडवून आणण्याकरतां ठरवून दिलेला कार्यक्रम अपुरा होता. म्हणून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेखालीं जंगलवृद्धि शक्य तितक्या लवकर घडवून आणण्याच्या दृष्टीनें कार्यक्रम हातीं घेण्यांत आलेले होते. या योजनेखालीं केलेल्या कामांची त्रोटक माहिती पुढील प्रमाणें:

पन्हाळा वृक्षारोपण योजना

इतिहासप्रसिद्ध पन्हाळा किल्ला हा कोल्हापूरच्या वायव्येस १२ मैलांवर आहे. पन्हाळा होय. जिल्ह्यांतील एक थंड हवेचें ठिकाण असल्यानें त्याचा सर्वांगिण विकास करण्याचा कार्यक्रम सरकारनें हातीं घेतला. या कार्यक्रमानुसार पन्हाळा किल्ल्याच्या माथ्यावरील पठार व सभोंवतालचे उतार यांवर मोठ्या प्रमाणांवर झाडांची लागण करण्याचें काम वन विभागानें सन १९५४–५५ पासून सुरू करून ६०–६१ अखेर तें पूर्ण केलें आहे व त्याचे संगोपनाचें कार्य चालू आहे.

या योजनेचा पोटभाग म्हणून आणखी खालीलप्रमाणें कामें करण्यांत आलीं आहेत.

रस्त्याच्या दुतर्फा झाडें लावणें

पठारावरील रस्त्याच्या दुतर्फा सुशोभित अशा झाडांची लावण सन १९५९–६० व १९६०–६१ या वर्षांत केली आहे. अशी एकूण ५३७ झाडें लावण्यांत आलेलीं असून त्यांची वाढही अत्यंत समाधानकारक झाल्यामुळें हें काम उल्लेखनीय असें झालें आहे.

धूप प्रतिबंधक प्रात्यक्षिक केंद्र

पावसाच्या पाण्यामुळें उताराच्या जमिनीची धूप होऊन आंतील खडक उघडे पडतात व अशा जमिनी गवतसुद्धां उगवण्याच्या दृष्टीनें निरुपयोगी होतात. तेव्हां अशा तऱ्हेनें होणारी जमिनींची धूप थांबविण्यासाठीं व जमिनींत आर्द्रता टिकवून धरण्याकरितां उताराच्या जमिनीवर चर खोदून वृक्षारोपण करणें जरूर आहे. लोक आपल्या मालकीच्या उतारावरील जमिनीची नांगरट करून त्यांत वरी, नागली अशीं पिकें काढतात व त्यामुळें जमिनीची फारच मोठ्या प्रमाणावर धूप होते. ही धूप थांबविण्यांस निव्वळ सरकारी यंत्रणेचें कार्य अपुरें पडतें. त्यासाठीं लोकांच्या सहाय्याची जरुरी असते.

दरसाल वनमहोत्सव फारच मोठ्या प्रमाणांत साजरा होत आहे. शिवाय जंगलच्या कार्यक्रमानुसार व पंचवार्षिक योजनांखालीं वृक्षारोपण केलें जात आहे. यशस्वी वृक्षवाढीसाठीं चांगल्या व जोमदार अशा रोपांची गरज असते. म्हणून अशा ९ रोपवाटिका जिल्ह्यांत सुरूं केल्या आहेत. दरसाल या रोपवाटिकांत साग, शिसव, ऐन, जांभूळ, किंजळ, शिरडा, नाना या सारख्या इमारती उपयोगी झाडांची, रेन ट्री, गुलमोहर, अशोक वगैरे सारख्या सुशोभित झाडांची रोपे तयार केलीं जातात व नंतर हीं रोपें वृक्षारोपण व वनमहोत्सवासाठीं पुरविलीं जातात. प्रत्येक रोपवाटिकेचें क्षेत्र ९ एकर असून त्यामध्यें ४०'× ३'× १' या मापाचे २४० वाफे आहेत. व सुमारें अर्धा एकर क्षेत्रांत घायपात बुलबील लावून त्यांचे गड्डे तयार केले जातात.

रोपवाटिका केंद्र

काजू हें परदेशी चलन मिळवून देणारें अत्यंत महत्त्वाचें उत्पन्न आहे. काजूलागवड फार मोठ्या प्रमाणांवर करण्याच्या सरकारी धोरणांनुसार ही योजना सन १९५८–५९ पासून या जिल्ह्यांत सुरूं केली. सन १९६०–६१ अखेर या जिल्ह्याचे जंगल क्षेत्रांत १८४९ एकर काजू लागवड केली आहे. तृतीय पंच- वार्षिक योजना कालांत हें काम तसेंच पुढें चालू ठेवण्यांत येणार आहे.

काजू लागवड

या जिल्ह्यांत सागवान जातीचें जंगल जवळ जवळ नाहीं म्हटलें तरी चालेल. या जिल्ह्यांत लोकांची सागवान लाकडाची गरज म्हैसूर राज्याकडून व सावंतवाडीहून येणाऱ्या सागवानावरच भागवावी लागते. म्हणून अशा मौल्यवान इमारती झाडांचें रोपण करून जंगलांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीनें सागवानाची लागवड ५९–६० पासून सुरु केली आहे. दुसऱ्या योजना कालांत या जिल्ह्याच्या ३३० एकर जंगल क्षेत्रात अशी लागवड करण्यांत आली आहे. तृतीय पंचवार्षिक योजना कालांत ही योजना चालूं राहील.

सागवान रोपण

आगपेट्यांच्या कारखान्यांना लांकडाचा पुरवठा करण्याच्या दृष्टीनें सावर लागवड सन १९५९–६० पासून सुरूं केली आहे. दुसऱ्या योजना कालांत १२० एकर क्षेत्रांत वृक्षारोपण केलें आहे. त्यांचें संगोपन चालू आहे.

सावर रोपण

या जिल्ह्याच्या जंगलातील हिरड्याचें उत्पन्न फार मोठें आहे. हिरड्याचा पुरवठा होत असल्यानें कोल्हापूरपासून ४१ मैलांवर (कोल्हापूर – रत्नागिरी रस्त्यावर) टॅनिन फॅक्टरी सुरूं आहे. या फॅक्टरी मधून दरसाल १५०० टन पावडर प्रॉडक्ट तयार होते. ही पावडर परदेशींही पाठविली जाते.

दरसाल तोड करावयाच्या कूपांची विक्री मक्तेदार लोकांना न करतां कामगार लोकांना अशा कूप विक्रीपासून फायदा मिळवून द्यावा व त्यांच्या राहणीचें मान सुधारावें या हेतूनें जंगल कूपांची तोड अशा जंगल कामगार संघामार्फत करण्याचें कार्य सन ५१–५२ पासून या जिल्ह्यांत वन विभागानें सुरूं केलें आहे व त्याची दरसाल प्रगति होत आहे. गेल्या दहा वर्षांत किती प्रगति झाली हें पुढील आंकडेवारीवरून ध्यानांत येईल.

जंगल कामगार संघ

सन	संघ संख्या	किती कूपाचें काम केलें.
१९५१–५२	१	२
१९५६–५७	५	१३
१९६०–६१	१०	२२

गवती कुरणें.

गवत चारणीं, कापणी व कुरणें यांचीं विक्री करतांना गांवच्या गुरांच्या सोईंचा विचार करून ग्राम पंचायतीं अगर सोसायटचा यांना प्राधान्य देऊन सरासरी किंमतीवर देण्याचा नियम आहे. यामुळें गांवच्या सर्व लोकांना अल्प किंमतींत आपल्या गुरांचीं सोय करून घेतां येते

वनमहोत्सव

दरसाल या जिल्ह्यांत वनमहोत्सव फार मोठचा उत्साहानें साजरा केला जातो. या महोत्सवांत सरकारी कचेऱ्या, निम सरकारी संस्था, सहकारी संस्था, शाळा कॉलेजें, वगैरे भाग घेतात. वन महोत्सवासाठीं रोपपुरवठा वनविभागाकडून केला जातो. दरवर्षीं निरनिराळ्या जातींचीं व उत्तम प्रकारचीं अशीं एक लाख रोपें पुरवलीं जातात.

टेंबलाई टेकडीवरील वनमहोत्सव

सन १९५८–५९ पासून कोल्हापूर येथील सर्व सरकारीं कचेऱ्यांतील कर्मचाऱ्यांनीं व शाळा कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं वनमहोत्सव साजरा करण्याचें कार्य चालू केलें आहे. गेल्या तीन वर्षांत या टेकडीवर सुशोभित व फळांची मिळून सुमारें १२०० झाडें लावण्यांत आलीं आहेत. झाडांचीं वाढ फार उत्तम प्रकारें झालेलीं असून शेकडा ९५ रोपें जिवंत आहेत.

कळे येथील नाल्यावरील बंधारा

कोल्हापूर गगन बावडा रस्त्यावर मौजे कळे या गांवच्या जंगलांत नाल्यावर एक लहान बंधारा घालून पाणीं सांठविले आहे. या जलसंचयाचे नजीकच दोन एकर जागेंत रोपवाटिका केलीं आहे. जवळच काजू लावण व थोडीं सागाचीं रोपें लावण्यांत आलेलीं आहेत.

तबक वन उद्यान

पन्हाळा किल्ल्याचे वायव्येस स. नं. ११ यांत तबक वन उद्यान निर्माण करण्याचें काम सन १९५९-६० पासून सुरू केलें आहे. सुरू, निलगिरीं, काजू, हिरवळ प्लॉट, शिशु क्रीडांगण-वगैरेमुळे उद्यानांस अपूर्व शोभा आलीं आहे.

गवाभय अरण्य

दुसरें नवें आकर्षण म्हणजे राधानगरीं तालुक्यांत पाटचाचा डंग या भागांत बायसन (गवा) सँच्युरीं स्थापन करण्याचें काम सन १९५९–६० सालापासून सुरू झालें आहे. हा भाग नेहमींच हिरव्यागार झाडींचा असा आहे. मानबेटच्या पठारासभोवारच्या उतारावर दाट हिरवीं झाडीं असून त्यांत मधून मधून पाण्याचे झरे आहेत. मानबेटच्या पठारांवर गाळांनीं भरलेलीं दोन तळीं आहेत. या तळ्यांतील पाण्याचा वन्य पशुपक्ष्यांना पिण्यासाठीं उपयोग व्हावा म्हणून ती खोदण्यांत येणार आहेत. दाजीपूरपासून मानबेट पठारापर्यंतचा रस्ता दुरुस्त करण्याचें काम सन ५९–६० पासून सुरू केलें आहे.

या सॅच्युरीमध्यें प्रवासीं लोकांना राहाण्यासाठीं एक लहान बंगला व वन्य प्राणीं पाहाण्यासाठीं एक वॉच टॉवर बांधण्यांत येणार आहे.

ग्रामवन योजना

ग्राम पंचायतीमार्फत ग्रामपंचायतींच्या मालकींच्या जमिनींत प्रत्येकीं १० एकरापर्यंत अशी लहान लहान ग्रामवनें तयार करण्याचीं योजना या जिल्ह्यांत सन १९६०–६१ पासून सुरू आहे. सन १९६०–६१ मध्यें नऊ गांवीं योजनेचें काम झालें. सन १९६१–६२ पासून बिगर विकास व विकासपूर्वगटाच्या क्षेत्रांतहीं ही योजना जंगल विभागामार्फत कार्यान्वित करण्यांत येत आहे.

---

६. औद्योगिक विकास

गेल्या १५–२० वर्षांत कोल्हापूरच्या औद्योगिक क्षेत्रामध्यें विलक्षण प्रगति झालेली आहे. शेतीसाठीं पाणी उपसण्याचे पंप व त्यांना लागणारी ऑईल इंजिनें बनविण्यामध्यें कोल्हापूरनें उच्चांक गांठला. कोल्हापूरचे कल्पक कारखानदार निरनिराळ्या प्रकारचीं इंजिनें येथें तयार करूं लागले आहेत. त्यांचे पार्टस्, मोटारींचे कांहीं स्पेअर पार्टस्, बॅटऱ्या व इतर सामानसुमान बनविण्याचे कारखाने कोल्हापुरांत पुष्कळ आहेत. या कारखान्यासाठीं शाहू मिलनजिक शिवाजी उद्यमनगर ही स्वतंत्र वसाहत वसविण्यांत आली आहे. शिवाजी उद्यमनगरांत २४० कारखाने असून त्यांत ३,००० वर कामगार काम करीत आहेत. डिझेल इंजिन तयार करणारे ८५ कारखाने असून दरमहा साधारणतः ५०० ते १,००० पर्यंत इंजिनें बनविली जातात.

कोल्हापुरांत तयार होणारीं बरीचशीं इंजिनें सरकारकडून तगाईवर देण्यासाठीं मंजूर झालेलीं असून त्यांत विश्वास, पॅको, इमानी हीं प्रमुख आहेत. त्याशिवाय लक्ष्मीपुरी, शाहूपुरी व शहराच्या इतर भागांत विखुरलेले अनेक लहानमोठे कारखाने आहेत. या कारखान्यांमध्यें हजारो कामगार अहोरात्र काम करीत असतात.

सहकारी साखर कारखाने

कोल्हापुरांत श्रीछत्रपति शाहू वीव्हिंग मिल्स ही कापड गिरणी, दि कोल्हापूर शुगर मिल्स हा साखर कारखाना व भुईमूगाचें तेल गाळण्याच्या अनेक मिल्स आहेत. तसेंच या जिल्ह्यांत पांच सहकारी साखर कारखाने झाले आहेत. इचलकरंजी येथें शेंकडों कापड गिरण्या असून पॉवर मागावर व हातमागावर उत्तम प्रकारचीं पातळें, कापड आदि बनविण्यांत येतें. इचलकरंजींत सध्यां पांच ते सहा हजार यंत्रमाग व तितकेच हातमाग आहेत. इचलकरंजीची निम्म्याहून अधिक लोकसंख्या या धंद्यावर जगत आहे.

हुपरी येथील चांदी कारखान्यांत तयार होणारा मालहि देशांत व परदेशांत जातो. यापैकीं बराचसा माल हस्तकलाकौशल्याचा असतो.

लांकडी व लाखेचीं खेळणी

भुदरगड तालुक्यांतील पाटगांव येथें लांकडी व लाखेची खेळणी बनविण्याचा उद्योग फार चांगला चालतो. तसेंच जिल्ह्यांत कोल्हापूर व इचलकरंजी याशिवाय वडगांव, कागल, कोडोली, हलकर्णी, भैरेवाडी, रेंदाळ, नांदणी, सरुड इत्यादि ठिकाणीं हातमागाचा उद्योग चालतो. त्यांत सुमारें चार हजार लोक गुंतलेले आहेत.

कोल्हापूर, राशिवडे, हुपरी, सरुड, हलकर्णी, राधानगरी व कागल या ठिकाणीं मातीपासून विटा, कौलें, गाडगीं, मडकीं, घागरी वगैरे बनविण्याचा धंदा चालतो. हा **कुंभारकाम** धंदा सुमारें सात–आठ हजार लोक करतात.

कोल्हापूर, इचलकरंजी, आजरा, राशिवडे, याठिकाणीं सुतार कामाचा धंदा **सुतारकाम** सुमारें पांच–सहा हजार लोक करीत असतात.

चर्मोद्योगचा धंदा करणारे सुमारें चार हजार लोक असून ते कोल्हापूर, इचलकरंजी, वडगांव, गारगोटी, नांदणी, मालेमुडशिंगी या गांवातून आहेत. या भागांत होणारी कोल्हापुरी चप्पल व कापशी चालीचें पायताण सर्वत्र प्रसिद्ध असून महाराष्ट्रांत सगळीकडे **चर्मोद्योग** व उत्तर हिंदुस्थानांतहि त्यांचा खप होतो.

आळते, कबनूर, वडगांव, हुपरी, कोडोली या गांवांमधून वाख कामाचा व **वाख उद्योग** दोरकामाचा धंदा चालतो व त्यांत एकूण तीन–चार हजार लोक गुंतलेले आहेत.

लोहार कामाचा धंदा करणारे लोक प्रमुख्यानें कोल्हापूर, राशिवडे, राधानगरी या ठिकाणीं असून त्यांची संख्या सुमारें अडीच ते साडे तीन हजार आहे.

सोन्या चांदीचे दागिने सोन्याचे व चांदीचे आकर्षक व घाटदार दागिने बनविण्याबद्दल हा भाग प्रसिद्ध आहे. हुपरी, कोल्हापूर, कागल, मडिलगे, गारगोटी या भागांतून सुमारें अडीच ते साडेतीन हजारावर लोक हा धंदा करतात.

वडगांव, हलकर्णी व कोडोली या गांवीं तेल गाळण्याचा धंदा चालतो. त्यांत सुमारें एक हजार लोक

इतर उद्योग काम करतात. कोल्हापूर, वडगांव, गारगोटी, इचलकरंजी व मालेगांव या गांवात कातडी कमविण्याचा धंदा करणारे लोक आहेत. कोल्हापूर, कागल, इचलकरंजी येथें वांबूकाम करणारे लोक असून त्यांची संख्या सुमारें १२ शेंपर्यंत असावी. कोल्हापूर, जयसिंगपूर व इचलकरंजी या ठिकाणीं विड्या बांधण्याचा धंदा फार मोठ्या प्रमाणावर चालतो.

शिवाय पोहे बनविण्याचा धंदा कोल्हापूर, राशिवडे, वाळवे, निगवे, नेसरी, मुरगुड, आजरा येथें चालतो. तसेंच हकलर्णी व नांदणी येथें तपकीर बनविण्याचा धंदा चालतो. पाटगांव ,कळे व आजरा येथें लाखकामाचा धंदा चालतो.

कोल्हापूरची गुळाची व्यापारपेठ भारतांत सर्वत्र प्रसिद्ध आहे. या पेठेंत दरसाल जवळ-

गुळाची व्यापारपेठ जवळ ४० ते ५० लाख गूळ रव्यांची आवक होते. आणि साडेचार–पांच कोटी रुपयांचा गूळ गुजराथ, कर्नाटक, कालिकत, सौराष्ट्र, जपान, इजिप्त, सिलोन, दक्षिण आफ्रिका, ब्रह्मदेश, तुर्कस्थान वगैरे भागांत रवाना होतो.

घरगुती व लघु उद्योगधंदे यांच्या विकासासाठीं कोल्हापूर येथें औद्योगिक कचेरी सुरू करण्यांत आलेली आहे. या कचेरीचें कार्यालय जुना बुधवार पेठ कोल्हापूर येथें आहे.

कचेरीच्या कामाचे मुख्य विभाग खालील प्रमाणें आहेत:–

तांत्रिक शिक्षणाच्या शाळा व उत्पादन केंद्रें चालविणें, वैयक्तिक कारागिराना आर्थिक मदत देणें, नियंत्रित वस्तूंचें वांटप, लहान-मोठ्या उद्योगधंद्याना लागणारा कच्चा व पक्का माल यांची आयात व निर्यात, यंत्रसामुग्रीची आयात व निर्यात यासाठीं लागणारे परवाने देणें, वजन व मापें यांची तपासणी करणें, विद्युत्शक्तीचा वापर करण्यासाठीं आर्थिक सहाय्य देणें.

वरील पांच मुख्य कामांचा तपशील खालीलप्रमाणं :–

तांत्रिक शिक्षणाच्या शाळा व उत्पादन केंद्रे :– कोल्हापूर जिल्ह्यांत कुंभारकामाच्या २, शिवणकामाच्या ३, घोंगडी विणकाम १, चटई विणकाम १, खेळणी १, अशा एकूण ८ फिरत्या शाळा आहेत. या सर्व शाळांत एकूण ५७ विद्यार्थी व ४० विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. शिक्षणाचा काळ साधारणत: ६ महिने तें १ वर्ष असा असतो व प्रत्येकास दरमहा २० ते २५ रुपये विद्यावेतन देण्यांत येते.

सुधारलेल्या उत्पादनाच्या पद्धति व सुधारलेलीं अवजारें यांचा कसा उपयोग करावा यांचें प्रात्यक्षिकासह शिक्षण या शाळांतून देण्यांत येते. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना आर्थिक मदत दिली जाते अगर सहकारी संस्थेचे सभासद करून घेण्यांत येते.

उत्पादन केंद्रें

तसेंच कोल्हापूर येथें दोन उत्पादन केंद्रें (चर्मोद्योग व छत्री) चालू आहेत. चर्मोद्योग केंद्रांत शिक्षण व उत्पादन अशीं दोन्हीं कार्यें चालतात. तसेंच छत्री उत्पादन केंद्रांत छत्र्यांचें उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर होते. याशिवाय कोल्हापूरमध्यें होजिअरी धंद्याचें शिक्षण व उत्पादन केंद्र दोन वर्षें चालू होते व या काळांत अदमासे ४० ते ५० विद्यार्थी व विद्यार्थीनींना शिक्षण देण्यांत आलें. कोल्हापूर हें कातड्याच्या वस्तूबद्दल प्रसिद्ध आहे. येथें बरेच लोक कातडी कमाविण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर करतात. या लोकांना नवीन पद्धतीनें कातडीं कमावण्याचे शिक्षण देण्यासाठीं व उत्पादनाकरितां कातडीं कमावण्याचा कारखाना काढण्यांत येत आहे.

सुशिक्षित, बेकार, अधिकृत कारागिर यांना हत्यारें व अवजारें यांची खरेदी व खेळते भांडवल यासाठीं कर्ज व अनुदान (सबसिडी) देण्याच्या योजनेखाली आजपर्यंत खालीलप्रमाणें आर्थिक मदत देण्यांत आलेली आहे.

	रुपये	कारागिरांची संख्या
सुशिक्षित बेकार	११,७००,००	८
अधिकृत कारागिर	९,८५,०००	१६
मागासलेल्या जातींतील कारागिर	१८,८८,२००	२९
सन १९३५ च्या नियमाप्रमाणें . . .	२९,४७,५००	३५

नियंत्रित वस्तूंचें वांटप

लहान मोठ्या उद्योगधंद्याना लागणारा कच्चा व पक्का माल यांची आयात व निर्यात, यंत्रसामुग्रीची आयात व निर्यात यासाठीं लागणारे परवाने या योजनेखाली, लोखंड, पोलाद, कच्चें लोखंड वगैरे नियंत्रित वस्तूंचे परवाने देण्यांत येतात. अर्ज करण्याची तारीख साधारणपणें प्रत्येक तिमाहीच्या सुरवातीस असते.

वजन व मापे यांच्या तपासणीचे कार्य या कचेरीच्या इन्स्पेक्टरमार्फत केले जाते. दर दोन वर्षांनीं वजन मापे तपासून त्यावर सरकारी शिक्के मारण्यांत येतात.

या योजनेनुसार नोंदण्यांत आलेले लहान प्रमाणावरील उद्योगधंदेच आर्थिक सहाय्यास पात्र आहेत. कोल्हापूर जिल्ह्यांत अदमासे २२५ छोट्या उद्योगधंद्याना वार्षिक रु. ३०,००,००० पर्यंत मदत दिली जाते.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत राज्य सरकारनें औद्योगिक विकासासाठीं औद्योगिक वसाहती स्थापन करण्याच्या योजनेवर भर दिलेला होता. त्याचप्रमाणें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत प्रामुख्यानें हा विषय हाताळण्यांत येत आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत महाराष्ट्र सरकारने कोल्हापूर जिल्ह्याला दोन औद्योगिक वसाहती मंजूर केलेल्या आहेत त्या अनुक्रमें (१) कोल्हापूर शहरांत शिवाजी उद्यमनगर वसाहत व (२) इचलकरंजी औद्योगिक वसाहत या होत.

औद्योगिक वसाहती

वरील योजना सहकारी तत्त्वावर चालविल्या आहेत. कोल्हापूर औद्योगिक वसाहतीचे काम कोल्हापूर उद्यमनगर सहकारी सोसायटी मार्फत चालू आहे. कोल्हापूर येथें अनेक कारखान्यांची वाढ होत आहे याचें श्रेय बऱ्हंशीं येथील औद्योगिक वसाहतींच्या उपक्रमास दिले पाहिजे.

वरील सोसायटयांनी कारखान्यांचे बांधकाम पुरे केलें असून तिथें आतां नवीन २८ते३० धंदे सुरु झाले आहेत. या भागांत अदमासे ५० लाख रुपयांवर भांडवल गुंतविले गेले आहे व वार्षिक उत्पादन जवळजवळ ७० लाख रुपयांवर आहे. येथें १५०० मजूर काम करतात. या कारखान्यांचे काम पाहून त्यांना जरुरी असलेली यंत्रसामुग्री मध्यवर्ती सरकारने या ठिकाणीं बसवून तिचा वापर भाडयानें करुन देण्याची सोय उपलब्ध करून ठेवली आहे. मोठीं जोखमेचीं कामे करणारीं तसेच कच्चा माल तपासून घेण्याचीं यंत्रें, विशिष्ट उष्णता देऊन मालास पाणी देण्याची मूस इत्यादि यंत्रसामुग्री या ठिकाणीं बसविली आहे. ऑईल इंजिन (छोटया कारखान्यांत) तयार करण्याचें हें एक मोठें केंद्र म्हणून समजण्यांत येते. येथें लहान मोठे ऑईल इंजिनचे ४५ कारखाने आहेत. याव्यतिरिक्त या वसाहतींच्या भागांत खालील प्रकारचे इतर लहान लहान उद्योगधंदे चालतात.

(१) ऑईल इंजिनचे सुटे भाग, (२) पॅटर्न मेकिंग, (३) इलेक्ट्रिक स्टार्टर्स, (४) ऑटो बॅटरीज, (५) शीट मेटल वर्क्स, (६) मोटर दुरुस्ती, (७) पुस्तके बांधणे, (८) ओत-काम, (९) सायकल सीट, (१०) गन मेटलचे ओतीवकाम.

दुसऱ्या वसाहतीचें प्राथमिक स्वरुपाचें काम म्हणजे वसाहतीच्या सोसायटीचीं नोंदणी होय. वसाहतीकरितां सरकारी जागा मिळण्याचीं सोय वगैरे कामें झाली असून सोसायटीचे मार्फत दोन मोठे हॉल्स व चार कारखाने बांधण्यांत येत आहेत. या वसाहतीमध्यें यंत्रमाग, इंजिनीयरिंग दुरुस्तीचें काम, ओतीव काम व ऑईल इंजिन तयार करणारे लहान लहान कारखाने येतात. याव्यतिरिक्त कोल्हापूर जिल्ह्यांत तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत खालील तीन ग्रामीण औद्योगिक वसाहती स्थापन करण्याच्या दृष्टीनें विचार चालू आहे.

इचलकरंजी औद्योगिक वसाहत

(१) ग्रामीण औद्योगिक वसाहत, हुपरी.

(२) ग्रामीण औद्योगिक वसाहत, कोडोली.

(३) ग्रामीण औद्योगिक वसाहत, जयसिंगपूर.

या जिल्ह्यांत बॉक्साइट विपुल प्रमाणांत सांपडते असें आढळून आलें आहे. याचा उपयोग करण्याच्या दृष्टीनें एक अॅल्युमिनियमचा कारखाना येथें निघण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

नवीन उद्योगधंद्यांची शक्यता

फार मोठ्या प्रमाणांत असलेल्या खताच्या मागणीचा विचार करतां या जिल्ह्यांत एक खताचा कारखाना निघणे शक्य आहे.

चंदगड तालुका आणि आजरा महालांत लोखंड व मँगनीज हे खनिज पदार्थ विपुल प्रमाणांत आढळून येण्याची शक्यता वाटते. याबाबत या भागांत व जिल्ह्यांतील इतर भागांत संशोधन करून त्यासंबंधीचे कारखाने सुरू होण्याची शक्यता आहे.

भुदरगड तालुक्यांत कांहीं ठिकाणीं विशिष्ट प्रकारची माती उपलब्ध आहे. त्यापासून मंगलोरी कौलें होऊं शकतील. त्या दृष्टीनें जिल्ह्यांतील मातीची पहाणी होऊन एक मंगलोरी कौलाचा कारखाना निघणे शक्य दिसते. त्याप्रमाणें चिनी मातीची भांडी तयार करण्याचा कारखानाहि काढतां येईल.

वर नमूद केलेल्या योजना अंमलांत आणण्यासंबंधीं कोल्हापूर विकास मंडळानें शिफारस केली आहे.

७. खेडे विभागाकरितां वीज

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कोल्हापूर विभागाची कचेरी नागाळा पार्कमध्यें असून या विभागाखालीं कोल्हापूर, सांगली व रत्नागिरी या जिल्ह्यांचा कांहीं भाग येतो. कोल्हापूर जिल्ह्यांत अनेक खेडोंपाडीं विजेचा पुरवठा करण्यांत आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यांत वीज निर्मिति करणारीं व ती प्रसारित करणारीं पॉवर स्टेशनें पुढील प्रमाणें आहेत.

(१) राधानगरी हायड्रोइलेक्ट्रिक पॉवर स्टेशन, (२) इमर्जन्सी इरिगेशन पॉवर स्टेशन (३) डिझेल पॉवर स्टेशन, इचलकरंजी, (४) डिझेल पॉवर स्टेशन, इस्लामपूर

राधानगरीच्या मदतीला कोयना

कोल्हापूर शहरांत सध्यां जो वीजपुरवठा केला जातो तो कांहीं भागांत राधानगरीच्या विजेचा व कांहीं भागांत डिझेल पॉवर स्टेशनवरील विजेचा आहे. राधानगरीहून ३३००० व्होल्टची वीज तारांनी ३३ मैल लांबीवरून कोल्हापुरांत आणलेली आहे. तसेंच बापट पॉवर स्टेशनमध्यें तयार झालेली वीज निरनिराळ्या ठिकाणच्या २७ ट्रॅन्स्फॉर्मर केंद्रांवर नेण्यांत आली असून या तारांची लांबी शहरांत १२ मैलांहून अधिक आहे. राधानगरीची वीज व कोयनेची वीज एकत्रित करून मोठ्या प्रमाणांत वीजपुरवठा करण्याच्या दृष्टीनें सध्या काम चालू आहे. सध्या कोल्हापूरसह १०४ गांवांना वीज देण्यांत आलेली आहे. आणखी सुमारें ४०-५० गांवांना वीजपुरवठा नुकताच सुरू झाला आहे.

नवीन लाईन्स टाकण्यांत आल्या

सध्यां कोल्हापूर शहरांत व ग्रामीण भागांत विजेचा वापर फार मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. सध्याच्या लाईनवर वीज प्रवाहाचा बोजा प्रमाणाबाहेर पडत आहे. तसेंच कोयनेची वीज आल्यानंतर कारखानें, उद्योगधंदे, व्यापार यासाठींहि लोकांना जादा प्रमाणांत वीज द्यावी लागणार आहे. त्याकरितां सध्याच्या लाईन्स (तारा) काढून त्याऐवजीं जास्त विद्युत् प्रवाह वाहूं शकणाऱ्या लाईन्स बसविण्याचें काम नुकतेंच पुरें झालें आहे. सध्या राधानगरीची वीज पुरविण्यांत आलेलीं, कोल्हापूर, सांगली व रत्नागिरी या जिल्ह्यांतील गांवें खालीलप्रमाणें आहेत.

(१) कोल्हापूर
(२) शिरोली
(३) रुकडी
(४) राधानगरी
(५) घुणकी
(६) हुपरी
(७) किणी
(८) रेंदाळ
(९) पट्टण कोडोली
(१०) अंबप
(११) मिणचे
(१२) हातकणंगले
(१३) पाडळी
(१४) वाठार
(१५) अळते
(१६) माणगांव
(१७) रांगोळी
(१८) हेरलें

(१९) रुई
(२०) इंगळी
(२१) टोप
(२२) चंदूर
(२२) नागांव
(२४) कबनूर
(२५) सावर्डे
(२६) नरंदे
(२७) खोची
(२८) भादोले
(२९) तळंदगे
(३०) पारगांव.
(३१) लाटवडे
(३२) भेंडवडे
(३३) कुंभोज
(३४) कोरोची
(३५) पारगांव
(३६) वाठार तर्फ उदगांव
(३७) मौ. सांगाव
(३८) क. सांगाव
(३९) उंचगांव
(४०) वडणगे
(४१) चिखली
(४२) शिगणापूर.
(४३) शिये.
(४४) निगवे (दुमाला)
(४५) तांबेवाडी
(४६) केर्ली
(४७) वरणगे
(४८) पाडळी बु
(४९) वसगडे
(५०) केरले
(५१) हसूर
(५२) हांगवडे
(५३) हळदी
(५४) मुडशिंगी
(५५) शिरोली
(५६) बीड
(५७) कांडगांव
(५८) वाशी
(५९) वळीवडे
(६०) सडोली खासबा
(६१) कुरुकली
(६२) कोथळी
(६३) कोगे
(६४) हनुमंतवाडी
(६५) वाडी रत्नागिरी
(६६) कोडोली
(६७) यवलूज
(६८) माले
(६९) केकले (रत्ना)
(७०) तारळे
(७१) राशिवडे
(७२) घोटवडे
(७३) फेजिवडे
(७४) लाट (शिरोळ)
(७५) शिरदवाड
(७६) कामेरी (वाळवे)
(७७) तांदूळवाडी
(७८) नेर्ले
(७९) शिरगांव
(८०) इटकारे
(८१) शिराळे
(८२) शिरगांव
(८३) कुंडलवाडी
(८४) कासेगांव
(८५) येडेनिपाणी
(८६) बागणी
(८७) पेठ
(८८) मिरिपा
(८९) सातळे
(९०) सरुड
(९१) कुडाळ
(९२) बाहुबली
(९३) तिळवणी
(९४) परिते
(९५) चिखली
(९६) गर्डाहिंग्लज
(९७) नाटोली
(९८) सांगाव
(९९) कारला
(१००) तारदाळ
(१०१) तळसंदे
(१०२) मलकापूर
(१०३) पडळ
(१०४) सांगरुळ

---

८. शिक्षण

कोल्हापूर जिल्ह्यांत उच्च शिक्षण देणारी सात महाविद्यालयें आहेत. त्यांपैकीं राजाराम कॉलेज (सायन्स व आर्टस्) आणि एस. एम. टी. टी. (बी. टी.) कॉलेज हीं दोन सरकारी महाविद्यालयें असून, शहाजी लॉ कॉलेज, कॉमर्स कॉलेज, गोखले कॉलेज, कीर्ति कॉलेज ऑफ आर्टस् (महिला करितां), जनता कॉलेज, अर्जुननगर, खासगी संस्थांकडून चालविली जात आहेत.

महाविद्यालयें

या जिल्ह्यांत ३१ मार्च १९६१ पर्यंत मान्यता मिळालेलीं १२४ विद्यालयें आहेत. हीं विद्यालयें निरनिराळ्या भागांत शैक्षणिक काम करीत आहेत. यांतील सरकारी तीन विद्यालयांपैकीं दोन मल्टी परपज विद्यालयें आहेत. उषाराजे हायस्कूल, कोल्हापूर व शाहू कुमार भवन, गारगोटी हीं दोन खासगी मल्टी परपज विद्यालयें आहेत. श्रीं शिवाजीं टेक्निकल स्कूल नांवाचें एक टेक्निकल हायस्कूल कोल्हापूर येथें असून (१) मेन राजाराम हायस्कूल. कोल्हापूर, (२) न्यू हायस्कूल, कोल्हापूर, (३) विद्यापीठ हायस्कूल, कोल्हापूर, (४) एन पी. हायस्कूल, कोल्हापूर, (५) शिवाजी मराठा हायस्कूल, कोल्हापूर. (६) एस. एस. हायस्कूल, कागल. (७) मुरगुड विद्यालय, मुरगुड, (८) बी. बी. हायस्कूल, (९) महाराष्ट्र हायस्कूल, कोल्हापूर यांना टेक्निकल विभाग सुरुं करण्यास सरकारनें मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणें (१) मेन राजाराम हायस्कूल, कोल्हापूर, (२) मुरगुड विद्यालय, मुरगुड, (३) विक्रम हायस्कल कोल्हापूर व (४) एम. आर. हायस्कूल, गडहिंग्लज यांमध्यें माध्यमिक कॉमर्स विभागाची सोय करण्यांत आली आहे.

माध्यमिक विद्यालयें

प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजें

कोल्हापूर जिल्ह्यांत एकूण सहा ट्रेनिंग कॉलेजें आहेत. सरुड येथील सरकारी प्रायमरी ट्रेनिंग कॉलेज नुकतेंच सुरुं करण्यांत आलें आहे. बाकीची पांच खासगी संस्थांमार्फत चालविली जातात. त्यांपैकीं एक स्त्रियांसाठीं असून तें खुद्द कोल्हापूर शहरांतच आहे. (१) रुकडी (२) वडणगे (३) कुरुंदवाड (४) गारगोटी या चार ठिकाणीं राहिलेली चार ट्रेनिंग कॉलेजें आहेत.

पूर्व प्राथमिक ट्रेनिंग कॉलेज :— या जिल्ह्यांत खासगी संस्थेनें चालविलेलें एकच पूर्व प्राथमिक—प्रायमरी ट्रेनिंग कॉलेज आहे.

कोल्हापूर जिल्हा स्कूल बोर्डामार्फत प्रत्यक्ष चालविण्यांत येणाऱ्या १४४९ व स्कूलबोर्डाकडून मदत दिल्या जाणाऱ्या ३८ अशा एकूण १४५७ शाळा कोल्हापूर शहर सोडून जिल्ह्याच्या सर्व भागांत पसरल्या आहेत. कोल्हापूर नगरपालिकेचे स्वतंत्र स्कूलबोर्ड असून त्यामार्फत शहरांत ९९ शाळा चालविल्या जातात.

प्राथमिक शाळा

पूर्व प्राथमिक शाळा जिल्ह्यांत एकूण २९ पूर्व प्राथमिक–प्रायमरी शाळा आहेत.

जिल्ह्यांतील ज्या गांवांची लोकसंख्या २०० आणि त्यापेक्षां अधिक आहे तेथील ७ ते ११ वर्षे वयांच्या मुलांकरितां प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यांत आलें आहे.

जिल्ह्यांत चार एस. टी. सी. इन्स्टिटयूशन्स, एक सी. पी. एड. इन्स्टिटयूशन, एक वैदिक स्कूल एक संगीत विद्यालय, एक मुक्या बहिऱ्यांची शाळा, पांच आर्टस् स्कूल्स, एक हिंदी विद्यालय व एक गृहिणी महाविद्यालय आहे. मात्र या शिक्षण संस्थांची संख्या अपुरीच वाटते.

इतर शैक्षणिक संस्था

निपाणीजवळ अर्जुननगर येथें जनता महाविद्यालय नांवाचे नवीन कॉलेज जून १९६१ पासून सुरु झाले आहे. इचलकरंजीलाहि एक कॉलेज सुरु करावे असा प्रयत्न चालूं आहे. कोल्हापूर जिल्ह्यांत अलीकडेच पॉलिटेक्निक कॉलेजहि निघाले आहे. या खेरीज गारगोटी येथील मौनी विद्यापीठ, गृहिणी महाविद्यालय, शिक्षण प्रसारक मंडळ, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था इ. संस्थाहि कार्यरत आहेत. तसेंच नव्या महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विषयक उदार धोरणामुळें जिल्ह्यांतील दुय्यम शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. १९६०-६१ मध्यें जिल्ह्यांतील १२४ दुय्यम शाळेंत २५१४३ विद्यार्थी शिकत होते.

महाराष्ट्र राज्य सरकारच्या प्रकाशन विभागामार्फत या जिल्ह्यांतहि ग्रामीण भागांत निरनिराळ्या संस्थांना योजनेनुसार रेडिओ देण्यांत आले आहेत. ग्रामीण जनतेच्या दृष्टीनें हे सार्वजनिक रेडिओ सेटस् फार महत्त्वाची कामगिरी पार पाडीत आहेत. अखिल भारतीय आकाशवाणीच्या प्रादेशिक केंद्रावरून प्रसारित होणारे नानाविध कार्यक्रम ग्रामीण जनतेपर्यंत पोंचविण्याचें कार्य या रेडीओसेटस्च्या द्वारें केले जात आहे. तसेंच नभोवाणी शेतकरी मंडळाचा कार्यक्रमहि खूप लोकप्रिय झालेला आहे.

ग्रामीण रेडियो

कोल्हापूर जिल्ह्यांत सध्यां चालूं असलेल्या (१) करवीर, (२) पन्हाळा, (३) चंदगड, (४) भुदरगड, (५) शाहुवाडी, (६) शिरोळ या सहा विकास गट योजनांमार्फत खालील प्रमाणे तांत्रिक शिक्षणाच्या शाळा चालूं आहेत.

(१) टेलरिंग स्कूल ३
(२) महिला टेलरिंग स्कूल.........................२
(३) लेदर वर्किंग स्कूल............................१
(४) ग्लास टॉईज स्कूल.............................२
(५) सोप मेकिंग युनिट..............................१
(६) कॉटन विव्हिंग स्कूल...........................१

(७) व्हिलेज पॉटरी युनिट २
(८) कारपेन्टरी अॅन्ड स्मिथी स्कूल ३
(९) वूल विव्हींग स्कूल १
(१०) केन अॅन्ड बांबू स्कूल २

वरील सर्व तांत्रिक शिक्षण शाळांमध्यें १९६१ पर्यंत २९० विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतलें आहे.

औद्योगिक-प्रशिक्षण

कोल्हापूर येथें संस्थानाच्या कारकीर्दीपासून शिवाजी टेक्निकल इन्स्टिटयूट ही संस्था चालू आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील कार्यक्रमानुसार या संस्थेंतील अभ्यासक्रम वाढविण्यांत येऊन जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत आला. पहिल्या पंचवार्षिक योजनेपूर्वी सदर संस्थेंत फक्त ४० ते ५० विद्यार्थ्यांनाच सर्टिफिकेट कोर्सचे तांत्रिक शिक्षण देण्याची सोय होती. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ८ वी पासून ११ वी पर्यंतच्या इयत्तांच्या विद्यार्थ्यांना या संस्थेंत प्रवेश देण्यांत येऊन विद्यार्थ्यांची प्रवेशमर्यादा ५० वरून २०० वर नेण्यांत आली. त्याचप्रमाणें संस्थेस लागणारी उपकरणें, नोकरांचे पगार, फर्नीचर यावरील खर्च वाढविण्यांत आला. यासाठीं पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत १,४३,५०० रुपये खर्च करण्यांत आले. तसेंच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांतहि आणखी एक जादा वर्ग वाढविण्यांत येऊन जादा ५० विद्यार्थ्यांची सोय करण्यांत आली आणि फर्नीचर व उपकरणें यासाठीं आणखी ८२५० रुपये खर्च करण्यांत आले. सध्यां या संस्थेंत सुतारकाम, इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल हे एस. एस. सी. चे विषय शिकवले जातात. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेखालीं कांहीं जादा तुकडया उघडण्यांत येत आहेत.

शिवाजी टेक्निकल इन्स्टिटयूट, कोल्हापूर

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील कार्यक्रमानुसार शिवाजी टेक्निकल स्कूलच्या इमारतींतच सदर स्कूलला जोडून सरकारी पॉलिटेक्निक नुकतेच सुरु करण्यांत आलें आहे. या पॉलिटेक्निकमध्यें १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. सध्यां जागेच्या अभावी फक्त ६० विद्यार्थ्यांची सोय करण्यांत आली आहे. या पॉलिटेक्निकसाठीं गोखले कॉलेज नजिक नवीन प्रशस्त इमारत बांधण्यांत येत आहे.

गव्हर्न्मेंट पॉलिटेक्निक

शिवाजी टेक्निकल स्कूलला जोडूनच प्रारंभीं कांही धंद्यांचें शिक्षण देणारी एक संस्था सुरु करण्यांत आली होती. या संस्थेतच गरजेनुसार पुढें हळूहळू आणखी जादा धंदे वाढविण्यांत आले व ती एक स्वतंत्र संस्था झाली. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत ही संस्था मध्यवर्ती सरकारकडूनच चालविली जात होती. ऑक्टोबर १९५६ पर्यंत ही संस्था मध्यवर्ती सरकारच्या ताब्यांत असली तरी तिचा खर्च केंद्र सरकार व राज्य सरकार अनुक्रमें ६० व ४० टक्के या प्रमाणांत करीत असत. पुढें नोव्हेंबर १९५६ पासून ही संस्था पूर्णतया राज्य सरकारच्या ताब्यांत आली. मात्र खर्चाचा वांटा पूर्वीप्रमाणेंच केंद्र सरकार ६० टक्के व राज्य सरकार ४० टक्के याप्रमाणें चालू राहिला. राज्य सरकारकडें ही संस्था आल्यानंतर सर्व शिक्षणक्रमांची फेररचना करण्यांत आली. एकंदर कारखान्यांच्या गरजेच्या दृष्टीनें शिक्षणक्रम ठेवण्यांत येऊन ते दोन दोन वर्षांचें केले. या दोन वर्षांपैकीं १८ महिने संस्थेंत शिक्षण व ६ महिने तत्संबंधीच्या कारखान्यांत प्रत्यक्ष काम करून अनुभव घेणें अशी योजना अंमलांत आणली गेली.

इंडस्ट्रियल ट्रेनिंग सेंटर

शिक्षणाच्या सोयी



- महाविद्यालयें (आर्टस्)
- " (सायन्स)
- " (कॉमर्स)
- " (बी.टी.)
- ग्रामीण विद्यापीठ
- ट्रेनिंग कॉलेजेस्
- आयस्कूल्स आणि मिडल स्कूल्स

टीप –
संदर्भाच्या खुणेच्या वरील आंकडे त्या त्या तालुक्यातील संस्थांच्या संख्या दाखवितात

९. दळणवळण व वाहतूक

साधारणपणें गेल्या शंभर वर्षांपूर्वी या भागांत म्हणजे तत्कालीन कोल्हापूर संस्थानांत वाहतुकीची परिस्थिति फारच अडचणीची होती. पावसाळ्यामध्यें तर बहुतेक ठिकाणचीं वाहतूक अजिबात बंद पडलेली असे. १८४५ ते १८५४ च्या दरम्यान या परिस्थितींत सुधारणा होऊन सुमारें ३०० मैल लांबीचे रस्ते केले गेले. १८८६ च्या सुमारास कांहीं लहान सहान रस्ते आणि पुणें–बेळगांव, कोल्हापूर–आंबाघाट, कोल्हापूर–फोंडा घाट आणि संकेश्वर–परपोली **वाहतूक आणि रस्ते** हे चार मोठे रस्ते झालेले होते. त्याशिवाय २१ एप्रिल १८६१ पासून कोल्हापूर-मिरज हा रस्ता वाहतुकीसाठीं चालू झाला. वाढत्या सुधारणांबरोबर कोल्हापूर जिल्ह्याचें अंतर्गत व बाह्य प्रदेशांशीं दळणवळण वाढत चालल्याने अनेक नवेनवे मार्ग झाले असून सध्या सुमारें १००० मैल लांबीचे रहदारीचे उत्तम रस्ते अस्तित्वांत आहेत. शिवाय विकास योजनेमध्यें व स्थानिक विकास कार्यक्रमानुसार ग्रामस्थानीं केलेल्या जोड–रस्त्याची लांबी शेकडो मैल भरेल. कोल्हापूर जिल्ह्यांतून उत्तर-दक्षिण जाणारा पुणें–बेंगलोर हा एकमेव राष्ट्रीय वाहतुकीचा मार्ग असून त्याचा २८ मैल ७ फ. भाग या जिल्ह्यांत आहे. हा रस्ता पूर्णपणें डांबरी झाला असून सध्या त्याची असलेली रुंदी वाढवून ३८ फूट करण्याचें काम चालूं आहे. जिल्ह्यांतील वाहतुकीचे प्रमुख रस्ते पुढीलप्रमाणें आहेत.

रस्त्याचें नांव	काम	लांबी	
कोल्हापूर–रत्नागिरी	डांबरी व काँक्रीट	४१ मैल	
देवगड–निपाणी–कळदगी	डांबरीकरण चालूं आहे.	४३.५५मैल	
कोल्हापूर–अंकली–सांगली	संपूर्ण डांबरी, रस्त्याची रुंदी २४ फुटाची ३२ फूट करण्यांत येत आहे.	२१.२७	मैल
वेंगुर्ला–बेळगांव–बागलकोट–बेल्लारी	डांबरीकरण चालू आहे	२६.९९	मैल
कोल्हापूर–गगनबावडा	,,	३२.००	मैल
पन्हाळा–वाघबीळ	,, ,, पूर्ण	४.००	मैल
केर्ली वाडीरत्नागिरी (जोतीबा)	,, ,, ,,	६.७५	मैल
कोल्हापूर–गैबी	डांबरीकरण व कांक्रीट चालूं आहे.	२३.९३	मैल
हातकणंगले–वाठार वोरपाडळे	,,	२३.८७	मैल

हातकणंगले–इचलकरंजी	,,	४.६९	मैल
जयसिंगपूर–शिरोळ–नृसिंहवाडी	,,	७.१२	मैल
गडहिंग्लज–आजरा–सावंतवाडी	खडीचा पक्का रस्ता	२७.००	मैल
गडहिंग्लज–भडगांव– महागांव–नेसरी–अडकूर	खडीचा व मुरुमाचा पक्का रस्ता	१७.००	मैल
जयसिंगपूर–शिरोळ–कुरुंदवाड–हेरवाड– सौदलगे	,, ,,	१२.६	मैल
बांबवडे–शिरोळ	,,	८.०	मैल
गारगोटी–आकुर्डे–पाटगांव–हनुमंतवाडी	,,	२७.१	मैल
भडगांव–घन्नेकुपी–नूल–बसर्गे–हलकर्णी– खानापूर	कच्चा रस्ता	१०. ०	मैल
चंदगड–शिरगांव	खडीचा पक्का रस्ता	१.४३	मैल
कारवे–पाटणे	,,	८– ०	,,
चंदगड–पार्ले	,,	६.२५	,,
नागनवाडी–अडकूर	खडीचा मुरुमाचा रस्ता	७	,,


याशिवाय वरील रस्त्यांना येवून मिळणारे अगर स्वतंत्र असणारे असे अनेक कच्चे रस्ते आहेत. त्यातील २९ रस्ते नेहमीच्या रहदारींचे असून त्यांची एकूण लांबी २५० मैलांहून जास्त आहे.

पूल

या जिल्ह्यांत लहान–मोठया अनेक नद्या व नाले असल्यानें रहदारीच्या सोयीसाठीं त्यांवर अनेक ठिकाणीं पूल बांधण्यांत आले आहेत. त्यांपैकीं नद्यांवरील अथवा ओढचांवरील प्रमूख पूल खालीलप्रमाणें आहेत.:

रस्ता	नदी–नाला	
पुणें–बेंगलोर	पंचगंगानदी (शिरोलीनजिक) या पुलाची कालमर्यादा संपल्यानें त्याला बळकटी आणण्यासाठीं सिमेंट कांक्रिटचें काम चालू आहे.	
रत्नागिरी–कोल्हापूर मिरज	कडवी नदी	दगडी कमानीचा पूल
,,	शाली नदी	,, ,, ,,
,,	बांबवडे ओढा	,, ,, ,,
,,	पंचगंगा (कोल्हापूर	,, ,, ,,)
वेंगुर्ले–बेळगांव–बागलकोट–बेल्लारी	घटप्रभा नदी	लोखंडी गर्डर्सचा पूल
,,	ताम्रपर्णीनदी	,,
वाठार–बोरपाडळे		नाला आर. सी. सी. पूल
,, ,,		,, ,, ,, ,,
निपाणी–फोंडाघाट		लोखंडी पूल
,, ,,	वेदगंगा नदी	दगडी पूल
,, ,,	दूधगंगा ,,	लोखंडी पूल

रस्ते व रेल्वेमार्ग



सांगली
जिल्हा
रत्नागिरीकडे
मलकापूर
विशाळगडास
कोडोली
पुण्यास
आष्ट्यास
वडगांव
मिरजेस
पन्हाळा
जोतीबा
जयसिंगपूर
हातकणंगले
भोगांव
गांधीनगर
रुकडी
कुरुंदवाड
कोल्हापूर
इचलकरंजी
हासूर
कागल
घोटवडे
गगनबावडा
बेळगांवास
निपाणीस
राधानगरी
गारगोटी
सोलापूरास
संकेश्वरास
गडहिंग्लज
आजरा
अंबोलीहून
पुंद्रा
शिरगांव
चंदगड
तांबुळवाडी
मोटार रस्ता
रेल्वेमार्ग
प्रवाश्यांसाठीं निवासस्थानें

संकेश्वर–आंबोलीघाट	मुत्नाळनाला	दगडी पूल
,, ,,	हिरण्यकेशी नदी	,,
कोल्हापूर–गगनबावडा	भोगावतीनदी	,,
,, हनुमंताघाट	वेदगंगा नदी	,,
साठमारी–राजारामपुरी रोड	गोमतीनाला	आर. सी. सी. पूल
,, ,,	जयंतीनाला	
इचलकरंजी	पंचगंगानदी	
कोल्हापूर–पाटगांव	दूधगंगा नदी	(कासारवाडा नजिक)
,, गगनबावडा	साळवण नदी	

तसेंच हिरण्यकेशी नदीवर भडगांवनजिक नुकताच पूल बांधण्यांत आला आहे. आंबेवाडी चिखली नजिक प्रयागवरहि पुलाचें काम नुकतेच पुरें झालें. त्याशिवाय नद्यांवर अनेक ठिकाणीं जलसंचय व रहदारी या दोहोंना उपयुक्त अशीं पूलवजा धरणें विकास योजनेमधून बांधण्यांत आलीं आहेत. कोल्हापूर नजिक एक छोटासा विमानतळहीं आहे.

सार्वजनिक बांधकामें

इमारती.... निरनिराळचा विभागांच्या कामकाजाच्या सोयींसाठीं, कार्यालयासाठीं, नोकरवर्गासाठीं व जनतेस उपयुक्त अशा इमारतीहि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून, विकास गटांतून व लोकल बोर्डाकडून बांधल्या गेल्या आहेत. कांहींचीं कामें चालू आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अलीकडेच बांधण्यांत आलेल्या कामांचीं त्रोटक माहिती खालीलप्रमाणें आहे.

राजाराम कॉलेज साठीं करण्यांत आलेल्या सुधारणा व फेरबदल

पोल्ट्री ट्रेनिंग–क्लाससाठीं इमारती. (कोल्हापूर)

पन्हाळा येथें प्रवाश्यांसाठीं विश्रांतीस्थानाच्या इमारती :–(हॉलिडे होम्स) बांधण्यांत आल्या. कोल्हापूर येथील शेतकी शाळेच्या इमारती, राधानगरी येथील गुदामें, कोल्हापूर सेंट्रल जेलकरितां जादा बरॅक्स वगैरे कामें बऱ्याच अंशीं पुरीं करण्यांत आलीं आहेत. कोल्हापूर येथील पोल्ट्री ब्रीडिंग सेंटरसाठीं इमारती बांधण्यांत येऊन थोडीफार अपुरी राहिलेली कामेंही पूर्ण करण्यांत आलीं. गडहिंग्लज येथील जनावरांचा दवाखाना व इतर इमारतीहि बांधण्यांत आल्या आहेत.

राहण्याकरितां घरें १९६०–६१ सालीं कोल्हापूर येथील डिस्ट्रिक्ट जेलच्या नोकरवर्गाकरितां राहण्याचीं घरें, पन्हाळा येथील हॉलीडे कॅपसाठीं जादा तीन घरें, कोल्हापूर येथील ट्रेनिंग-कम-प्रॉडक्शन सेंटरच्या इमारती, कोल्हापूर येथील एक्स्टेन्शन ट्रेनिंग सेंटरसाठीं इमारती, हीं कामें पुरीं करण्यांत आलीं. सरकारी छापखान्यांसाठीं जादा इमारत आणि सरकारी वाहनासाठीं गॅरेजही याच काळांत बांधलें गेलें. १९६१–६२ सालीं करावयाच्या कामांत कोल्हापूर येथील नवीन सिव्हिल हॉस्पिटलमधील परिचारिकांकरिता राहण्याच्या जागा, ग्रामसेवकांच्या शिक्षणासाठीं-इमारती, गडहिंग्लज येथील इन्स्पेक्शन बंगला, कोल्हापूर येथें सात पोलीस सबइन्स्पेक्टर्स व चौसष्ट पोलिसांच्या चाळी, कोल्हापूर येथील ऊंस संशोधन केंद्र, कडगांव-हमीदवाडा व सरवडे येथील जनावरांचे दवाखाने

व संबंधित इमारती (त्यांतील जनावरांच्या दवाखान्याचीं कामें सुरुही झालीं आहेत.) राधानगरी येथील सिव्हिल जज्ज यांच्यासाठीं राहण्याचे घर, कोल्हापूर येथील सिव्हिल हॉस्पिटलसाठीं पब्लिक हेल्थ लॅबोरेटरी वगैरे कामांचा प्रामुख्यानें समावेश होतो. यांपैकी कांहीं सुरु झालीं असून इतर कामें लौकरच पुरी होतील.

संकल्पित इमारती

कोल्हापूरः—सिव्हिल हॉस्पिटलमधील गर्दी व जागेची अडचण लक्षांत घेवून पुणें-बंगलोर रस्त्याला लागून मिशन हॉस्पिटलच्या पिछाडीस नवीन हॉस्पिटल बांधण्याचें ठरलें आहे. त्याचा प्लॅनहीं आर्किटेक्टकडून तयार होऊन आला असून एस्टिमेट तयार करणें, मंजुरी मिळविणें वगैरे काम जोरांत सुरू आहे.

राजाराम कॉलेजची नवीन इमारत

स्वातंत्र्योत्तर काळांत उपलब्ध होत गेलेल्या शैक्षणिक सवलती आणि ज्ञानार्जनाची वाढती प्रवृत्ति यांमुळें शैक्षणिक संस्थांत सर्वत्र वाढती गर्दी दिसून येते. राजाराम कॉलेजही त्याला अपवाद नाहीं म्हणूनच या कॉलेजची नव्या जागेवर नव्यानें उभारणी करणें क्रमप्राप्त झाले. त्यासाठीं सारंगमाळवरील जागा ताब्यांत घेण्यांत आली. त्याचप्रमाणें कोल्हापूर येथें इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिटयूट व पॉलिटेक्नीक यांसाठींहीं इमारती बांधण्याची योजना चालू आहे.

१०. सार्वजनिक आरोग्य

कोल्हापूर जिल्ह्यांत जनतेच्या आरोग्य रक्षणाचें कार्य सरकारी दवाखाने, नगरपालिका, जिल्हा लोकल बोर्ड, पब्लिक हेल्थ डिपार्टमेंट यांच्या मार्फत केलें जात आहे. कोल्हापूरला असलेलें छत्रपति प्रमिला-राजे (सी. पी. आर. हॉस्पिटल) हें सर्वांत मोठें हॉस्पिटल असून "सिव्हिल हॉस्पिटल" या नांवानेंहि तें ओळखलें जातें. या हॉस्पिटलच्या जोडीला खासगी व निमसरकारी संस्थांचे किती तरी आणखी लहानसहान दवाखाने, औषधालयें, उपचार केंद्रें आहेत.

कोल्हापूरचें सी. पी. आर. हॉस्पिटल १८८४ मध्यें त्यावेळच्या संस्थानिकांनीं सुरूं केलें असून १९४९ पासून तें या सरकारकडे गेलें आहे. या दवाखान्यांत २०० बेड्सची सोय असून 'क्ष' किरणविभाग, आउट डोअर विभाग, मेडिकल स्टोअर्स, लॅबोरेटरी, लिनन असे पांच विभाग तेथें आहेत. या दवाखान्यांत नर्सेसना शिक्षण देण्याचीहि सोय आहे.

तसेंच सी. पी. आर. हॉस्पिटलमध्यें क्षय रोग्यांवर उपचार करण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यांत आली आहे. या जिल्ह्यांत गेल्या कांहीं वर्षापासून ग्रामीण वैद्यकीय उपचार केंद्राची योजना चालूं असून या योजनेखालीं ११७ केंद्रें चालूं आहेत. या केंद्रांमध्यें सर्वसामान्य रोगांवरील ठराविक औषधें ठेवण्यांत आलेलीं असतात. तीं खेडुतांना परवडतील अशा अल्पशा किंमतींत पुरविली जातात. हीं केंद्रें प्राथमिक शिक्षक, ग्राम पंचायत सेक्रेटरी, सामाजिक कार्यकर्ते चालवितात.

दवाखानें व औषधोपचाराच्या सोयी

या जिल्ह्यांत जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठीं असलेले सरकारी, नगरपालिकांचे व खाजगी दवाखाने या संबंधींची माहिती खालीलप्रमाणें आहे.

दवाखाने	मंजूर रुग्णसंख्या	१९६० मध्यें रुग्णांची संख्या इनडोअर	उपचार केलेल्या रोग्यांची संख्या आउटडोअर
१	२	३	४
सरकारी इस्पितळें			
छत्रपति प्रमिलाराजे हॉस्पिटल,कोल्हा पूर	२००	९२१४	६८,१६२
सर्व्हिसेस हॉस्पिटल	३७	७७५	१८,७४५
गांधीनगर वसाहत, हॉस्पिटल, वळि–वडे	४८	६३७	२८,७५६
पोलीस हॉस्पिटल, सांबरे	२६	१०६५	१५,१५०
सरकारी दवाखाने			
आजरा	–	१४	९,१०८
बांबवडे	२	८५	११,५४४
गडहिंग्लज	६	१९८	१४,३५९
गगनबावडा	–	१	५,०१५
गारगोटी	४	१७९	१७,००८
कागल	६	३०२	१२,१९५
कापशी	२	५३	१०,७५४
कुरुंदवाड	६	२८९	११,९३४
मलकापूर	५	१२२	११,७४३
मुरगुड	४	११९	७,४९१
पन्हाळा	४	३६	५,७३८
राधानगरी	३	२३१	५,८९६
शिरोळ	५	४१	१२,९७५
वडगांव	१०	४२७	१२,१०४
फिरता दवाखाना			
फिरता दवाखाना, कोल्हापूर			३६७२

एस. एम. पी. सेंटर्स

हलकर्णी (ता. चंदगड).	ॲलोपथिक	६६९४
हेरे ,,	आयुर्वेदिक	
कोवाड ,,	,,	
घोटगेवाडी ,,	,,	
गणेशवाडी ता. शिरोळ	,,	
अकिवाट ,,	,,	
मांगवली म. बावडा	,,	
साळवण ,,	,,	

याशिवाय या जिल्ह्यांत ९६ ग्रामीण वैद्यकीय उपचार केंद्रें (रुरल मेडिकल रिलीफ सेंटर्स) आहेत

या जिल्ह्यांत निरनिराळ्या नगरपालिकांमार्फत चालू असलेले दवाखाने खालील-प्रमाणें आहेत.

कोल्हापूर नगरपालिका

रुग्णालयाचें नांव
सावित्रीबाई फुले प्रसूतिगृह
शाहू होमिओपथिक डिस्पेन्सरी
शिवाजी अॅलोपथिक
अहिल्याबाई डिन्स्पेन्सरी 'इ वार्ड'
" " ब्रॅच टेंबलाईवाडी
म. ज्योतिबा फुले "
बी वार्ड "
सी वार्ड "
छत्रपति महाराणी ताराबाई अॅलोपथिक डिस्पेन्सरी 'ए वार्ड
कदमवाडी आर्यांग्ल डिस्पेन्सरी
डॉ. आंबेडकर "

इचलकरंजी नगरपालिका

दवाखाना	मंजूर रुग्णासंख्या	१९६० मध्यें उपचार केलेल्या रोग्यांची संख्या	
		इनडोअर	आउटडोअर
के. ई. एम. हॉस्पिटल आणि प्रसूतिगृह	१४	९४२	२८२५५

जिल्हा लोकल बोर्डाचे दवाखाने

कोल्हापूर जिल्हा लोकल बोर्डामार्फत खालील गांवीं आयुर्वेदिक दवाखानें चालू केले आहेतः— (१) भुये, (२) सांगरुळ, (३) पारगांव, (४) हातकणंगले, (५) कुंभोज, (६) कोथळी, (९) सोळाकूर, (८) राशिवडे, (९) तारळे, (१०) म्हासुर्ली, (११) भेडसगांव, (१२) विरळे, (१३) करंजफेन, (१४) पिंपळगांव, (१५) कडगांव, (१६) सिद्धनेर्ली, (१७) हमीद वाडा, (१८) क. सांगाव, (१९) कोतोली, (२०) बाजारभोगांव, (१२) सातवे, (२२) वैभववाडी, (२३) भुईबावडा, (२४) भादवण, (२५) गवसे, (२६) उत्तुर, (२७) नेसरी, (२८) महागांव, (२९) हलकर्णी, (३०) धोसरवाड.
चंदगड येथें एक अॅलोपथी दवाखाना चालू आहे.

खाजगी संस्थांचीं रुग्णालयें

मेरी वानलेस हॉस्पिटल, कोल्हापूर
सेंट अँड्रचूज डिस्पेन्सरी (स्त्रिया व मुलांकरितां)

आणि कुष्ठ रोग दवाखाना, कागल

विल्सन मेमोरियल हॉस्पिटल, कोडोली

शशिकला टी. बी. सॅनटोरियम, जयसिंगपूर

पूर्वीच्या कोल्हापूर संस्थानच्या कारकीर्दीत १९४४ मध्यें कोल्हापूरच्या दक्षिणेस सुमारें दीड–दोन मैलांवर शेंडापार्क कुष्ठधाम सुरूं झालें. त्यानंतर १९५३ पासून या कुष्ठ धामाची व्यवस्था पाहण्यासाठीं सरकारनें एका मेडिकल ऑफिसरची नेमणूक केली व नऊ सभासदांची एक सल्लागार

शेंडा-पार्क कुष्ठ धाम

समितीहि नेमली. येथें रोग्यांना रिकाम्या वेळीं कातडीं कमावणें, शेती इत्यादि धंदे करण्यांत उत्तेजन दिलें जातें. या कुष्ठ धामाची एकूण ४९० एकर जमीन असून डेअरी विभागांस ११० जनावरें आहेत. तसेंच पोल्ट्री विभागांत १५० पक्षी आहेत. डेअरीतील दूध व कोंबडयांची अंडीं कुष्ठरोग्यांना देण्यांत येतात. त्यांच्या मनोरंजनासाठीं रेडिओ, भजनीमंडळ आहे. या कुष्ठधामामध्यें १५० कुष्ठरोग्यांची व्यवस्था आहे. कुष्ठ रोगाच्या प्रसारास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीनें त्यांना एकत्र आणून ठेवणें व रोग झालेल्या लोकांवर औषधोपचार करणें असें दुहेरी कार्य या ठिकाणीं केलें जात आहे. या कुष्ठधामावर कोल्हापूरचे सिव्हिल सर्जन देखरेख ठेवतात.

शाहूवाडी तालुक्यांत व पन्हाळा महालांतहि कुष्ठरोग निवारण केंद्रें असून वडगांव व गडहिंग्लज येथेंहि दोन केंद्रे उघडण्यांत आलीं आहेत.

रक्तदान मोहीम कोल्हापूरच्या छत्रपति प्रमिलाराजे हॉस्पिटलमध्यें १९६० पासून रक्तदान मोहिमेची सुरवात झाली असून तेथें 'ब्लड बँक' उघडण्यांत आली आहे.

ग्लुकोज सलायनची निर्मिती

सी. पी. आर. हॉस्पिटल हा या भागांतील मोठा दवाखाना असल्यानें या दवाखान्यांत दिवसेंदिवस ग्लुकोज सलायनची फार मोठ्या प्रमाणावर गरज भासते आहे. ही गरज भागविण्याच्या दृष्टीनें "ग्लुकोज सलायन"ची या दवाखान्यांतच निर्मिति करण्याची योजना सरकारनें मंजूर केली असून निर्मितीचें काम चालूं झालें आहे.

कुटुंब नियोजन केंद्र


सी. पी.आर.हॉस्पिटलमध्यें कुटुंब नियोजन केंद्र ता.७–११–१९६०पासून सुरू करण्यांत आलें असून या केंद्रात सर्व प्रकारचीं उपयुक्त अशीं उपकरणें ठेवलीं आहेत. हें केंद्र सुरू झाल्यापासून मे १९६१ अखेर ३३६२ लोकांनी त्याचा फायदा घेतला.

रिजनल पब्लिक हेल्थ लेबॉरेटरी

पाणी व अन्न यांची चिकित्सा करण्यासाठीं सरकार कोल्हापूर येथें "प्रादेशिक सार्वजनिक आरोग्य रसायन शाळा" (रिजनल पब्लिक हेल्थ लेबॉरेटरी) सुरू करीत असून तिच्या प्राथमिक कामकाजास सुरुवात झाली आहे. वाढत्या गरजेनुसार सी. पी. आर. हॉस्पिटल मधील नोकरवर्ग वाढविण्यांत आला असून जरूर त्या सुधारणाही करण्यांत येत आहेत. पुणें विद्यापीठांतून एम. बी. बी. एस. पदवी परीक्षा पास होणाऱ्यांपैकी सहा विद्यार्थ्यांना येथें दरवर्षी ग्रामीण भागांतील पदव्युत्तर शिक्षणक्रम पुरा करण्यासाठीं एक वर्ष ठेवलें जातें.

सध्यां या हॉस्पिटलमधील नर्सेससाठीं राहण्याची चांगली व्यवस्था नाहीं. परंतु सरकारनें या दवाखान्यालगत ११८ नर्सेससाठीं क्वार्टर्स बांधण्याचें मंजूर केलें असून प्राथमिक तयारी चालूं आहे.

दवाखान्याच्या सोयी


विरळे
भेडसगांव
मलकापूर
बांबवडे
सातवे
कोडोली
पारगांव
कुंभोज
कोथळी
पन्हाळा
करंजफेन
कोतोली
भुये
बडगांव
हातकणंगले
जयसिंगपूर
शिरोळ
बाजार भोगाव
कळे
गांधीनगर
गणेशवाडी
कुरुंदवाड
सांगरूळ
कोल्हापूर
अकिवाट
घोसरवाड
साळवण
बीड
इस्पुर्ली
शिरोली
मांगवली
सिद्धनेर्ली
क.सांगांव
कागल
म्हासुर्ली
राशिवडे
भुईबावडा
गगनबावडा
घोटवडे
कवाळवे
हमीदवाडा
वैभववाडी
तारळे
वाळवे
सोळांकूर
सरवडे
राधानगरी
मुरगुड
कापशी
गारगोटी
पिंपळगांव
उत्तूर
गडहिंग्लज
कडगांव
हलकर्णी
भादवण
महागांव
गवसे
आजरा
नेसरी
कोवाड
हेरे
हलकर्णी
घोटगेवाडी
सरकारी दवाखाने
सरकारी इस्पितळें
एस्. एम्. पी. सेंटर्स
प्राथमिक आरोग्य केंद्रें
जिल्हा लोकल बोर्डाचें दवाखाने
जनावरांचे दवाखाने

कोल्हापूरच्या आसपासच्या जिल्ह्यांतील आजारी माणसें कोल्हापूरच्या सी. पी. आर. हॉस्पिटल-कडेच धाव घेतात. त्यामुळें या दवाखान्यांत नेहमीं गर्दी असते. वाढत्या गर्दीच्या सोयीसाठीं कोल्हापूर शहराच्या पूर्व भागांत टेंबलाई रस्त्यानजिक 'विचारे माळ' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या जागेवर दवाखान्याची नवीन इमारत बांधण्याचें काम हातीं घेण्यांत आलें आहे. इमारत बांधण्याची सर्व सिद्धता झालेली असून त्या ठिकाणीं लवकरच प्रचंड इमारत उभी राहील. त्याचप्रमाणें गडहिंग्लज, राधानगरी, आणि कुरुंदवाड या ठिकाणच्या सरकारी दवाखान्यांच्या इमारतींची दुरुस्ती व वाढ करण्याचें काम सुरू आहे. बांबवडे येथें सरकारी दवाखान्याच्या इमारतीसाठीं धर्मशाळेच्या इमारतीचीहि दुरुस्ती व वाढ करण्याचे काम हातीं घेण्यांत येत आहे.

दवाखान्याची नवीन इमारत

निरनिराळ्या साथीच्या रोगांना आळा घालणें, त्यासाठीं प्रतिबंधक इलाज योजणें, रोगांचा प्रादुर्भाव झाल्यास तो पसरूं नये म्हणून तात्काळ इलाज करणें, सार्वजनिक स्वच्छता पाहणें, निरनिराळ्या रोगांवरील प्रतिबंधक लस टोंचणें इ. कामें सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्याकडून केलीं जातात. त्याचप्रमाणें प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या द्वारें बाळंतपणें, शिशुसंगोपन व औषधउपचाराचें कार्यहि केलें जातें. त्यासाठीं मेडिकल ऑफिसर्स, सॅनिटरी इन्स्पेक्टर्स, व्हॅक्सिनेटर्स, नर्सेस 'मिडवाईव्हज, दाया इत्यादि नोकरवर्ग सर्व जिल्हाभर नेमण्यांत आला आहे.

प्रतिबंधक उपाययोजना

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यांत एकूण २५ प्राथमिक आरोग्य केंद्रें (प्रायमरी हेल्थ सेंटर्स) चालू आहेत, तीं पुढीलप्रमाणें :—

(१) गांधीनगर (२) पारगांव (३) भुये (४) सातवे (५) कोतोली (६) बाजारभोगांव (७) कळे (८) सांगरुळ (९) शिरोली (माळवाची,) (१०) वाळवे बु. (११) राशिवडे (१२) सिद्धनेर्ली (१३) मलकापूर (१४) जयसिंगपूर (१५) कडगांव. या केंद्रांच्या नोकरवर्गाचा पगार व खर्च विकास गटातून होतो आणि कारभारात्मक देखरेख विकास अधिकाऱ्यांची असते. तसेंच तांत्रिक देखरेख आरोग्य विभागामार्फत होते.

प्राथमिक आरोग्य केंद्रें

वरीलपैकीं शेवटचीं तीन आरोग्य केंद्रें मध्यवर्ति सरकारच्या आरोग्य केंद्र पद्धतीचीं असून बाकीचीं १२ महाराष्ट्र राज्य सरकारच्या आरोग्य केंद्र पद्धतीचीं (बाँबे पॅटर्न) आहेत. व त्यांना युनिसेफ (Unicef) ची मदत आहे. तसेंच वरील प्रमुख आरोग्य केंद्राखालीं बरीच उपकेंद्रेंहि चालूं असून त्याद्वारें ग्रामीण जनतेस औषधोपचाराची अधिकाधिक सोय उपलब्ध करून देण्यांत आली आहे.

या शिवाय कुरुंदवाड व गारगोटी या दोन ठिकाणीं प्रसूतिगृहें व बालसंगोपन केंद्रें चालू आहेत.

जयसिंगपूर, गांधीनगर, पारगांव, वाळवे बु., राशिवडे, सातवे, कळे, या ठिकाणीं, प्राथमिक आरोग्य केंद्रांना जोडूनच कुटुंब नियोजन केंद्रें उघडण्यांत आलीं असून तेथें एकेक फिल्ड वर्कर (महिला) काम करते. त्याशिवाय कोल्हापूरच्या सी. पी. आर. हॉस्पिटलमध्येंहि एक कुटुंबनियोजन केंद्र चालू असून तेथें महिला सोशल वर्कर काम पाहतात. १९५९ व १९६० या दोन वर्षांत २९ गांवांमध्यें कुटुंबनियोजन शिबिरें घेण्यांत येऊन ९६६ लोकांवर शस्त्रक्रिया करण्यांत आली. त्याचप्रमाणें ३७,४१६ लोकांना कुटुंबनियोजनाचें महत्त्व पटवून देण्यांत आलें व ५६८ लोकांना कुटुंबनियोजनाच्या इलाजासंबंधीं प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यांत आलें.

कुटुंब नियोजन केंद्रें

११. विकास योजना

विकास गट

कोल्हापूर जिल्ह्यांत १२ विकास गट असून जिल्ह्याचें सर्व ग्रामींण क्षेत्र त्यांत समाविष्ट झालेलें आहे. या जिल्ह्यांत २ ऑक्टोबर १९५२ पासून समाज विकास योजनेचें कार्य चालू झालें. प्रारंभी करवीर तालुका व पन्हाळा महाल यांतील सर्व खेडीं आणि हातकणंगले, राधानगरी, कागल, या तालुक्यांतील व बावडा महालांतील कांहीं गांवें अशा मिळून २५१ खेड्यांना समाज विकास योजना लागू करण्यांत आली होती. सबंध भारतामध्यें १९५२ सालीं पहिल्यांदा जे ५५ ठिकाणीं समाज विकास प्रकल्प सुरू झाले, त्यांतील करवीर पन्हाळा हा एक होता. या प्रकल्पामध्यें शेतीसुधारणा, पशुसंगोपन व संवर्धन, शिक्षणप्रसार, शाळा इमारती, धरणें, बंधारे, सहकारी सोसायटचा लिफ्ट इरिगेशन, आरोग्य, दळणवळणासाठीं ग्रामींण रस्ते, शेतकऱ्यांना तगाई कर्जाचें वांटप, समाजशिक्षण ग्रामीण उद्योगधंद्यांचा विकास असें ग्रामींण जनतेच्या सर्वांगीण विकासाचें महान कार्य झालें. सप्टेंबर १९५६ अखेर हा प्रकल्प चालू होता. त्यानंतर करवीर पन्हाळा अशा दोन विकास गटांत त्याचें रूपांतर करण्यांत आलें. पुढें हळू हळू बाकीच्या तालुक्यांनाहि विकास कार्यक्रम लागू करण्यांत आला.

सध्यां चालू असलेल्या विकास गटांसंबंधींची माहिती सोबतच्या तक्त्यांत दिली आहे.

ग्रामीण जनतेच्या सर्वांगिण विकासाचा कार्यक्रम प्रत्येक गटामध्यें त्या त्या गटाच्या अवस्थेनुसार चालू आहे. त्यांतल्या त्यांत कांहीं गटांनीं केलेल्या कार्यापैकीं ठळक बाबी खालीं दिल्या आहेत.

कार्यालयासाठीं इमारत

शिरोळ व भुदरगड गारगोटी येथें विकास गटांच्या कार्यालयाच्या इमारती बांधून झाल्या आहेत. शाहूवाडी, चंदगड, करवीर व पन्हाळा येथें विकास गटाच्या कार्यालयाच्या इमारतींचीं कामें लवकरच हातीं घेण्यांत येणार आहेत.

ग्रामसेवक निवास स्थान: भुदरगड व शिरोळ गटांत ग्रामसेवकांना राहण्यासाठीं निवासस्थानें बांधण्यांत आलीं आहेत.

बी-बियाणी व खताकरितां गुदामें: शिरोळ गटांत एक गुदाम बांधण्यांत आलें असून भुदरगड गटांत गारगोटी येथें असलेल्या लोहार शेडच्या गुदामांचें काम पूर्ण झालें आहे.

विकास गटाचें नांव	सी. पी. ए. पॅटर्नप्रमाणें गटसंख्या व अवस्था		गट सुरू झाल्याची तारीख	क्षेत्र (चौरस मैल)	लोकसंख्या (१९५१ खाने-सुमारीं प्रमाणें)	एकूण गांवे	विकासगट मुदतीसाठीं रकमेची तरतूद	मार्च १९६१ पर्यंत झालेला खर्च
करवीर	२॥	द्वितीयावस्था	१–१०–१९५६	२९९.४३	१,७४,१२७	१२९	७,५०,०००	६,३४,९००
पन्हाळा	२	द्वितीय	१–१०–१९५६	२६३.२३	१,३०,२३७	१२२	७,००,०२०	३,७५,०४६
शिरोळ	१।।।	प्रथमावस्था	१–५–१९५६	२०३.०८	१,२१,०००	४६	२१,००,०००	१ ६,४५,७१०
भुदरगड	१	प्रथमावस्था	१–४–१९५७	२५३.१५	६५,९२९	९७	१२,००,०००	७,१९,२२०
शाहूवाडी	१॥	प्रथमावस्था	२–१०–१९५९	४०७.०५	८६,७६५	१३१	१८,००,०००	२,८१,६७४
चंदगड	१	प्रथमावस्था	१–४–१९५९	३९४.००	८०,५१३	१३०	१२,००,०००	१,६१,४००
कागल	१॥	पूर्व विस्तार अवस्था	२–१०–१९५९	१७९.०२	९४,६०६	६७	पूर्व विस्तार विकास गटांकरिता कर्मचारी वेतन, कार्यालय खर्च यांसाठीं ठरवून दिलेली रक्कम असते. म्हणून खर्चाचे आंकडे दिलेले नाहींत.	
गडहिंग्लज	१।।।	,,	२–१०–१९५९	१९१.०६	१,११,३९७	९०		
आजरा	१	,,	१–४–१९६०	२०५.०३	५९,०२५	८४		
बावडा	१	,,	१–४–१९६०	२०६.०६	६४,५००	७६		
हातकणंगले	२॥	,,	२–१०–१९६०	१८३.०३	१,३१,५४०	४२		
राधानगरी	१॥	,,	२–१०–१९६०	३४४.०५	८७,२०५	९८		

प्राथमिक आरोग्य केंद्रासाठीं इमारती

जिल्ह्यांत चालू असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकीं कांहीं केंद्रें कारभाराच्या दृष्टीनें विकास गटाखालीं आहेत. शिरोळ गटामधील आरोग्य केंद्रासाठीं इमारत बांधण्याचें काम हातीं घेण्यांत आलें आहे. चंदगड व शाहूवाडी विकास गटांत प्राथमिक आरोग्य केंद्रें सुरू करण्याच्या दृष्टीनें कामकाज चालूं आहे.

ग्रामीण उद्योगधंदे

ग्रामीण भागांत धंद्याचें तांत्रिक ज्ञान घेतलेले तरबेज कारागीर तयार करण्याच्या दृष्टीनें विकास गटांमध्यें निरनिराळया धंद्यांचें शिक्षण देणाऱ्या शाळा पुढील प्रमाणें सुरु आहेत.

करवीर गट. लोंकर विणकाम शाळा, कांचेचीं खेळणीं तयार करण्याची शाळा व शिवण कामाचीं शाळा.

पन्हाळा गट. बांबू व वेत कामाची शाळा, सुतार व लोहार कामाचीं शाळा व स्त्रियांसाठीं शिवण्याचीं शाळा.

शिरोळ गट. कुंभारकामाचीं शाळा, कांचेचीं खेळणीं बनविण्याचीं शाळा, शिवण कामाची शाळा, कातडीं कामाचीं शाळा, साबण बनविण्याचीं शाळा, व स्त्रियांसाठीं शिवणकामाचीं शाळा.

भुदरगड गट. कुंभार कामाचीं शाळा, सुतार व लोहार कामाची शाळा, शिवणकामाची शाळा, बांबूकामाचीं शाळा, वं विणकामाचीं शाळा.

शाहुवाडी गट. शिवणकामाची शाळा, व कातडीं कामाची शाळा.

करवीर, शिरोळ व शाहूवाडी विकास गटांत ग्रामीण घरबांधणी योजनेचें काम जोरांत चालूं आहे. तसेंच करवीर व पन्हाळा गटांत गवतीं चराई रानांचीं वाढ करण्याचीं योजना प्रगतिपथावर आहे. या योजनेखालीं डोंगराळ अथवा माळावरील गायरानापैकीं दहा एकर जमीन निवडून त्या जमिनींत जंगलीं झाडें, फळझाडें व सुधारलेल्या जातींच्या गवताचीं लागवड करण्यांत येते

याशिवाय प्रत्येक विकास गटांत शेतीं सुधारणा योजनेखालीं जपानी भातशेतीं पद्धतीनें लागवड, पाणीपुरवण्यासाठीं विहिरीं खोदणें, पाटबंधारे, सुधारलेल्या जातींच्या बियाणाचें, खतांचें व कीडनाशक औषधांचें वांटप, प्रात्यक्षिकें करणें, फळझाडांचीं रोपें वांटणें, सुधारलेल्या पद्धतींचीं अवजारे देणें, कंपोस्ट खड्डे खोदणें, गोबर गॅस प्लँट तयार करणें वगैरे कामें चालूं आहेत.

तसेंच पशुसंवर्धन व संगोपनासाठीं जातीवंत जनावरें पुरविणें, जनावरांच्या दवाखान्यासाठीं इमारतीं बांधणें, औषधोपचार करणें, स्थानिक जातींच्या वळूंचे खच्चीकरण करणें, रोगप्रतिबंधक लस टोचणें वगैरे कामें करण्यांत येत आहेत. कोंबडी-पालनावरहि भर दिला जातो.

आरोग्य व ग्रामीण स्वच्छतेच्या दृष्टीनें सर्व तऱ्हेचीं उपाययोजना केलीं आहे. तसेंच स्वच्छ पाणीपुरवठ्यासाठीं पाण्यांत रोगजंतुनाशक औषधें टाकणें, नवीन विहिरीं बांधणें, नळ लावणें, हौद बांधणें हीं कामें विकास गटांनीं केलीं आहेत. आरोग्यरक्षणार्थ मुताऱ्या व संडासहि बांधण्यांत आले आहेत.

दळणवळणाच्या सोयींसाठीं खेड्यांतील व खेड्यांना जोडणारे रस्ते विकास गटांतून बांधण्यांत आले आहेत.

ग्रामीण भागांत सहकारी संस्थांची उभारणी करणें, सहकारी संस्थांचा कारभार सुरळीत चालविणें, सभासद वाढविणें, इत्यादि कामें विकास गटांत उत्तम प्रकारें झालीं आहेत.

खेड्यांतील मुलांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठीं बहुतेक सर्व खेड्यांत विकास गटांनीं शाळा इमारती बांधल्या आहेत. तसेंच शाळेंत मुलांची उपस्थिति वाढविण्याचेंहि कार्य केलें आहे.

त्या प्रमाणें प्रौढसाक्षरता प्रसार, तरुणांच्या संघटना उभारणें, नभोवाणी शेतकरी मंडळें चालविणें, नाट्यप्रेमी व भजनी लोकांच्या संघटना उभारणें, बालकांकरितां बालोद्यानें तयार करणें, महिला मंडळें स्थापणें, ग्रामीण भागांतील नेत्यांचीं शिबिरें घेणें, शेतकऱ्यांच्या सहली काढणें, इत्यादि कामेंहि विकास गटांनीं केलीं आहेत. गांवच्या सर्व लोकांना एकत्र जमण्याच्या दृष्टीनें समाज मंदिरेंहि अनेक गांवांतून बांधण्यांत आलीं आहेत.

ग्रामीण उद्योगधंद्याच्या विकासासाठीं अनेक सहकारी संस्थांना व कारागिरांना कर्जेंहि देण्यांत आलीं आहेत.

शेतकरी मंडळाची स्थापना

या जिल्ह्यांतील सर्व गांवांतून शेतकरी मंडळाची स्थापना झाली असून प्रत्येक मंडळांत गांवाचे जवळजवळ ८० टक्के शेतकरी सभासद झाले आहेत. या मंडळांतील सभासदांची संख्या दीड लाखावर गेली आहे. तसेंच सर्व १२ तालुके व महालांतून तालुका शेतकरी मंडळें स्थापन झालीं असून जिल्ह्याचें कोल्हापूर जिल्हा शेतकरी मंडळहि स्थापन झाले आहे. शेतीविकास करून शेतकरी वर्गाचें राहणीमान सुधारणें, सामाजिक समता निर्माण करणें, शेतकरी वर्गास अन्यायाविरुद्ध संघटित करणें, हीं कामें या शेतकरी मंडळा द्वारें केलीं जातात.

खनिज संपत्ति

विशाळगड रेंजमधील आंबा गांवच्या आजुबाजूच्या व उदगिरी गांवच्या डोंगरांत बॉक्साइट भरपूर प्रमाणांत आहे. कारखान्यांना बॉक्साइटचा किती प्रमाणांत पुरवठा होऊं शकेल यासंबंधीं प्राथमिक तपासणी व संशोधन चालू आहे. तसेंच पाटगांव व तांब्याची वाडी या भागाच्या डोंगरांत प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या संशोधनांचें काम चालू आहे.

स्थानिक विकास योजनेमध्यें पूर्ण झालेल्या कामांपैकीं कांहीं प्रमुख कामांची सालवार यादी खालीलप्रमाणें आहे.

१९५३–५४ मधील कामें

		खर्च रु.
(१) आरदाळ येथील बंधारा	आजरा	५,७५९
(२) हातिवडे ,, ,,	,,	४,५४५
(३) खेडे ,, ,,	,,	९,३४९
(४) वेलबत्ती ,, ,,	,,	९,३५५
(५) पोळेवाडी ,, ,,	,,	४,३२६
(६) उत्तूर ,, तलाव	,,	९,५५७
(७) भोम ,, विहीर	बावडा	४,९५३
(८) कलनाकवाडी ,, बंधारा	भुदरगड	४,५३९
(९) नांदूवडे ,, ,,	,,	४,४९२

(१०)	मडिलगे ,,	,,	,,	१५,९४०
(११)	जरळी ,,	विहीर	गडहिंगलज	६,१८१
(१३)	बसरगेबुद्रुक	बंधारा	,,	५,५९१
(१३)	हातकणंगले ,,	विहीर	हातकणंगले	६,८८९
(१४)	माले ,,	बंधारा	,,	११,५५८
(१५)	मिणचे ,,	,,	,,	३,६९८
(१६)	बालेधोळ ,,	,,	कागल	४,४८२
(१७)	क. सांगाव ,,	,,	,,	७,४२७
(१८)	सुळकूड ,,	तलाव	,,	९,२०८
(१९)	सावर्डे ,,	,,	,,	१४,९६५
(२०)	पन्हाळा ,,	दोन तलाव आणि सहा विहिरी	पन्हाळा	१९,३७१
(२१)	सोनवडे ,,	तलाव	शाहूवाडी	५,४०६
(२२)	लाट ,,	,,	शिरोळ	५,११५
(२३)	निमशिरगांव आणि चिप्री येथील बंधारा		,,	२१,७८०
(२४)	तळाशी येथील बंधारा		राधानगरी	४,४२९
(२५)	राधानगरी येथील बंधारा		,,	१२,६४०

या शिवाय प्रत्येकी पांच हजार रुपयांच्या आंत किंमत असलेलीं सात लहान कामें पूर्ण झालेलीं आहेत.

१९५४–५५ मधील कामें

(१)	लोटेवाडी (मिणचें खा.)	भुदरगड	६,४८२
(२)	क. सांगाव बंधारा	कागल	६,७६८
(३)	कोल्हापूर येथील रिमांड होमची भिंत	करवीर	४८,१०४

याशिवाय प्रत्येकीं रुपये ४ हजाराच्या आंत असणारीं सात लहान कामें पूर्ण झालीं आहेत.

१९५५–५६ चीं कामें

(१)	भोम येथील विहीर		बावडा	४,४२९
(२)	जरळी येथील विहीर		भुदरगड	६,१८१
(३)	लोटेवाडी येथील बंधारा		,,	६,३८२
(४)	माले ,,	,,	हातकणंगले	११,५५८
(५)	माद्याळ ,,	,,	कागल	४,८९५
(६)	वडगांव ,,	,,	,,	६,२७०
(७)	जैन्याल ,,	,,	,,	९,३६४
(८)	सावर्डे ,,	तलाव	,,	१४,९६५
(९)	क. सागांव ,,	,,	,,	४,८६२
(१०)	अर्जूनवाड ,,	घाट	,,	१०,८०८

या शिवाय प्रत्येकीं चार हजार रुपयांहून कमी किंमत असणारी दहा लहान कामें पूर्ण झालीं आहेत.

१९५६–५७ मधील कामें

(१)	दोनावडे येथील	बंधारा	भुदरगड	१९,०७८
(२)	लाकूडवाडी ,,	पाण्यासाठीं नळ	,,	६,६८९
(३)	हुंडेवाडी ,,	विहीर	,,	४,९५९
(४)	पाल ,,	पाण्यासाठीं नळ	,,	५,३११
(५)	गायगोटी ,,	सुतिकागृह	,,	९,९२०
(६)	,, ,,	बॅकवर्ड क्लास हॉस्टेल	,,	२१,८०५
(७)	अर्जूनवाडी ,,	विहिर	गडहिंग्लज	४,७५९
(८)	मांगनूर ,,	,,	,,	५,०००
(९)	मिणचे	तलाव	हातकणंगले	११,१८९
(१०)	रुकडी ,,	गटार	,,	४,९९८
(११)	क. वडगांव ,,	सुतिकागृह	,,	११,४७६
(१२)	क. सांगाव ,,	बंधारा	कागल	७,०२६
(१३)	क. सांगाव ,,	तलाव	,,	४,८९२
(१४)	तामनकवाडी	विहीर	,,	४,९५९
(१५)	कापशी ,,	गटार	,,	४,०७७
(१६)	सोनवडे ,,	तलाव	शाहुवाडी	१४,२३८
(१७)	कोथळी ,,	चावडी	शिरोळ	१४,६३८

याशिवाय प्रत्येकीं रुपये चार हाजाराच्या आंत किंमत असलेलीं लहान लहान २० कामें पूर्ण झालीं आहेत.

१९५७–५८ मधील कामें

(१)	नावले येथील	नळ	भुदरगड	४,६२९
(२)	भेंडवोडे ,,	विहीर	,,	४,९५४
(३)	अंतिवडे ,,	,,	,,	४,९५९
(४)	डोले ,,	,,	,,	४,९५९
(५)	पाचर्डे ,,	,,	,,	४,२९९
(६)	मुगळी ,,	बंधारा	गडहिंग्लज	७,७७७
(७)	हुपरी ,,	गटारे	हातकणंगले	६,७१७
(८)	मिणचे ,,	,,	,,	५,४९६
(९)	माणगांव ,,	,,	,,	६,२४५
(१०)	हातकणंगले ,,	,,	,,	१०,३०१
(११)	हुपरी येथील	गटारे	हातकणंगले	१०,६४९
(१२)	वाळवे ,,	घाट	कागल	९,२०३
(१३)	बैलवळे ,,	,,	,,	५,२३६
(१४)	शंकरवाडी ,,	गटारे	,,	४,००७

(१५)	बिद्री	,, लायब्ररी	,,	६,६४८
(१६)	,,	.. घाट	,,	७,०२४
(१७)	पणेरी	,, बंधारा	राधानगरी	१४,१०६
(१८)	तुरम्बे		,,	४,१६७
(१९)	राशिवडे	,, घाट	,,	४,७४८
(२०)	मालवे	,, विहिर	,,	५,०००
(२१)	पिरल	,, बंधारा	,,	४,६५८
(२२)	सरुड	,, तालिम	शाहुवाडी	४,७३९
(२३)	सरुड	,, गटार	,,	७,७१६
(२४)	दत्तवाड	,, रस्ते	शिरोळ	१०,५२३
(२५)	नांदणी	,, रस्ते पुल		११,०११
(२५)	कुरुंदवाड	,, रस्ते	,,	१५,८१०

या शिवाय प्रत्येकीं रुपये ४,००० च्या आंत किंमत असणारीं १४ लहान लहान कामें पूर्ण झालीं आहेत.

१९५८–५९ मधील कामें

(१)	देवर्डे येथील शाळा	आजरा	६,२८५
(२)	उंम्बर्डे (मुसलमानवाडी, येथील विहिर	बावडा	४,९६१
(३)	नापने येथील शाळा	बावडा	४,०७३
(४)	खानापूर ,, घाट	भुलरगड	६,६५४
(५)	गवसे ,, रस्ते	चंदगड	६,००१
(६)	शिवणगे ,, शाळा	,,	९,९२६
(७)	ताम्बुलवाडी येथील रस्ते	,,	७,४२२
(८)	वाघवाडी येथील रस्ते	गडहिंग्लज	७,३०५
(९)	इंचनाळ ,, गटारें	,,	४,६६५
(१०)	गिजवडे ,, ,,	,,	४,१५०
(११)	वसर्गे ,, शाळा	,,	९,११४
(१२)	हनिमनाळ ते माद्याळ रस्ता	,,	८,८३८
(१३)	पट्टणकोली येथील विहिर	हातकणंगले	९,८३५
(१४)	हाँतकणंगले येथील जनावरांचा दवाखाना	,,	११,४९८
(१५)	चंदूर येथील गटारे	,,	५,८९०
(१६)	रुकडी येथींल गटारें	,,	१०३२३
(१७)	रुकडी ते अतिग्रे रस्ता	,,	६,५९०
(१८)	तारदाळ येथें करमणुक केन्द्र	,,	१३,३९८
(१९)	लाटवडे ते वडगांव रस्ता	,,	१३,७१६
(२०)	तासगांव ते वडगांव रस्ता	,,	१५,४३५
(२१)	मजले येथील रस्ता	,,	१९,३२३
(२२)	चंदूर ते इंचलकरंजी रस्ते	,,	१८,३९१

(२३)	चिखली येथील तलाव	कागल	९,०४२
(२४)	सुलकूड ,, गटर	,,	४,१७६
(२५)	हमीमनाळ ते माद्याळ सुळकूड रस्ता	,,	८,८३८
(२६)	मौजे सांगाव येथील बालोद्यान	कागल	७,८३४
(२७)	सुरुपली येथील धरणावर आर. सी. सी. स्लॅब्स टाकणें.	,,	१५,०७५
(२८)	पन्हाळा येथील लायब्ररी इमारत	पन्हाळा	१७,३२५
(२९)	नरतवडे ,, तालीम	राधानगर	८,७९७
(३०)	क. तारळे ,, रस्ते	,,	१९,५२६
(३१)	बांबवडे ,, विहीर	शाहूवाडी	४,१०२
(३२)	उकोली ,, विहीर	,,	६,१००
(३३)	शळा ,, इमारत	,,	४,६९९
(३४)	सावे ,, रस्ते	,,	४,१३१
(३५)	सुलेवाडी ,, रस्ते	,,	५.९८०
(३६)	वजयवाडी ,, रस्ते	,,	४,९७३
(३७)	हणमंतवाडी ते सुपात्रे रस्ते	,,	६,४११
(३८)	गोंडोली ते मालेवाडी रस्ते	,,	९,३१२
(३९)	शिराळे ते शित्तूर रस्ते	,,	६,३९३
(४०)	कुटाळवाडी येथील शाळा इमारत	,,	७,४५४
(४१)	शिरगांव येथील तालीम	,,	६,५४४
(४२)	लाट येथील तलाव	शिरोळ	५,६३२
(४३)	उदगांव येथील शशिकला सॅनिटोरियामची सुधारणा व दुरुस्ती	,,	११,६५४
(४४)	नारकरवाडी येथील बंधारा	बावडा	५,२६८

१९५९-६० मधील कामें

या शिवाय प्रत्येकीं रुपये ४,००० हून कमी किंमतीचीं २४ लहान कामें पूर्ण झालीं आहेत.

(१)	हेरले येथील नळ	हातकणंगले	६,००९
(२)	सरवडे ,, घाट	राधानगरी	५,९४६
(३)	झुलपेवाडी येथील विहीर	आजरा	९,५०९
(४)	मुमेवाडी ,, शाळा	,,	६,४७१
(५)	मडीलगे ,, शाळा	,,	९,३२४
(६)	वैभववाडी ,, इमारत	बावडा	९,३२४
(७)	बाध्याचीवाडी ते बहीरी रस्ता	गडहिंग्लज	६,७७१

(८) हातकणंगले येथील दवाखाना	हातकणंगले	१५,५५६
(९) कोकीसरे (भारदतीमाळ) शाळा	बावडा	१२,४२५

याशिवाय प्रत्येकीं रु.४,००० हून कमी किंमतीची सात लहान लहान कामें पूर्ण झालीं आहेत.

१९६०–६१ मधील कामें

(१) मंजले येथील विकास मंदीर	हातकणंगले	१०,९२९
(२) गुडाळ ,, घाट	राधानगरी	४,४६१
(३) नारकरवाडी येथील शाळा	बावडा	१२,७८५
(४) बानगे ,, तलाव	कागल	४,८०८
(५) भेंडवडे ते खोची रस्ता	हातकणंगले	१५,२३६
(६) हुपरी ,, गटार	,,	६,२७९
(७) ,, ,, विकास मंदिर	,,	६,६४८
(८) नूल ,, गटार	गडहिंग्लज	४,३६८
(९) अर्जूनवाड ,, शाळा	,,	६,४७१
(१०) कडगांव गटार	,,	५,४६०
(११) शिपुर येथील रस्ते	,,	५,७६१
(१२) जरळी ,, गटार	,,	४,३६८
(१३) आकनूर ,, तलाव	राधानगरी	४,५६८
(१४) टिटवे ,, रस्ते	,,	४,९७०

याशिवाय प्रत्येकीं रुपये ४,०००हून कमी किंमत असणारीं आठ लहान कामेंहि पूर्ण झालीं आहेत.

१२ धरणें व पाटबंधारे

कोल्हापूर जिल्ह्यांत सुमारें १२ नद्या असून जिल्ह्यांतील निरनिराळ्या भागांत १५ पासून २०० (दोनशें) इंचापर्यंत पाऊस पड़तो. त्या दृष्टीनें या जिल्ह्यांतील पाटबंधाऱ्यांना फार महत्त्व आहे. शिवाय जिल्ह्यांतील शेतकरी पाण्याच्या उपयोगाबाबत जागरुक असून पाण्याचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें ते नद्यांना धरणें, नाल्यांना बधारे तसेच तळीं वगैरे बांधण्याच्या बाबतींत सारखे प्रयत्न करींत असतात.

धरणें : सन १९५९–६० मध्यें खालील धरणांबाबत आराखडे व खर्चाचे अंदाज तयार होऊन खालीलप्रमाणें कामें सुरू आहेत.

	अंदाजें खर्च रु.	नदीचें नांव
(१) निलजी धरण	५,४०,९३९	हिरण्यकेशी
(२) गिजवणें	२,३७,९३१	"
(३) ऐनापूर	२,३८,४३३	"
(४) निळपण	२,७७,१७६	वेदगंगा
(५) सुळंब्री	२,०८,०९५	दूधगंगा
(६) तुरंबें	२,६८,१४५	"
(७) कसबा वाळवे	३,९७,०४०	"
(८) सूळकूड	५,००,०००	दूधगंगा
(९) कुरणी	२,३३,३७१	वेदगंगा
(१०) वाघापूर	२,६९,२७९	वेदगंगा
(११) गारगोटी	२,७९,२२६	वेदगंगा

बंधारे जिल्हा विकास मंडळानें सुमारें २७ बंधारे बांधण्याच्या कामाचे आराखडे व खर्चाचा अंदाज करण्यास मान्यता दिली असून त्याप्रमाणें काम सुरू आहे.

तळीं : जिल्ह्यांत नवीन सहा तळ्यांचे आराखडे व खर्चाचा अंदाज करण्याचें काम सुरू आहे. ज्या तळ्यांच्या योजना कार्यान्वित करण्याजोग्या असतील त्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत हातीं घेण्यांत येणार आहेत. या जिल्ह्यांत बऱ्याच लिफ्ट इरिगेशन सोसायटया स्थापन झाल्या आहेत.

या जिल्ह्यांतील पाटबंधाऱ्याच्या कामाची जरुरी व महत्व जाणून महाराष्ट्र राज्य सरकारनें कोल्हापूर जिल्ह्यांतील व सांगली जिल्ह्यांतील इरिगेशन कामें लौवकर व उत्तम तऱ्हेनें पार पाडण्यासाठीं दिनांक २२ डिसेंबर १९६० पासून कोल्हापूर इरिगेशन डिव्हिजन या नांवाची एक स्वतंत्र डिव्हिजन कोल्हापूर येथें सुरु केली आहे.

राधानगरी धरण कोल्हापूर जिल्ह्यांतील सर्वांत मोठे असे हें राधानगरी धरण भोगावती नदीवर बांधण्यांत आलें आहे. प्रारंभीं पाण्याचा साठा करणे एवढाच त्याचा उद्देश होता पण पुढें– विद्युत निर्मितीसाठींहि त्याचा उपयोग करुन घेण्यांत आला.

या पूर्ण झालेल्या धरणयोजनेची प्रमुख वैशिष्टयें खालीलप्रमाणें आहेत.

(१) पायापासून बांधकामाची उंची १४० फूट

(२) धरणालगत विद्युत्‌निर्मिती केंद्र

(३) या धरणांतील पाण्याच्या साठ्यामुळें भोगावती नदीवरील ५ धरणांना पाणी मिळते.

(५) या जलाशयाचें पाणी पंचगंगा नदीतहि येते. भोगावती व पंचगंगा यांच्यावर अनेक पंपिंग सेटस् चालू आहेत.


धरणाचीं वैशिष्टयें

(१)	पाण्याखालचा प्रदेश	४२.५ चौरस मैल
(२)	सरासरी पर्जन्यमान	२०० ते २५० इंच
(३)	धरणाची लांबी	३७५० फूट
(४)	पाण्याची कमाल पातळी	१९३८.९२
(५)	तलावाची जलसंचय शक्ति	८४५० दशलक्ष घनफूट
(६)	पाणी पसरलेली लांबी	७ मैल
(७)	जलसंचयाची कमाल लांबी	१० मैल
(८)	जलसंचयाच्या पृष्ठभागाची लांबी	५५ मैल
(९)	धरणाची उंची (पायापासून)	१४० फूट
(१०)	नदीच्या तळापासून धरणाची उंची	१२६ फूट
(११)	धरणाची माथ्यावरची रुंदी	१८.४ फूट
(१२)	धरणाचें बांधकाम	१३.२ दशलक्ष घनफट.

(पॉवर हाऊस) धरणाच्या पायानजिकच पॉवर हाउस उभारण्यांत आलें असून त्यांत आठ लोहेड फिर्दरिंग प्रॉपेलर टाइपची टरबाईन्स व चार व्हर्टिकल टाईपची टरबाईन्स असून त्या प्रत्येकाची विद्युतनिर्मितीची शक्ती १२०० किलोवॅट आहे. एकंदर ६६०० कि. वॅ. विद्युत निर्माण होते.

शेतीस पाणीपुरवठा या धरणाखाली भिजणाऱ्या जमिनीचें क्षेत्र १८००० एकराचें असून ८० फूटपर्यंत पाणी उचललें जातें.

पूल व धरणें



वारुळ
मलकापूर
शाली
बांबवडे
मोहरे
अंबप
कासारी नदी
प्रयाग
पंचगंगा नदी
शिरोली
शिवाजी
कोल्हापूर
पंचगंगा नदी
इचलकरंजी
साळवण
रुपणी
कुंभी नदी
तुळशी नदी
भोगावती नदी
दुधगंगा नदी
टीटवे
सरवडे
फेजीवडे
राधानगरी तलाव
वेदगंगा नदी
मुरगुड
मडीलगे
गारगोटी
भंडगाव
हिरण्यकेशी नदी
घटप्रभा नदी
घटप्रभा
ताम्रपर्णी नदी
पूल
धरणें

वारणा प्रकल्प

महाराष्ट्र राज्यामध्यें जे कांहीं प्रकल्प द्वितीय पंचवार्षिक योजनेमध्यें अंतर्भूत केले त्यामध्य "वारणा प्रकल्प" हा एक प्रकल्प होता. वारणा ही कृष्णा नदीची एक उपनदी असून तिचा उगम सह्याद्रींतून झालेला आहे. पावसाळ्यामध्यें चारही महिने म्हणजे जून ते ऑक्टोबरपर्यंत व त्यानंतरही दोन महिने म्हणजे डिसेंबरअखेर या नदीमध्यें मोठ्या प्रमाणावर प्रवाही पाणी असते. परंतु त्यानंतर मात्र शेतीला उपयोग होईल इतके पाणी तिच्यांत नसते. पावसाळा संपल्यानंतर नदीवर छोटे छोटे मातीचे बंधारे घालून शेती केली जाते. शेतीला हमखास पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशानें वारणा प्रकल्प हातीं घेण्यांत आला आहे. या प्रकल्पाविषयीं तांत्रिक माहिती खालीलप्रमाणें आहे.

चांदोली धरण

या प्रकल्पाचें प्रमुख अंग म्हणजे चांदोली येथें बांधण्यांत येणारे धरण हें होय. चांदोली गांव (जि. सांगली) महाल शिराळेमध्ये, शिराळे गांवाच्या पश्चिमेस सुमारे २५ मैलांवर आहे. चांदोली धरण मातीचें होणार असून त्याची लांबी १९२० फूट होणार आहे. या धरणाची उंची ११४ फूट असून त्यामध्ये ३२०० दशलक्ष घनफूट पाणी राहील. या धरणाच्या खालील बाजूस वारणेवर खालील गांवी बंधारे होणार आहेत. (१) चरण, (२) हरगुडवाडी, (३) सागाव अथवा सावर्डे (४) चिंचोली, (५) तांदूळवाडी.

चांदोली येथील धरणाचें पाणी नदींतून या बंधाऱ्यांत सोडण्यांत येईल व या बंधाऱ्यातून तें लिफ्टच्या साहाय्यानें शेतीस पुरविलें जाईल. चांदोली येथील धरणाच्या पाण्याखाली २,५८१ एकर जमीन बुडणार आहे व ही जमीन शिराळा, जि. सांगली व ता. शाहुवाडी जिल्हा कोल्हापूर या दोन तालुक्यांतील आहे. या धरणामुळें सुमारें २०,००० एकर जमिनीस पाणी मिळणार आहे. या २०,००० एकरापैकीं ९,७०० एकर कोल्हापूर जिल्ह्यांतील आहे व उरलेली १०,३०० एकर जमीन सांगली जिल्ह्यांतील आहे.

या योजनेसाठीं अंदाजे खर्च सुमारे १,५१,८८,००० रुपये येणार आहे. यामध्यें धरण, बंधारे, धरणाकरितां लागणारी जमीन घेणें, धरणाकडे जाण्याकरितां लागणारे रस्ते बांधणें, त्याचप्रमाणें धरणाच्या कामाकरितां लागणारी मशिनरी विकत घेणें, सरकारी कर्मचाऱ्यांसाठीं घरें बांधणें त्यांचें पगार देणें इत्यादि खर्चाचा समावेश होतो. या धरणाचें काम द्रुतगतीनें व्हावे यासाठीं महाराष्ट्र सरकारनें "वारणा डिव्हिजन" उघडली आहे व त्याची कचेरी कोल्हापूर येथें आहे. त्याचप्रमाणें या प्रकल्पाकरितां चार सब-डिव्हिजन्स्‌हि उघडलेल्या आहेत.

---

१३. सहकाराची वाटचाल

कोल्हापूर जिल्हा सहकारी चळवळीमध्यें अग्रगण्य आहे. जिल्ह्यांत १०९८ गांवें असून त्यापैकीं ९६ टक्के गांवें सहकारी संस्थांनीं व्यापलेलीं आहेत. तसेंच एकूण लोकसंख्ये पैकीं ८८ टक्के लोकसंख्या सहकारी कार्यक्षेत्रांत आलेली आहे. एकूण सुमारें १४०० सहकारी संस्थां पैकीं ग्रामीण संस्था ८६९ आहेत. जिल्ह्यांत ३४१ सेवा सहकारी संस्था स्थापन झाल्या आहेत. बावीस वर्षापूर्वी स्थापन झालेली कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँक आणि तिच्या १२ शाखा यामार्फत प्राथमिक सहकारी संस्थांस भांडवलपुरवठा करण्याचें काम केलें जाते. ८२२ संस्था व २२३७ व्यक्ति या बँकेचे सभासद आहेत. शेअर भांडवल ३१,६१ लाख आहे.

लँड मॉर्गेज बँक

लँड मॉर्गेज बँकेच्या कोल्हापूर, जयसिंगपूर व गडहिंग्लज या शाखांमार्फत लांब मुदतीची कर्जें शेतकऱ्यास वांटण्यांत येतात. कोल्हापूर जिल्ह्यासाठीं स्वतंत्र लँड मॉर्गेज बँकेचीं नुकतीच स्थापना करण्यांत आली आहे.


अर्बन बँकस्

नागरी भागांतील लोकांस भांडवल पुरवठा करणाऱ्या अर्बन बँकांची संख्या १५ असून नागरी पतपुरवठा सोसायटया २८ आहेत. सहकारी भिशी ही अनुकरणीय संस्था असून अशा ५७ भिशांमध्यें ७५०० सभासद सामील झाले आहेत. अडचणींच्या वेळीं कर्जें मिळण्यास हें हक्काचें स्थान असल्यामुळें काटकसर करून भिशीमध्यें नियमितपणें पैसे भरणाऱ्यांची संख्या दिवसें दिवस वाढत आहे. याशिवाय पगारदार नोकर संघाच्या २२ सोसायटया जिल्ह्यांत आहेत. वरील प्रकारच्या बिगर शेतकी पतपुरवठा सोसायटया व बँका मिळून १२२ संस्था असून सभासद संख्या ४३००० व शेअर भांडवल रुपये १८.४४ लक्ष आहे.

सहकारी माल खरेदी विक्री संस्था

सभासदांना लागणारा माल किफायत भावानें पुरविणें व शेतमालाची विक्री योग्य दरानें करणें या दोन्हीं दृष्टींनीं सहकारी खरेदी विक्री संघ चांगल्या रीतीनें कार्य करीत असल्याचें आढळून येते. प्रत्येक तालुक्यास शेतकरी सहकारी संघ आहे. कोल्हापूर जिल्हा शेतकरी सहकारी संघ ही या क्षेत्रांत काम करणारी सर्वांत मोठी संस्था होय. १९३९ सालीं या संघाची स्थापना झाली. संघाच्या १९ शाखा आणि २३ केंद्रे लोकांच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीनें निरनिराळे व्यवहार करीत आहेत. अडत दुकानें, स्वस्त धान्याची दुकानें, औषध, कापड, प्रोव्हीजन, तेलें यांची दुकानें या

सहकारी कोल्हापूर



टीप -
संदर्भाच्या खुणेच्या वरील आंकडे त्या त्या तालुक्यांतील सोसायट्यांच्या संख्या दाखवितात.

संघामार्फत चालतात. पेठ वडगांव येथें संघाची ऑईल मिल आहे. करवीर तालुका शेतकरी सहकारी संघानें अलिकडेच मिश्रखतें तयार करून शेतीसाठीं त्यांचा पुरवठा करण्याची व "शेतकरी" ऑईल इंजिने तयार करण्याची योजना हातीं घेतलेली आहे. कोल्हापूर, गडहिंग्लज, जयसिंगपूर, वडगांव व मलकापूर अशा महत्त्वाच्या बाजारपेठांमध्यें या संघामार्फत अडतींचे व्यवहार केले जातात.

सहकारी पद्धतीच्या अनेक लहान मोठ्या संस्था या जिल्ह्यांत अनेक वर्षांपासून सुरळीतपणें कार्य करीत आहेत. पंचवार्षिक योजनेंतील सहकार विषयक कार्यक्रमामुळें या चळवळीस एक प्रकारचा योजनाबद्ध उठाव मिळाला. कोल्हापूर जिल्ह्यांत निरनिराळ्या नद्यांवर सहकारी तत्त्वावर झालेली अनेक लहानमोठीं धरणें आणि सहकारी साखर कारखाने हे या जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचे मानबिंदु आहेत. तसेंच शेतकी पतपेढ्या व विविध कार्यकारी सहकारी संस्था यांचे जिल्हाभर जाळेंच विणलें गेले असून या संस्थांची संख्या १४०० चे वर आहे. या सहकारी संस्थांमध्यें अडीच लाखांहून अधिक लोक सभासद असून शेअर भांडवलामध्यें ९० लक्षांवर रक्कम गुंतविली गेली आहे.

सहकारी साखर कारखाने

(१) वारणा सहकारी साखर कारखाना लि. कोडोली
(२) पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि. गंगानगर इंचलकरंजी
(३) भोगावती सहकारी साखर कारखाना लि. शाहूनगर परिते
(४) दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि. मौनीनगर बिद्री
(५) कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना लि. कुडित्रे कळे

वारणा कारखाना

वरील कारखान्यापैकीं वारणा सहकारी साखर कारखान्यानें आपलें साखर उत्पादनाच कार्य १९५९–६० च्या गळीताच्या हंगामांत सुरू केलें असून पंचगंगा व भोगावती कारखान्यांनीं आपलें चांचणो उत्पादन १९५८–५९ सालीं केलें आहे. म्हणजे त्यांचें खरें उत्पादन कार्य सन १९५९–६० सालीच सुरू झालें असें म्हणावे लागेल. या तिन्हीं कारखान्यांची दैनिक ऊंस गाळण्याची कमाल मर्यादा १००० ते २००० टनाइतकी असून सर्वसाधारणपणें त्यांनीं आपलें गळीत १३० ते १५० दिवस चालवावे व किमान १,५०,००० टन ऊंस गाळण्याचें लक्ष गांठावे अशी अपेक्षा आहे. प्रत्येक उत्पादन क्षेत्रांतील प्रारंभावस्थेंत नेहमीच येणाऱ्या अनेक अडचणीमुळें व कांहीं अनपेक्षित अडचणीमुळें जरी हे तिन्ही कारखाने आपल्या उत्पादनाचें लक्ष्य पूर्णपणें गाठूं शकले नाहीत तरी त्यानीं आपापल्या परीनें बरेंच उल्लेखनीय असे उत्पादन कार्य केलें आहे.

दुधगंगा वेदगंगा व कुंभी कासारी सहकारी साखर कारखाने त्यांच्या उभारणीचें काम जोरांत चालं असून यंत्रसामुग्रीहि आली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यांतील उंसाच्या उत्पादनास अनुकूल असलेली नैसर्गिक परिस्थिति, जिल्ह्यांतील उंस उत्पादकांची प्रगतिशील उत्पादनपद्धति, उंसापासून मिळणाऱ्या साखरेचें भरपूर प्रमाण वगैरे सर्व बाबी विचारांत घेतां वरील सर्व कारखान्यांचें भवितव्य उज्ज्वल आहे.

इतर उद्योगधंद्यांतील सहकारी संस्था

महाराष्ट्र राज्यांतील, ग्रामीण उद्योगधंदे आणि औद्योगिक सहकारी विभागातर्फे कोल्हापूर जिल्ह्यांत चालू असलेलें कार्य त्रिविध प्रकारांत मोडतें.

१) कोल्हापूर जिल्ह्यांतील औद्योगिक सहकारी संस्था व त्यांचें कार्य

२) वैयक्तिक कारागिरांना आर्थिक मदत व कर्ज देण्याची योजना

३) निरनिराळ्या तऱ्हेच्या हस्तकलांचें शिक्षण देणाऱ्या संस्था व तज्ज्ञ कारागीरांकडून काम करून घेणाऱ्या प्रशिक्षण व उत्पादन संस्था यांचें कार्य

या जिल्ह्यांत सन १९५७–५८ साली एकूण १२५, १९५८–५९ सालीं एकूण १३९ औद्योगिक सोसायटचा होत्या. आतां हा आंकडा १५१ वर गेला आहे.

चर्मकार व टॅनर्स सहकारी संस्था

कोल्हापूर जिल्ह्यांत एकूण ११ चर्मकार व सहा टॅनर्स सहकारी संस्था मिळून एकूण १७ सोसायटचा काम करीत आहेत. द्वितीय पंचवार्षिक योजनेमध्यें खालील तीन सोसायटचांना मदत देण्यांत आली. (१) कोल्हापूर टॅनर्स सहकारी सोसायटी लि. कोल्हापूर. (२) कोल्हापूर चर्मकार सहकारी सोसायटी, कोल्हापूर. (३) हनुमान औद्योगिक सहकारी सोसायटी, गारगोटी. हत्यारें अवजारें खरेदी करण्यासाठी कोल्हापूर चर्मकार सहकारी सोसायटीला मदत देण्यांत आली व उरलेल्या वरील दोन सोसायटचा आणि इतर तीन सोसायटचा ह्याना शेअर भांडवलासाठी सरकारी मदत देण्यांत आली.

लोहार व सुतार सहकारी संस्था

एकंदर आठ संस्थांपैकीं एक नव्यानेंच रजिस्टर करण्यांत आलेली आहे. या संस्थांची आर्थिक परिस्थिती समाधानकारक नसल्यामुळें त्या पुरेसें काम मिळवूं शकल्या नाहींत. सरकारी मदत देऊं करून त्यांची परिस्थिति सुधारण्याकरता खटपट चालू आहे.

कुंभार सहकारी संस्था

१८ कुंभकार सहकारी संस्थांपैकीं दोन सहकारी संस्था नवीनच स्थापन झाल्या आहेत. या सोसायटचा प्रत्यक्ष उत्पादन संस्था म्हणून काम करीत नसून त्या आपल्या सभासदांना त्यांनीं तयार केलेल्या मालाच्या तारणावर कर्ज देण्याचा व्यवसाय करतात. सरकारतर्फे या सोसायटचांना पडीक जमीन मिळवून देऊन त्यांना प्रत्यक्ष उत्पादन करण्याला तयार करण्यासाठीं खटपट चालू आहे. यापैकीं पांच सोसायटचांना मध्यवर्ती बँकेतर्फे शेअर भांडवलाकरितां ११,४०० रु. कर्ज देण्यांत आलें आहे. कोडोली कुंभकार सोसायटीला शेड बांधण्यासाठीं ९००० रु. मंजूर केले आहेत. आणि ५००० रु. भांडवलासाठीं कर्ज देण्यांत आलें आहे. वरील रकमेच्या निम्मी रक्कम सहाय्यार्थ मदत म्हणून खादी ग्रामोद्योग मंडळातर्फे मंजूर करण्यांत आली आहे. निगवे कुंभकार सहकारी सोसायटीस १२०० रुपये शेअर भांडवलाकरतां मंजूर झाले आहेत.

कामगार कंत्राट सहकारी संस्था कोल्हापूर जिल्ह्यांतील २२ कामगार कंत्राट संस्थांपैकीं सहा संस्था नवीन स्थापन झालेल्या आहेत. या संस्थांचे एकंदरीत कामकाज समाधानकारक चालू आहे.

वडणगे कामगार सहकारी सोसायटीला भांडवलासाठीं १५०० रु. कर्ज रूपानें मदत दिली. आणि इतर चार सोसायटचांना सुमारें १४००० रु. भांडवलाकरतां सेंट्रल फायनान्सिग एजन्सीमार्फत मंजूर केले

आहेत. तीन सोसायटच्यांना कर्ज व अनुदान यांचे रूपानें प्रत्येकी २००० रु. अवजारें व उपकरणें यांच्या खरेदीसाठीं देण्यांत आले.

लोंकर विणकर सहकारी संस्था

कोल्हापूर जिल्ह्यांत १४ लोंकर विणकर सहकारी संस्था काम करीत असून त्यांचे काम समाधानकारक आहे व दिवसेंदिवस कामात प्रगति होत आहे. या प्रकारच्या संस्थांची संख्या पुरेशा प्रमाणांत वाढली असून जिल्ह्यांतील लोंकर विणकर केंद्रें सहकारी कार्यक्षेत्राखालीं आणलीं गेलीं आहेत.

या संस्थांपैकीं खादी व ग्रामोद्योग कमिशनतर्फें पांच संस्थांना त्यांनीं तयार केलेल्या कांबळीं व घोंगडीवर एक रुपयाला तीन आणे याप्रमाणें रिबेट मंजूर करण्यांत आले आहे. तसेंच खादी व ग्रामोद्योग कमिशननें दोन संस्थांना रु. ३०००० कर्ज रूपानें मंजूर केले आहेत. आणि तीन सोसायटच्यांना ६०,००० रु. कर्ज देण्याची शिफारस केलीं आहे. विमुक्त जातींच्या " शांतीनगर लोंकर " विणकर सहकारी सोसायटीस १५०० रु. कर्ज म्हणून मंजूर केले व ५०० रु. अनुदान रूपानें उपकरणें व अवजारें यांच्या खरेदीसाठीं मंजूर झाले आहेत.

एकंदर तीन सोसायटच्या धातू कामाचा व्यवसाय करीत आहेत.संस्थांचें काम समाधानकारक असून प्रगतिपथावर आहे. खादी औद्योगिक सहकारी सोसायटी, हुपरी, कारागिरांना लागणारा कच्चा माल

मेटल (धातू काम) वर्कर्स सहकारी संस्था

जमा करून सभासदांना पुरविण्याचें काम करतें व सभासद कच्च्या मालापासून चांदींच्या वस्तू तयार करतात. सोसायटीला भांडवलासाठीं सरकारतर्फें ४००० रु. मदत मंजूर झालीं आहे. तसेंच सुमारें २०००० रु. चे कर्ज मिळण्यावद्दल सेंट्रल फायनान्सिंग एजन्सी मार्फत शिफारस केलीं आहे.

पॉवरलूम्स अॅसोसिएशन

इचलकरंजी येथील विणकर पॉवरलूम असोसिएशन ही सहकारी संस्था विणकर सभासदांना आर्ट सिल्क पुरविण्याचा व्यवसाय करते. असोशिएशनची सभासद संख्या ४७१ असून मागांची संख्या २३०० आहे. संस्थेचें भांडवल रु. १००००० आहे.

विद्युत माग योजना

हातमागाचे विद्युत मागांत रूपांतर करण्याच्या योजनेखालीं इचलकरंजी मध्यवर्ती विणकर (सोसायटीस) असोसिएशनला २५ विद्युत माग मंजूर करण्यांत आले आहेत.वडगांव विणकर सोसायटीला १५ आणि हुपरी सन्मित्र विणकर सोसायटीस १५ विद्युत माग मंजूर केले आहेत. तसेंच कोडोली विणकर सोसायटी व रेंदाळ विणकर सहकारी सोसायटीला प्रत्येकी १५ विद्युत माग देण्याबाबत शिफारस झाली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यांत उद्यमनगर येथें एक सहकारी इंडस्ट्रिअल इस्टेट रजिस्टर करण्यांत आली आ हे. कोल्हापूर येथील औद्योगिक वसाहत मध्यम प्रकारची असून उद्यम नगर औद्योगिक सहकारी सोसाटी-

सरकारी इंडस्ट्रियल इस्टेट

तर्फें वसाहतीचा विकास केला जात आहे. या सोसायटीचा मूळ उद्देश उद्यमनगर औद्योगिक वसाहतीं भागांतील सरकारी व बिन सरकारी जमिनीचे प्लॉटस् ताब्यांत घेणें असा आहे. सध्यां घेतलेल्या प्लॉटवर शेड बांधण्याचें काम चालूं आहे. औद्योगिक केंद्रे सुरूं करण्याकरितां २६ वर्क्स शेड, सभासदांच्या ताब्यांत दिलेल्या आहेत. अलिकडे सोसायटीला सरकारकडून सुमारें २० इमारती बांधण्यासाठीं रु. ४१,१७१ किंमतीची जमीन देण्यांत आली आहे.

प्रक्रिया सहकारी संस्था

या सदरांत पुढील तीन संस्था येतात. (१) लक्ष्मी सहकारी प्रोसेसर्स सोसायटी इचलकरंजी ही सोसायटी कँलेंडरींग, ब्लीचिंग आणि फिनिशिंग प्लँटच्या मदतीनें तयार मालाचे प्रोसेसींग करण्याकरितां व्यवस्था करणार आहे. १,९७,०९७ रु. किंमतीचे ब्लीचिंग प्लँट खरेदी करण्यांत आले आहे. नोव्हेंबर १९५८ मध्यें प्रोसेसिंगचें काम सुरू झालें आहे.

सीमेंट कॉंक्रीट उत्पादक सहकारी संस्था कोल्हापूर

सदरहू सोसायटी घरबांधणीकरतां लागणारे सीमेंट पाईप्स, गटाराकरतां लागणारे पाईप्स तयार करण्याचें काम करते. सोसायटी १९५८ सालीं स्थापन झाली असून तिचे २१ सभासद आहेत. संस्थेचें भांडवल २७७५ असून वार्षिक उलाढाल सुमारें ४११६३५ रुपयांची आहे.

टांगामालक औद्योगिक सहकारी संस्था कोल्हापूर

टांगा चालविणाऱ्या सभासदांना लागणारा कच्चा माल, अवजारें वगैरे खरेदी करून त्यांचा पुरवठा करण्याच्या उद्देशानें सोसायटी स्थापन झालेली आहे. सभासदांना १२६०रु. टांगाधंद्याला लागणाऱ्या सामानाकरितां १९५८–५९ सालीं पुरविण्यांत आले. सोसायटीनें ऑटो रिक्षा चालविण्याचा धंदा सुरू करण्याच्या दृष्टीनें आपले पोटनियम दुरुस्त केले आहेत.

जंगल कामगार सहकारी संस्था

कोल्हापूर जिल्ह्यांत एकूण ११ जंगल कामगार सहकारी संस्था काम करीत असून चंदगड तालुका आणि भुदरगड तालुका येथें प्रत्येकी एक सोसायटी स्थापन करण्यासाठीं प्रयत्न चालू आहे. शेळप येथील मजूर कंत्राट सहकारी सोसायटी जंगल कूपांचे तोडणी काम करीत आहे व जंगल कामगार सोसायटीचे पोटनियम मंजूर झाले आहेत. या सोसायटयांना कामासाठीं १६ जंगल कूप ताब्यांत दिलेले आहेत. भुदरगड तालुक्यांत वेंगरुळ येथें नवीन सोसायटी स्थापन झाली आहे. हजगोळी जंगल कामगार संस्थेस भांडवलाकरतां ३०००० रु. मंजूर झाले आहेत. १५०० रु. आर्थिक सहाय्य व सामाजिक कार्याकरितां १२०० रु. मिळाले आहेत.


जिल्हा औद्योगिक सहकारी संघ कोल्हापूर

सदर संस्था जिल्ह्यांत काम करणाऱ्या निरनिराळ्या सहकारी संस्थांना त्यांच्या अडचणीच्या वेळी मदत करण्याच्या उद्देशानें दिनांक २०–१२–१९५८ रोजी स्थापन झाली. संघाचे मुख्य उद्देश सहकारी संस्थाना लागणारा माल पुरवठा करणें आणि त्यांच्याकडून तयार झालेल्या पक्या मालाच्या विक्रीची व्यवस्था करणें हा आहे. या संघाला मदत म्हणून ५००० रुपये व अनुदान म्हणून ३०३५ रु. मंजूर झाले आहेत. या संघातर्फे तयार मालाच्या विक्रीकरतां एक विक्रीकेंद्र चालविलें आहे. संघाचे सभासद ६४ असून त्यांपैकी ३५ सोसायटचा व २९ वैयक्तिक सभासद आहेत. जिल्ह्याच्या नऊ तालुक्याकरतां जंगल कामगार संस्थाकरतां संघाकडे एजन्सी आहे.

विणकर सहकारी संस्था

जिल्ह्यांत २७ विणकर संस्था काम करीत आहेत. परंतु त्यांतील जवळ जवळ निम्म्या संस्थांचें काम म्हणावे तसें जोरांत चालू नाहीं. याचें मुख्य कारण विणकर लोकांचे सारखे गावोगांव स्थलांतर चालू आहे. व वरील संस्था पूर्वी नियंत्रणाच्या काळांत स्थापन झालेल्या होत्या. त्यावेळीं सूत वांटपाचें मुख्य काम केलें जात होतें. परंतु सूतवांटपावरील नियंत्रण रद्द झाल्यावर वरील काम सोसायटयांकडून काढण्यांत आलें. त्यामुळें कामावर परिणाम झाला. इचलकरंजी, कोडोली,

सहकारी कोल्हापूर



टीप-
संदर्भाच्या खुणेच्या वरील आंकडे त्या त्या तालुक्यांतील सोसायट्यांच्या संख्या दाखवितात.

कांडगांव, सांगरुळ, कागल, हुपरी, कुरुंदवाड, या ठिकाणीं विणकर समाज केंद्रीत झालेला असून सहकारी हातमाग विकास योजनेखालीं मदत केली जाते.

हातमागाच्या कापडावर रिबेट देण्याची योजना चालू असून विणकर संस्थांना ५०,५३० रुपये हातमागाच्या कापडावर १९५९–६० सालांत रिबेट देण्यांत आलें.

कोल्हापूर जिल्ह्यांतील सहकारी संस्थांचा विस्तार

(अ)	शेतकी पत (भांडवल) पुरवठा करणाऱ्या संस्था		८७०
(१)	जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँक	१	
(२)	शेतकी सहकारी पतपेढ्या लि.,	२१	
(३)	शेतकी सहकारी पतपेढ्या अ. लि.,	६७	
(४)	मोठ्या आकाराच्या वि. का. स. सोसायट्या	९७	
(५)	लहान आकाराच्या वि. का. स. सो. अन. लि.,	४३	
(६)	लहान आकाराच्या वि. का. स. सो. लि.,	१४९	
(७)	सेवा सहकारी सोसायट्या	३५१	
(८)	शेतकी बँका	२	
(९)	धान्य सोसायट्या लि. व अन् लि.,	१३९	
(ब)	बिगर शेतकी पतपुरवठा सोसायट्या व बँका		१२२
(१)	शहरी पत पुरवठा सोसायट्या	२४	
(२)	अर्बन बँका	१३	
(३)	पगारी नोकरांच्या सोसायट्या व बँका	२४	
(४)	गिरणी कामगार सोसायट्या	४	
(५)	भिशीं	५७	
(क)	शेतकी बिगर पतपुरवठा सोसायट्या		७७
(१)	जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ	१	
(२)	तालुका सहकारी खरेदी विक्री संघ	११	
(३)	तालुका डेव्हलपमेंट बोर्डस्	९	
(४)	सहकारी साखर कारखाने	५	
(५)	दूधपुरवठा सोसायट्या	७	
(६)	बी–बियाणे व अवजारें पुरवठा सोसायट्या	१	
(७)	फॉडर सोसायट्या	६	
(८)	पाणीपुरवठा सोसायट्या	१३	
(९)	पाटबंधाऱ्यांच्या सोसायट्या	८	
(१०)	फार्मिंग सोसायट्या	१५	
(११)	पीकसंरक्षण सोसायट्या	१	
(ड)	बिगर शेतकी बिगर पतपुरवठा सोसायट्या		३२९
(१)	औद्योगिक सोसायट्या	१४९	
(२)	इतर सोसायट्या	९०	
	(अ) मोटार बहातूक सोसायट्या	२	

(ब)	मच्छिमारी सोसायट्या	२	
(क)	ग्राहक सोसायट्या	२४	
(ड)	बेटर लिव्हिंग सोसायट्या	९	
(इ)	आरोग्य सोसायट्या	१	
(फ)	घर-बांधणी सोसायट्या	५२	
(इ)	फेडरल संस्था		१४
(१)	तालुका को–आप. सुपरवायझिंग युनियन्स	११	
(२)	हाऊसिंग युनियन	१	
(३)	जिल्हा सहकारी बोर्ड	१	
(४)	जिल्हा औद्योगिक संघ	१	

---

१४. मासेमारी

कोल्हापूर जिल्हा हा सह्याद्रि घाटाच्या माथ्यावर असून ह्या जिल्ह्यांतून महत्त्वाच्या अशा पांच मोठ्या नद्या वाहतात; तसेंच लहान मोठे असंख्य तलावहि अनेक ठिकाणीं आहेत. समुद्रकिनाऱ्यापासून हा जिल्हा ८४ मैलांवर वसलेला असल्यामुळें या जिल्ह्यांत समुद्रांतील मासळी फारच थोडया प्रमाणांत व तीहि केवळ शहरापर्यंत पोहोचूं शकते. त्यामुळें येथील मत्स्यसंवर्धन हें केवळ नद्या व तलाव या पुरतेच मर्यादित आहे. तरीपण या जिल्ह्यांत मासेमारीवर उपजीविका करणारे भोई समाजांतील लोक बरेच असून ते सर्वस्वी नद्या व तलावांतील उत्पादनावरच अवलंबून आहेत.

संस्थान विलीन होण्यापूर्वी नद्या–तलाव यांची विल्हेवाट संस्थानच्या शेतकी विभागामार्फत होत होती व त्यांतील मत्स्योत्पादन हे सदर नद्या तलावांतील काहीं ठराविक जातींच्या माश्यापासूनच होत होते. आणि या माश्यांत मोठी वाढ होणाऱ्या अथवा जलद उत्पन्न होणाऱ्या जातींच्या अभावामुळें हा धंदा फार मर्यादित होता.

संस्थान विलीन होऊन येथें मुंबई सरकारचा कारभार सुरू झाल्यानंतर मासेमारी धंद्याकडे मत्स्यसंवर्धन विभागानें लक्ष पुरवून सदर बाबतींत सुधारणा करण्याच्या दृष्टीनें प्रयत्न करण्यासाठीं कोल्हापूर येथें सुपरिटेंडेंट ऑफ फिशरीज यांची नेमणूक केली.

सुपरिटेंडेंट ऑफ फिशरिज यांनीं प्रथम येथील नद्या–तलावांत जलद वाढणाऱ्या व मोठ्या होणाऱ्या जातींच्या माश्यांची उणीव भरून काढण्यासाठीं कलकत्त्याहून गंगा नदींतील कटला, रोहूं, मृगळ या तीन जलद वाढणाऱ्या व फार मोठ्या होणाऱ्या जातींचें बी आणून तें मोठ्या तलावांत आणि नद्यांत सोडलें. त्यामुळें हा उद्योग येथें मोठ्या प्रमाणावर सुरूं झाला. दरवर्षी येथें माश्यांच्या बियांची जोपासना करण्यासाठीं ६०'×४०'×५' या आकाराच्या नर्सरी तलावांची आवश्यकता होती. पण कसबा बावडा येथें असलेला पूर्वीचाच एक तलाव या कामासाठीं वापरला जात असून त्या तलावांतून गाळ काढून त्याची सुधारणा करण्यांत येत आहे. तसेंच बावडा येथील सर्व्हिस हॉस्पिटलजवळ अदमासें एक एकर जागेंत सहा तलाव खोदून घेऊन त्यांचाही वापर केला जात आहे. तेथें दरवर्षी माश्यांचें बी वाढविलें जातें.

येथील नद्यांतून मिळणाऱ्या माश्यांचें संशोधन करतां असें आढळलें कीं, तांबीर या जातीचा मासा येथें मुबलक प्रमाणांत मिळतो व त्यांची वाढहि कांहीं प्रमाणांत जलद होते. त्यामुळें वरील कार्याबरोबरच पावसाळ्यांत तांबीर मासा जेव्हां अंडीं घालतो, तेव्हां तीं जमविण्याचाहि एक वार्षिक कार्यक्रम सुरू करण्यांत आला आहे. कलकत्त्याहून मागविलेल्या माश्यांबरोबर हे मासेहि नर्सरी तलावांत वाढविण्याचें काम सुरूं

आहे तांबीर, कटला, राहू व मृगळ ह्या माशांचीं पिले नर्सरी तलावांत जवळ जवळ चार महिने वाढल्यावर ते साधारण ६ ते ९ इंच लांबीचे होतात. या तलावांत त्यांची जलद वाढ होण्याच्या दृष्टीनें शेणखत वगैरे टाकावे लागते. नंतर हे वाढलेले मासे त्या तलावांतून काढून सप्टेंबर ते डिसेंबरपर्यंत ठिकठिकाणच्या लहान-मोठ्या तलावांत सोडण्यांत येतात. हे मासे नदीमधून व नर्सरी मधून काढण्यासाठीं विशिष्ट प्रकारची जाळी असतात व तीं पत्र्या-हंडचांतून ट्रकमधून निरनिराळ्या ठिकाणीं नेली जातात. प्रत्येक तलावाच्या मगदुराप्रमाणें त्यांत मासे सोडले जातात. दरवर्षी लहान–मोठ्या तलावांत हे मासे सोडण्यांत येत असल्यामुळें प्रत्येक तलावांत या माश्यांची संख्या वाढते व मग त्या तलावांतून हे मासे काढले जातात. सर्व तलावांचे वर्षांतून एकदां या ऑफिसतर्फे उघड लिलांव केले जातात. त्यामुळें वर्षाला वार्षिक महसूल सुमारें पांच हजार रु. मिळतो. तसेंच नद्यांचे भागहि लिलावांत काढले जातात व त्यापासूनहि आठ हजार रु. महसूल मिळतो.

भोईराज सहकारी संस्था

या भागांमध्यें माश्यांचा धंदा करणारा भोई समाज मागासलेला असून त्या समाजाचा विकास करण्यासाठीं सरकारनें कांहीं सवलती देण्याचें ठरविलें असून कोळयांच्या सहकारी सोसायटचा स्थापन करण्यांत येत आहेत. कोल्हापुरांत पहिली सहकारी संस्था म्हणजे भोईराज को–ऑप. सोसायटी ही असून ही संस्था १९५२ च्या डिसेंबर महिन्यांत रजिस्टर केली गेली. तेव्हांपासून सदर संस्थेला कांहीं सवलती देण्यांत आल्या आहेत. या संस्थेला उघड लिलावांतल्या दरापेक्षां सवलतीच्या दरांत मोठे तलाव व नद्यांचे भाग दिले जातात. तसेंच सरकारच्या पंचवार्षिक योजनेंत पुरस्कार केलेल्या योजनेपैकीं मच्छिमारीसाठीं लागणाऱ्या साधनाच्या किंमतीवर अनुदान देण्याची योजना येथें सुरू करण्यांत आली व त्यामुळें भोई लोकांना त्यासाठीं लागणारे सूत व नायलॉन यावर अनुदान मिळूं लागले. वाढत्या कामाच्या दृष्टीनें १९५८ सालीं भादोले येथें जलक्षेत्र मच्छिमार नांवाची एक सोसायटी स्थापन करण्यांत आली. या संस्थेलाहि सवलतीच्या दरानें नद्या, तलाव व अनुदान वगैरेचा फायदा दिला जातो. जुन्या पद्धतीप्रमाणें इकडील भोई लोक बडप, घळ या सारखी हत्यारें वापरत असत. पण सोसायटचा निर्माण झाल्यापासून त्यांना या ऑफिसकडून नवीन पद्धतीसंबंधीं माहिती देऊन नवीन उपकरणें वापरण्यास प्रवृत्त करण्यांत येतें. या सोसायटचांनीं मुंबईहून नायलॉन आणून स्वतःची जाळीं बनविली आहेत. भोईराज फिशरीज को. ऑप सोसायटीकडे सध्यां कोल्हापुरातील रंकाळा, कोटीतीर्थ व राजाराम हे तीन तलाव आहेत. जलक्षेत्र मच्छिमार सोसायटीकडे वडगांव हा तलाव आहे. त्याशिवाय नद्यांचे भागहि त्या त्या सोसायटीकडे आहेतच.

येथील मत्स्योत्पादन दिवसेंदिवस वाढत जाऊन मच्छीबाजारांत माशांची आवकहि वाढते आहे. या माश्यांची योग्य विल्हेवाट लावून जनतेला चांगल्या स्थितीमध्यें मासे मिळावेत व भोई लोकांना योग्य तो मोबदला मिळावा म्हणून हा बाजार बांधणें अथवा असलेल्या मार्केटची दुरुस्ती करणें या योजनेखालीं नगरपालिकेस एक शीतकपाट दिलें आहे. येथील नगरपालिकेच्या सहकार्यानें या बाजाराची सुधारणा करण्यांत येणार आहे.

मत्स्योत्पादन

या विभागाचा वरील कार्यक्रम सुरू असतांनाच मत्स्योत्पादनाच्या बाबतींत येथें संशोधनहि चालते. १९५७ मध्यें मीरर कॉर्प ह्या जातीचा मासा उटकमंडहून आणून पन्हाळा येथील तलावांत सोडला गेला तेथें त्यांची चांगली वाढ झाल्याचें आढळून आलें. त्याची उत्पत्ती होण्यासाठीं निरनिराळे प्रयोग करण्यांत आले. ते यशस्वी झाले असून ह्या माश्यांची आतां येथें उत्पत्ती होऊं शकते, असें सिद्ध झालें आहे. कोल्हापूरला त्यांची उत्पत्ती होतें कीं नाहीं हें पहाण्यासाठीं या वर्षी पन्हाळचांतून २७४ मासे कोल्हापूर येथें आणून ते येथील रेसीडेन्सी तलावांत सोडले आहेत. मीरर कॉर्प हा मासा मत्स्योत्पादनाच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा असून भविष्यकाळांत त्याचें महत्त्व फारच वाढेल.

कोल्हापूर जिल्ह्यांतील राधानगरी तलाव म्हणजे मत्स्योत्पादन व मासेमारी यासाठीं नवीन कार्यक्षेत्र आहे. राधानगरी येथें एक असि. सुपरिंटेंडेंट ऑफ फिशरिजचे ऑफिस उघडलें असून त्या तलावांत मत्स्योत्पादन व मासेमारी यावर प्रयोग केले जातात. या तलावांत आतांपर्यंत २,३५,००० मासे सोडले गेले आहेत. ह्या जिल्ह्यांतील बऱ्याच तलावांची मालकी ग्रामपंचायती अथवा नगरपालिकेकडे आहे. तलावांत या ऑफिसकडून मासे सोडले जाऊन त्यांपासून मिळणारें उत्पन्न सरकार व ग्रामपंचायत अथवा नगरपालिका यामध्यें निम्मे-निम्मे असे विभागलें जातें. पण आतां कांहीं ग्रामपंचायती स्वतः माश्यांचीं पिल्ले विकत घेऊन तीं आपापल्या तलावांत वाढविण्याचा उपक्रम करीत आहेत. त्यामुळें सर्व उत्पन्न त्यांनाच मिळू शकेल.

राधानगरी तलाव

---

१९. वाहतुकीची सोय

कोल्हापूर हें वाहतुकीच्या दृष्टीनें देश व कोंकण यांतील एक महत्त्वाचा दुवा असल्यानें महाराष्ट्र स्टेट ट्रान्स्पोर्टमध्यें जे अनक विभाग आहेत, त्यांत या विभागाचा क्रमांक बराच वरचा लागतो.

या विभागांत (१) कोल्हापूर, (२) सांगली, (३) विटे, (४) तासगांव, (५) इचलकरंजी, (६) इस्लामपूर व (७) जत असे सात डेपो आहेत. कोल्हापूर हे या विभागाचे मुख्य विभागीय ठिकाण असल्यानें साहजिकच विभाग व डेपो अशा दोन्हीं कचेऱ्यांचा येथें समन्वय झालेला आहे. विभागाची सर्व सूत्रें विभाग–नियंत्रक डिव्हिजनल कंट्रोलर यांजकडे असून या विभागांतील उतारूं वाहतुकीच्या सुखसोईची जबाबदारी त्यांच्यावरच असते. (१) विभागीय वाहतुक अधिकारी, ट्रॅफिक (२) शासन अधिकारी, (३) विभागीय तांत्रिक अधिकारी हे त्यांच्या कामांत सहाय्य करीत असतात. या अधि-काऱ्यांना सुद्धां बरेच सहाय्यक दिलेले असून शासन व्यवस्थेकरितां कचेरीचे कामगार विभाग, वाहतूक विभाग असे अनेक भाग पडलेले आहेत. या विभागांची डेपोमधील (कोल्हापूर) वाहतूक व्यवस्थितरीत्या चालावी म्हणून "अ" दर्जाच्या डेपो प्रमुखाची योजना केली असून त्यांच्या मदतीस उपवाहतुक अधि-कारी ए. टी. एस. मुख्य यांत्रिक हे सहाय्यक दिलेले आहेत. या विभागांत खालील मार्गांचा समावेश होतो.

१.	कोल्हापूर	...	आजरा	२.	कोल्हापूर	...	अष्टा
३.	,,	...	बेळगांव	४.	,,	...	भोगांव
५.	,,	...	दत्तवाड	६.	,,	...	गडहिंग्लज
७.	,,	...	महागांव	८.	,,	...	गगनबावडा
९.	,,	...	गारगोटी	१०.	,,	...	घोटवडे
११.	,,	...	हसूर	१२.	,,	...	हुपरी
१३.	,,	...	जोतिबा	१४.	,,	...	वडगांव
१५.	,,	...	कडगांव व्हाया म्हसवे	१६.	,,	...	कागल
१७.	,,	...	कळे	१८.	,,	...	कापशी
१९.	,,	...	कापशी व्हाया भेडसगांव	२०.	,,	...	कारदगा
२१.	,,	...	खोची	२२.	,,	...	कोडोली
२३.	,,	...	कोडोली व्हाया वडगांव	२४.	,,	...	कोतोली

२५.	”	...	कुरुंदवाड	२६.	”	...	कोन्नूर
२७.	”	...	कुरुंदवाड व्हाया रेंदाळ	२८.	”	...	कोगे
२९.	”	...	मलकापूर	३०.	”	...	मांगूर
३१.	”	...	मोहरे	३२.	”	...	मुरगुड
३३.	”	...	कासारवाडा	३४.	”	...	नंदगांव
३५.	”	...	निपाणी	३६.	”	...	पन्हाळा
३७.	”	...	पाटगांव	३८.	”	...	पुणें
३९.	”		राधानगरी	४०.	”	...	पुणें व्हाया इस्लामपूर
४१.	”	...	राधानगरी धरण	४२.	”	...	सांगाव
४३.	”	...	सांगरुळ	४४.	”	...	वडगांव
४५.	”	...	सावर्डे	४६.	”	...	विशाळगड
४७.	”	...	व्हरवडे	४८.	आजरा	...	गडहिंग्लज
४९.	गडहिंग्लज	...	महागांव	५०.	”	...	चंदगड
५१.	”	...	नेसरी	५२.	गारगोटी	...	राधानगरी
५३.	”	...	उत्तुर	५४.	”	...	गडहिंग्लज
५५.	निपाणी	...	राधानगरी	५६.	”	...	निपाणी
५७.	”	...	गडहिंग्लज	५८.	संकेश्वर	...	आजरा
५९.	”	...	कापशी	६०.	”	...	गडहिंग्लज
६१.	गडहिंग्लज	...	हलकर्णी	६२.	कोल्हापूर	...	पोफळी

लांबचा प्रवास सुखकर व त्वरित होण्याच्या दृष्टीनें मुख्यतः कोल्हापूरहून पुण्यास जाणाऱ्या प्रत्येक गाडीला लागलीच मुंबईस जाणाऱ्या रेल्वे गाड्या मिळतील अशी व्यवस्था करण्यांत आली आहे.

सोयी व सवलती

वर निर्दिष्ट केलेल्या रस्त्यावरील उतारूंच्या वाहातुकीसाठीं या विभागाच्या दिमतीस ६५ गाड्या देण्यांत आल्या आहेत. जनतेच्या सोयींच्या दृष्टीनें सवलतीच्या अशा १५ नये पैसे दरांत वरील मार्गावर धावणाऱ्या गाड्यांचें वेळापत्रक दरसाल दोनवेळां (उन्हाळीं व पावसाळी) प्रसिद्ध करण्यात येते. सदर वेळापत्रकांत पार्सल, रिझर्व्हेशन, स्पेशल बसेस आदिसंबंधी महत्त्वपूर्ण माहितीहि उपलब्ध असते. शिवाय प्रत्येक स्टँडवर वेळापत्रकाचे तक्ते लावलेले असतात. बाजाराच्या दिवशीं उतारूंची होणारी विशेष ये-जा लक्षांत घेऊन बाजारकऱ्यांच्या सोयीसाठीं खास गाड्या त्या दिवशीं सोडण्याची तरतूद केली असून बाजारचा ठरलेला दिवस, मार्ग व वेळां या गोष्टी वरील वेळापत्रकांत दिलेल्या असतात. जनतेच्या सोईच्या दृष्टीनें सहली, क्रीडोत्सव, लग्नकार्य, परीक्षा, शिबिरें इत्यादिसाठीं खास गाड्या पुरविण्याची योजना केलेली आहे. शैक्षणिक सहलींसाठीं खास सवलतीचे दर ठेवण्यांत आले आहेत. वरील सर्व बाबींची नियमावली डेपो प्रमुख यांजकडे विचारणा केल्यास केव्हांहि मिळू शकते. यात्रा व उरूसाकरितां मुद्दाम जादा गाड्या सोडून उतारूंची सोय करण्यांत येते.

गाडीच्या प्रत्येक तळावर प्रवाशांची गैरसोय होणार नाहीं या दृष्टीनें प्रयत्न करण्यांत येत आहेत. प्रतीक्षागृहें, पाणी, संडास, मुताऱ्या व उपगृहांची व्यवस्था आहे. उतारूंच्या योग्य तक्रारींची दखल

प्रवाश्यांची सोय घेतां यावीम्हणून प्रत्येक गाडीमध्यें तक्रार पुस्तक ठेवण्यांत आले असून त्या तक्रारीचा योग्य विचार ऑफिसमार्फत करण्यांत येतो. प्रवाशांव्यतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या सुखसोयीकडेहि लक्ष पुरविण्यांत येते. कामगार व त्यांच्या कुटुंबियांना अल्प खर्चात वैद्यकीय मदत व औषधें देण्यांत येतात.

औद्योगिक विकास, लोकसंख्या व वाढता विस्तार लक्षांत घेऊन वाहातुकींच्या सोयींसाठीं शहरांत " सिटी बस " सुरूं करण्यांत आलीं आहे. ता. १–४–१९६२ पासून सिटी बस कोल्हापुर नगरपालिकेच्या ताब्यांत गेलीं आहे.

उतारूंचीं गरज व वेळ पाहून विशिष्ट रस्त्यावर व विशिष्ट समयीं धांवणाऱ्या गाड्यांचें प्रमाण कमी अधिक करण्यांत येते. यासाठीं १५ गाड्यांचा ताफा पुरविण्यांत आला आहे. शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांना दरांत खास सवलत देण्यांत येते.

उतारू वाहतुकीशिवाय खालील ठिकाणीं "पार्सल बुकिंग" व "डिलिव्हरीं" ऑफिसेस उघडण्यांत आलीं आहेत. (१) कोल्हापूर डेपो, (२) इचलकरंजी डेपो, (३) आजरा डेपो (४) वडगांव (५) हातकणंगले (६) मलकापूर, (७) कागल, (८) राधानगरीं, (९) रेंदाळ, (१०) पन्हाळा, (११) गारगोटीं, (१२) गडहिंग्लज, (१३). महागांव या विभागांत खालील ठिकाणीं व नमूद केलेल्या वेळीं यात्रा व उरूस भरतात. त्यासाठीं त्यावेळी खास जादा गाड्यांचीं सोय करण्यांत येते. (१) जोतिबा––चैत्र पौर्णिमा, (२) विशाळगड ––जानेवारी, (३) प्रयाग––१४ जानेवारींपासून १ महिना, (४) त्र्यंबोलीं––आश्विन शु. ५.

इचलकरंजी इचलकरंजीं हे कोल्हापूर शहराच्या पूर्वेस १८ मैलांवर वसलेलें एक मोठे औद्योगिक केंद्र असून पातळांच्या उत्पादनाबद्दल विशेष प्रसिद्ध आहे. इचलकरंजीं हा डेपो कोल्हापूर विभागाच्या कक्षेंत असून सन १९५३ पासून अस्तित्वांत आहे. पुढीलप्रमाणे या डेपोच्या गाड्या उतारूंचीं ने-आण करतात.

कोल्हापूर––इचलकरंजीं
इचलकरंजी––हातकणंगले स्टेशन
इचलकरंजी––किणीं धुणकी
इचलकरंजी––कोडोलीं
इचलकरंजी––मलकापूर
इचलकरंजी––मिरज
इचलकरंजी––सांगलीं
इचलकरंजी––वडगांव
हातकणंगले––बाहुबली
हातकणंगले––कुंभोज
कोल्हापूर––कडोलीं
कोल्हापूर––वडगांव
कोल्हापूर––पन्हाळा
सांगली––वडगांव
सांगली––नांद्रे
वडगांव––मनपाडळे
कोल्हापूर––खोचीं

कोल्हापूर–इचलकरंजी–पुणें महाबळेश्वर

सदरील रस्त्यावरील वाहतुक यंत्रणा चालूं ठेवण्यास डेपो मॅनेजर इचलकरंजी यांच्याकडे गाड्या देण्यांत आल्या आहेत.

१६ टेलीफोन, तार आदि व्यवस्था

कोल्हापुरांतील टेलिफोनची सर्व व्यवस्था ता. १५–७–१९४९ पासून केंद्र सरकारच्या पोस्ट व टेलिग्राफ विभागानें आपल्याकडे घेतली. १९५३ मध्यें टेलिफोन्सच्या वाढत्या गरजेनुसार ३०० लाईन्सची व्यवस्था करण्यांत आली. तसेंच न्यु पॅलेस पोस्ट ऑफिसमध्यें टेलीफोन एक्श्चेंज होतें तें शहरांत टाऊन हॉलमध्यें आणण्यांत आलें. १९५५ मध्यें टेलिफोन व्यवस्थेंत सुधारणा करून आणखीं १०० कनेक्शन्स जादा देण्यांत आलीं. १९५६ ते १९५९ या कालावधींत पुरेशा जागेच्या अभावीं टेलिफोनच्या व्यवस्थेंत गरज असूनहि कांहीं वाढ करता आली नाहीं. १९५९ च्या मार्च महिन्यांत टाऊन हॉल समोरच्याच थोडयाशा प्रशस्त इमारतींत टेलिफोन एक्स्चेंज हालविण्यांत आलें.

१९६० मध्यें नवीन इमारतींत नव्या पद्धतीचें ट्रंक एक्श्चेंज बसविण्यांत येऊन स्थानिक टेलिफोन एक्श्चेंजची मर्यादाहि ६०० पर्यंत वाढविण्यांत आली व २०० नवीन कनेक्शन्स देण्यांत आलीं. सध्यां या टेलीफोन एक्श्चेंजची मर्यादा ८०० असून थोडक्यांच दिवसांत ती १००० पर्यंत नेण्यांतयेईल.

पुणें टेलिग्राफ्स इंजिनीयरींग डिव्हिजनचा एक भाग म्हणून कोल्हापूर येथें ताराबाई पार्कमध्यें **कोल्हापूर सब डिव्हिजन** ता. १५–५–१९६१ पासून "टेलिग्राफ इंजिनियरींग सब-डिव्हिजन सुरू करण्यांत आली आहे. या सब-डिव्हिजनमध्यें कोल्हापूर व रत्नागिरी हे संपूर्ण जिल्हे आणि सांगली व सातारा या जिल्ह्यांचा कांहीं भाग समाविष्ट करण्यांत आला आहे. टेलिग्राफ्स व टेलिफोन्स यांची चोख व्यवस्था ठेवणें, यासंबंधी अधिकाधिक सोयी जनतेला उपलब्ध करून देणें हें या ऑफिसचें प्रमुख कार्य आहे.

सध्यां कोल्हापूर जिल्ह्यांत मे १९६१ अखेर असलेली टलीफोन (ट्रंक व स्थानिक) व्यवस्था खालीलप्रमाणें आहे.

	ठिकाण	टेलीफोन्सची मर्यादा व प्रकार	सध्यां कार्यान्वित असलेली कनेक्शन्स	वर्किंग एक्स्टेनशन्स
(१)	कोल्हापूर	७०० मॅन्युअल	६१५	८१
(२)	इचलकरंजी	२०० मॅन्युअल	१६२	१८
(३)	गडहिंग्लज	५० मॅन्युअल	४७	१
(४)	जयसिंगपूर	५० ऑटो	४६	७

तसेंच सध्या या जिल्ह्यांत असलेलीं टेलिफोन्सचीं पब्लिक कॉल ऑफिसेस खालील प्रमाणें आहेत. (१) आजरा, (२) गारगोटी, (३) हातकणंगले, (४) दुपरीं, (५) कागल, (६) मलकापूर, (७) पन्हाळा, (८) नरसोबाचीवाडी, (९) राधानगरी, (१०) शिरोळ.

त्याचप्रमाणें तार पाठविण्याची सोय असलेलीं पोस्ट ऑफिसेस खालीलप्रमाणें आहेत.
(१) चंदगड, (२) गगनबावडा, (३) गांधीनगर, (४) हुपरीं, (५) राधानगरी, (६) कागल, (७) आजरा, (८) गारगोटी, (९) मुरगुड, (१०) हातकणंगले, (११) इचलकरंजी, (१२) जयसिंगपूर, (१३) मलकापूर, (१४) नरसोबाचीवाडी, (१५) शिरोळ, (१६) पन्हाळा, (१७) वडगांव, (१८) गडहिंग्लज.

गडहिंग्लज येथें असलेलीं ५० फोन्सची व्यवस्था १०० वर नेण्याचें काम चालूं आहे. तसेंच जयसगपूर येथेंहि १०० फोन्सची व्यवस्था आणि चंदगड येथें ट्रंक टेलिफोन व्यवस्था लवकरच करण्यांत येत आहे.

खालील १० गांवांत तार ऑफिसेस सुरू करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें आहे. (१) हलकर्णी, (२) शिगांव, (३) पट्टणकोडोली, (४) विशाळगड, (५) शाहूवाडी, (६) राशिवडे, (७) कडगांव, (८) रुकडी, (९) नांदणी, (१०) सावर्डे.

पोस्ट विभागाची व्यवस्था

कोल्हापूरला पोस्ट खात्याची विभागीय कचेरी आहे. या विभागीय कचेरीच्या नियंत्रणाखालीं कोल्हापूर व सांगली हे दोन्हीं जिल्हे आहेत. विभागीय प्रमुख म्हणजे "सुपरिंटेंडेंट ऑफ पोस्ट आफिसेस,' कोल्हापूर डिव्हिजन" यांची कचेरी कावळयाच्या नाक्यानजिक पाटणकर बंगल्यांत आहे. ही विभागीय कचेरी कोल्हापूर येथें १९५५ मध्यें सुरू झाली. त्यापूर्वी सातारा डिव्हिजनखालीं हा भाग होता.

कोल्हापूर शहराचें हेड पोस्टऑफिस शाहुपुरींत डोंगळे बिल्डिंगमध्यें आहे. आणि शहराच्या निरनिराळ्या भागांत पुढील टाऊन सब-पोस्ट ऑफिसेस आहेत. (१) शाहुपुरीं, (२) लक्ष्मीपुरी, (३) रेल्वे-स्टेशन, (४) शनिवार पेठ, (५) मंगळवार पेठ, (६) रंकाळा, (७) राजारामपुरीं, (८) न्यू पॅलेस, (९) गूळ मार्केट यार्ड, व (१०) बाबूजमाल

इचलकरंजी येथेंहि दोन टाऊन सब पोस्ट ऑफिसें आहेत.


कोल्हापूर जिल्ह्यांत खेडोंपाडीं मिळून सध्या एकूण २४ सब पोस्ट ऑफिसें २२१ ब्रँच पोस्ट ऑफिसें, २४ टेलिग्राफ ऑफिसें आणि २१ टेलीफोन्स ऑफिसें आहेत.

अल्प बचत योजना

महाराष्ट्र राज्यांतील इतर जिल्ह्याप्रमाणेंच कोल्हापूर जिल्ह्यांतहि बचत योजनेचें काम सुसंघटितपणें चालूं आहे.

या योजनेचा प्रचार खेड्यापाड्यांतून करण्यासाठीं तालुकानिहाय अल्पबचत योजना समिती संघटित केलेली असून या समितीच्या सहाय्यानें बचत योजनेची सर्व कामें योग्य प्रकारें पार पाडलीं जातात.

गेल्या दोन वर्षांच्या कार्याचा आढावा घेतल्यास असें दिसून येईल कीं, लोकांच्या कडून दरवर्षी सरासरी एक कोटी रुपये या योजनेंत गुंतविले जातात.



टेलिफोन कचेरी

○ तार कचेरी

तसेंच स जिल्ह्याच्या औद्योगिक, शैक्षणिक व शेतकी विकासाबरोबरच आर्थिक विकास घडवून आणण्या-
(१) अल्प बचत योजनेची संघटना जास्त बळकट केली जात आहे. या जिल्ह्यांत केंद्र सरकारनें नेमलेले दोन संघटक व महाराष्ट्र सरकारचें दोन सुपरवायझर्स अल्प बचत योजनेचें काम करीत आहेत. तसेंच निरनिराळ्या क्षेत्रांत फिरून लोकांना योजनेचे महत्त्व पटवून देण्याचे काम ५४८ एजंटस करीत आहेत.

मासिक किंवा आठवडा वेतन मिळविणाऱ्या वर्गातून सुद्धां नियमितपणें बचत करून घेण्यासाठीं निरनिराळ्या कचेऱ्यांतून व इतर वेगवेगळ्या संस्थांतून सुमारें १७५ बचत गट सध्या चालू आहेत. या गटांतून दरमहा सरासरी ३२,००० रुपये या योजनेंत गुंतविले जातात.

या योजनेंत सर्व लोकांना परवडण्यासारखे सुटसुटीत असे पांच रोखे आहेत. १९६०–६१ या वर्षी या सर्व प्रकारांत खालील प्रमाणांत रक्कम गुंतविली गेली आह.

(१)	१२ वर्षे नॅशनल प्लॅन सर्टिफिकेटस	२९,३०,००० रुपये
(२)	१० वार्षिक ट्रेझरी सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस	७,४३,००० ,,
(३)	१५ वर्षीय वर्षासन सर्टिफिकेटस	३,००० ,,
(४)	पोस्ट ऑफिस सेव्हींग्ज बँक	६७,००,००० ,,
(५)	संचित मुदतीच्या ठेवी	८६,००० ,,

नवीनच निघालेली संचीत मुदतीची योजना ही पगारी वर्गाला उत्तम असल्यामुळें सध्या ह्या योजनेचा प्रसार बचत गटांत फार जोरांत चालूं आहे.

जिल्ह्यांतील बचत योजनेचें लोण सामान्य जनतेपर्यंत पोहचत असून जास्तीत जास्त लोक या योजनेंत सहभागी होत आहेत.

सार्वजनिक संस्था व विश्वस्त निधींची नोंद

बॉम्बें पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० नुसार सार्वजनिक संस्थाची नोंद करणें, त्यांची तपासणी करणें-त्यांचा कारभार सुरळीत चालूं आहे किंवा नाहीं हे पाहणें या कामासाठीं कोल्हापूर येथें असिस्टंट चॅरिटीकमिशनर यांची कचेरी येथें सुरू झाली असून ती टाऊन हॉलनजिक आहे. या ठिकाणचे असिस्टंट चरिटी कमिशनर कोल्हापूर, सांगली, सातारा व रत्नागिरी या चार जिल्ह्यांचें काम पाहतात. या ऑफिसनें उपरोक्त कायद्याखाली नोंद केलेल्या संस्था खालील प्रमाणें आहेत.

(१)	हिंदूधर्म धार्मिक संस्था	१४०७
(२)	मुसलमान धार्मिक संस्था	१३२
(३)	ख्रिश्चन धार्मिक संस्था	१५
(४)	शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडाविषयक वगैरे	३१०
		१८६४

तसेंच सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० खाली नोंद झालेल्या संस्था १५८ आहेत.

उपरोक्त संस्थांचें कार्य चांगल्या तऱ्हेनें चालावें म्हणून सदर ऑफिसकडून दक्षता घेतली जाते. नियमाविरुद्ध कांहीं घटना दिसून आल्यास त्याबद्दल दावे केले जातात.

भारत सेवक समाजाची या जिल्ह्याची शाखा कोल्हापुरांत असून जुन्या राजवाड्यानजिक तिचें कार्यालय आहे. भारत सेवक समाजानें अंगिकारलेला कार्यक्रम खेडोंपाडीं प्रसारित करण्याचें व

ग्रामीण जनतेच्या विकासास हातभार लावण्याचें कार्य या शाखे. मार्फत केलें जातें. इचलकरंजी व कायशी

भारत सेवक समाज येथेंहि भारतसेवक समाजाच्या उप-शाखा उघडण्यांत आल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, कोल्हापूर विभाग

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कोल्हापूर विभागाची कचेरी नागाळा पार्कमध्यें असून या विभागाखालीं कोल्हापूर (सर्व) व सांगली व रत्नागिरि या जिल्ह्याचा कांहीं भाग येतो. कोल्हापूर जिल्ह्यांत सध्या अनेक खेडोपाडीं विजेचा पुरवठा करण्यांत आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यांत वीज निर्मिति करणारी, तीं प्रस्तारित करणारीं पॉवर स्टेशनें पुढील प्रमाणें आहेत. (१) राधानगरी हायड्रो इलेट्रिक पॉवर स्टेशन, (२) इमर्जन्सी इरिगेशन पॉवर स्टेशन, (३) डिझेल पावर स्टेशन, इचलकरंजी, (४) डिझेल पॉवर स्टेशन इस्लामपूर.

कोल्हापूर शहरांत सध्या जो वीजपुरवठा केला जातो तो कांहीं भागांत राधानगरीच्या विजेचा व कांहीं भागांत डिझेल पॉवर स्टेशनवरील विजेचा आहे. राधानगरीहून ३३,००० व्होल्टची वीज तारांनीं ३३ मैल लांबीवरून कोल्हापूरांत आणलेली आहे. तसेंच बापट कँप पॉवर स्टेशनवरून तयार झालेली ११,००० व्होल्टची वीज निरनिराळ्या ठिकाणच्या २७ ट्रॅन्सफॉर्मर केंद्रावर नेण्यांत आली असून या तारांचीं लांबी शहरांतच १२ मैलांहून अधिक आहे. राधानगरीची वीज व कोयनेची वीज एकत्रित करून मोठ्या प्रमाणांत वीजपुरवठा करण्याच्या दृष्टीनें सध्या काम चालू आहे. सध्या कोल्हापूरसह ९५ गांवांना वीज देण्यांत आलेली आहे.

लोकल बोर्डाचें कार्य

पाणी पुरवठा

कोल्हापूर जिल्हा सह्याद्रीच्या कडेकपारींत विखुरलेला असून दळणवळणाच्या दृष्टीनें बराच अडचणीचा आहे. तसेंच ग्रामीण भागांत पाणीपुरवठ्याचीं पुरेशीं साधनेंहि उपलब्ध नाहींत. तथापि अशा ग्रामीण भागांत पाणीपुरवठा करण्याकरितां व रस्ते बांधणी-करितां कसोशीनें प्रयत्न चालू असून जिल्ह्याची सर्वांगीण सुधारणा होण्याच्या दृष्टीनें प्रतिवर्षी सरकारकडून मिळणाऱ्या मदतीमधून रस्त्यांचीं व विहिरींचीं कामें लोकल बोर्डाकडून हातीं घेतलीं जात असत.

रस्ते

कोल्हापूर जिल्ह्यांतील जवळजवळ ८०० मैल लांबीचे रस्ते लोकल बोर्डाच्या ताब्यांत होते. त्यापैकीं ३४४ मैल लांबीचे खडीचे पक्के व ४५६ मैल लांबीचे कच्चे रस्ते आहेत. या रस्त्यांची चालू दुरुस्ती त्याचप्रमाणें त्यांचीं सुधारणा हीं कामें बोर्डाच्या फंडातून व प्रतिवर्षी सरकारकडून मिळणाऱ्या मदतीमधून केलीं जात असत.

प्रतिवर्षी सरकारकडून (१) व्हिलेज अॅप्रोच रोडस्, (२) एस्. टी. अॅन्ड अदर पॅसेंजर ट्रॅफिक रोडस व (३) लोकल पब्लीक वर्क्स या सदराखालीं प्रत्येकीं ६०,००० ते ७०,००० रक्कमेपर्यंत मदत मंजूर होत असून अशा रक्कमेंतून जिल्ह्यांतील नवीन रस्ते बांधणें,त्यांचीं सुधारणा करणें व नवीन पूल, मोऱ्या बांधणें,इत्यादि कामें सुरूं करून पुरीं केलीं जातात. वर उल्लेख केलेल्या सरकारी मदतीमधून गेल्या पांच वर्षांत खडीचे एकूण २३.२९ मैल लांबीचे नवीन रस्ते बांधण्यांत आले असून त्या शिवाय १७ मैल लांबीचे मुरुमाचे व ५.०० मैल लांबीचे मातीचे नवीन रस्ते बांधण्यांत आले आहेत. सुमारें ८.६२ मैल

लांबीच्या रस्त्यांची सुधारणा केलेली आहे. तसेच पांच लहान पूल, तेरा कॉजवेज, व ३० ह्यूम पाईप ड्रेन्सची नवीन कामेंहि पूर्ण झालीं आहेत.

रहदारी बंगले

बोर्डाच्या मालकीचे दोन रहदारी बंगले असून त्यामध्यें प्रवाशी लोकांची राहण्याची उत्तम सोय केलेली आहे. कृष्णकुंज नांवाचा बंगला हा कोल्हापूर गगनबावडा रस्ता मै. नं ३२–७ मध्यें असून बावडा. महालाच्या ठिकाणापासून एक मैल सहा फ. अंतरावर आहे. "शिवसदन" नांवाचा दुसरा बंगला (शिपुरता हुक्केरी) जिल्हा बेळगांव या ठिकाणीं मडिलगे शिपुर रस्ता मै. नं. १७ फ. ६ मध्यें असून निपाणी बस स्टँडपासून पांच मैल अंतरावर आहे.

धर्मशाळा

जिल्ह्यामध्यें १९ धर्मशाळा बोर्डाच्या मालकीच्या असून त्यांचा वाटसरू लोकांना राहाण्यासाठीं बराच उपयोग होतो. या धर्मशाळांची प्रत्येक वर्षी दुरुस्ती केली जात असून त्या सुस्थितींत ठेवण्यांत आलेल्या आहेत.

नावा

जिल्ह्यामध्यें एकूण ७१ सार्वजनिक नावेचे उतार असून त्या ठिकाणीं बोर्डाकडून जवळजवळ ७५ नावा वहातुकीच्या सोयींसाठीं पुरविण्यांत आल्या आहेत. या नावांचीं दुरुस्ती प्रतिवर्षी बोर्डाकडून होत असून पावसाळी हंगामामध्यें ग्रामीण भागांतील लोकांची रहदारीची चांगली सोय होते.

ग्रामीण पाणी-पुरवठा

बोर्डास या योजनेकरितां प्रतिवर्षी सुमारें १,००,००० रक्कमेपर्यंत सरकारकडून मदतीच्या रूपानें सहाय्य मिळतें व त्यानुसार ग्रामीण पाणीपुरवठा कामांचा विस्तृत प्रमाणांत कार्यक्रम तयार करण्यांत आला असून १९६०–६१ साल अखेरीस सुमारें २७५ कामें प्रगतिपथावर होती. या शिवाय जवळजवळ ४२५ नवीन कामें या कार्यक्रमामध्यें दाखल करण्यांत आलीं आहेत. हीं कामें २५ टक्के गांवमदत व ७५ टक्के सरकारी मदत घेऊन पूर्ण केलीं जातात.

गेल्या ५ वर्षाच्या (१९५६–५७ ते १९६०–६१) कालांत ग्रामीण पाणीपुरवठा या कार्यक्रमामधून हातीं घेण्यांत आलेल्या कामांवर रक्कम रु. ४,५७,८४५ खर्च करण्यांत आली असून एकूण ८८ कामें पुरीं करण्यांत आलीं आहेत. त्यापैकीं ६८ कामें नवीन विहिरी बांधण्याचीं असून २० कामें विहिरींच्या दुरुस्तीचीं होतीं. बोर्डानें पाणीपुरवठा करण्याकरितां वर नमूद केल्याप्रमाणें अभिनव योजना चालू केली आहे.

छोटे बंधारे

बोर्डाकडे (१) वाटंगी ता. गडहिंग्लज (२) नवीन कारंजे, (धोंडगोंडनाला) ता. राधानगरी (३) बाळेघोल ता. कागल या ठिकाणीं बंधारे बांधणें हीं कामें सरकारनें बोर्डाकडे सुपूर्त केलीं असून यापैकीं वाटंगी थेथील काम पुरें झालें असून बाकीचीं कामें प्रगतिपथावर आहेत.

दवाखाने

जिल्ह्याच्या निरनिराळ्या भागांत बोर्डाचे ३१ दवाखाने असून त्यापैकीं २९ आयुर्वेदिक व दोन ॲलोपॅथिक आहेत. शिवाय बहुतेक सर्व दवाखान्यांना सब-सेंटर्स आहेत. बोर्डाच्या दवाखान्यांमुळें खेडूत जनतेची फारच सोय झालेली असून त्यांना प्राथमिक वैद्यकीय मदत मिळू शकते. वैद्यकीय मदत अधिक उपलब्ध होण्याच्या दृष्टीनें बोर्डाकडून दवाखान्यांना सब-सेंटर्स दिलीं गेलीं आहेत. या योजनेमुळें ग्रामीण जनतेला वेळीच वैद्यकीय मदत उपलब्ध होत असते. तसेच बोर्डाच्या दवाखान्यांत अगदी अल्प किंमतीत भारी किंमतीचीं

इंजेक्शन्स व औषधें पुरविण्याची व्यवस्था केली आहे. बोर्डाच्या दवाखान्यांपैकीं आठ दवाखान्यांचें रूपांतर प्रायमरी हेल्थ सेंटरमध्यें झाल्यानें गांवकऱ्यांना वैद्यकीय मदत व आरोग्यासंबंधीं मार्गदर्शन होत असतें. त्याचप्रमाणें सर्पदंशावर भारी किंमतीची इंजेक्शनें मोफत देण्याची सोयहि बोर्डानें केली आहे. त्यामुळें सर्पदंशानें होणारी प्राणहानी थांबविण्यासाठीं फारच मोठी मदत होत आहे. तसेच बोर्डाच्या मालकीची एक आयुर्वेदिक औषधें तयार करण्याची फार्मसी काढण्यांत आली असून तीमधून बऱ्याच औषधांचा पुरवठा बोर्डाच्या दवाखान्यांना केला जातो.

शाळा

डिपॉझिट वर्क्स म्हणून नवीन शाळा इमारती बांधणें व त्यांची दुरुस्ती करणें हीं कामें बोर्डाकडे सुपूर्त केली गेली आहेत. प्रतिवर्षी जिल्हा इमारत समितीकडून शाळा–खोल्यांची संख्या विचारांत घेऊन बोर्डाकडे रक्कम भरणा केली जाते व त्यामधून शाळा बांधण्याची कामें बोर्डाकडून हातीं घेतलीं जातात. गेल्या पांच वर्षांत या बोर्डाकडून अंदाजे ४०० खोल्यांचें बांधकाम पुरे करण्यांत आलें आहे. शाळा बांधण्याच्या कामावर गेल्या पांच वर्षात अंदाजें रु. ९,६८,९११ पर्यंत खर्च झालेला आहे.

बोअरिंग

सरकारकडून बोर्डाला कर्ज पद्धतीवर चार इंची दोन बोअरिंग मशिन्स मिळालेलीं आहेत. आतां-पर्यंत १६ ठिकाणीं बोअरिंगचीं कामें हातीं घेण्यांत आलेलीं आहेत. त्यापैकीं १० ठिकाणचीं बोअरिंगचीं कामें यशस्वीरीत्या पार पाडण्यांत आलीं आहेत. सध्या दोन कामें चालू आहेत.

चावडया

सरकार कडून बोर्डाकडे चावडया, इमारती वगैरेच्या दुरुस्तीचीं कामें सोपविण्यांत आली आहेत. सरकारकडून मिळणाऱ्या मदतींतून त्यांची दुरुस्ती बोर्डातर्फे करण्यांत येते. कोल्हापूर येथें आयुर्विमा कार्पोरेशनची शाखा आहे.

होमगार्ड संघटना

कोल्हापूर येथें ७ मार्च १९५१ रोजीं कोल्हापूर जिल्हा होमगार्डस संघटना स्थापन झाली आहे. शहरांतील गर्दीच्या वेळीं रहदारी नियंत्रण, यात्रेमध्यें बंदोबस्त व नागरिक संरक्षणाची इतर कामें होमगार्डस करीत असतात. या संघटनेचीं जिल्ह्यांतील मोठ्या गांवीं व तालुक्याच्या ठिकाणींहि युनिटस व सब-युनिटस स्थापन झालीं असून त्यांची संख्या १३ आहे आणि त्यांत एकूण ७६४ होमगार्डस् आहेत. या जिल्ह्यांतील होमगार्डसनीं खेळ, नेमबाजी, संगीत यामध्यें प्राविण्य मिळविलेलें आहे.

रिमांड होम

कोल्हापूरांत जुन्या रेसग्राऊंडनजिक रिमांड होम (डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन चिल्ड्रेन्स होम) ही संस्था आहे. ही संस्था 'कोल्हापूर प्रोबोशन डिस्ट्रिक्ट अँड आफ्टर केअर असोसिएशन' तर्फे चालविली जाते १९४९ सालीं कोल्हापूर संस्थान विलीन झाल्यानंतर बाल संरक्षण कायद्याची अम्मलबजावणी करण्याकरितां सदरहू असोसिएशनची स्थापना झाली असून जिल्हाधिकारी हे या संस्थेचे अध्यक्ष असतात. या संस्थेच्या व्यवस्थापक समितीवर कोल्हा-पूरमधील सार्वजनिक कार्याची आवड असणारे प्रतिष्ठित नागरिक निवडले जातात.

सदर रिमांड होममध्यें बालसंरक्षण कायद्याखालीं ज्युवेनाईल कोर्टापुढें येणाऱ्या १६ वर्षाखालील मुलामुलींना ठेवलें जातें आणि सर्टिफाईड स्कूलमधून कांहीं अटींवर सोडलेल्या मुलामुलींवरहि देखरेख केली जाते. त्याचप्रमाणें उपरोक्त कायद्याखालीं ज्युवेनाईल कोर्टानें अटींवर सोडलेल्या मुलांमुलींवर देखरेख ठेवून त्यांना योग्य तें मार्गदर्शन करणें, बोर्स्टल स्कूलमधून अटींवर सोडलेल्या मुलांवर

देखरेख करणें, मुक्त कैद्यांना समाजांत पूर्ववत स्थान मिळण्यासाठीं खटपट करून त्यांना मदत करणें, अनाथ, उपेक्षित व संकटांत सांपडलेल्या बालकांच्या सुधारणेसाठीं आंखलेल्या उपाययोजनाबद्दल जनमत तयार करणें आदि कामें केलीं जातात. वरील कामाकरितां लागणारा पैसा जमा करणें व त्याचा त्या कामाकरितां उपयोग करणें इत्यादि कामें या संस्थेतर्फे केलीं जातात. या संस्थेंत आतांपर्यंत अनाथ, पोरक्या, अवखळ, भटक्या व गुन्हेगार, अशा २० हजारांवर मुलामुलींना प्रवेश देण्यांत आला.

रिमांड होमसाठीं या संस्थेनें स्वतःचीं अद्यावत सोयींची इमारत पद्माळा रेसकोर्स येथें बांधली असून तींत १२५ मुलें राहूं शकतात. तसेंच मुलींकरितां "अनाथ महिलाश्रम" मध्यें स्वतंत्र व्यवस्था केली आहे.

सदरहू संस्थेतील मुलामुलींना विणकाम, सूतकाम, विणकाम, बागकाम, स्वयंपाक, बँडवादन, श्रमदान, वगैरेंचें शिक्षण दिलें जातें.

हीं संस्था सरकारी मदत, निरनिराळ्या संस्थांकडून व व्यक्तींकडून मिळणारी मदत, वर्गणी यांतून चालविली जाते.

कोल्हापूर नगरपालिका

कोल्हापूर नगरपालिकेची स्थापना १२–१०–१८५४ रोजीं झाली. पहिल्या वर्षी नगरपालिकेवर सरकारनियुक्त सहा प्रतिनिधी होते. १९२१ पर्यंत सरकारनियुक्त २७ प्रतिनिधी झाले. या वेळेपर्यंत लोकनियुक्त प्रतिनिधी नव्हते. १९३१ मध्यें ४७लोकनियुक्त व ४ सरकारनियुक्त असे प्रतिनिधी होते. त्यानंतर १९५१ पासून सरकारनियुक्त प्रतिनिधी बंद झाले. सध्यां ४४ सभासद आहेत.

या नगरपालिकेचें उत्पन्न ३५ लाखांवर आहे. नगरपालिकेनें नागरिकांच्या सोयीसाठीं तीन अलोपॅथिक, एक होमिओपॅथिक, व सात आर्यांग्ल असे एकूण ११ दवाखाने चालविले आहेत. त्या शिवाय कै. सावित्रिबाई फुले सूतिकागृहहि चालविले आहे. तसेंच कुटुंब नियोजन केंद्रहि उघडलें आहे.

नगरपालिकेनें चालविलेलें कै. भास्करराव जाधव वाचनालय हे शहरांतील दुसऱ्या क्रमांकाचें वाचनालय आहे. तसेंच नगरपालिकेनें राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कूल हें अल्प फीमध्यें शिक्षण देणारे फक्त मुलींचें हायस्कूल १९४४ पासून सुरू केलें आहे. नगरपालिकेनें कोल्हापूरची अंडर ग्राऊंड ड्रेनेज योजनाहि हातीं घेतली आहे. या योजनेस ७५ लाख रु. खर्च येणार आहे. १–४–१९६२ पासून सिटी बस सर्व्हिसही नगरपालिकेनें ताब्यांत घेतली आहे.

कोल्हापूर शहर

क्षेत्रफळ : २५·७ चौ. मै. . (१९६१ खानेसुमारी).

लोकसंख्या : १,८७,३०६ . (१९६१ खानेसुमारी).

प्रेक्षणीय स्थळें–मंदिरें . (१) नवा राजवाडा (२) जुना राजवाडा, (३) राजाराम कॉलेज, (४) रंकाळा तलाव (५) शालिनी पॅलेस, (६) पद्माराजे गार्डन (७) शाहू मिल, (८) शुगर मिल,

(९) इंडस्ट्रियल इस्टेट (उद्यमनगर), (१०) अंबाबाईचे देऊळ. (११) टाऊन हॉल, खासबाग मैदान, (१३) पंचगंगा घाट, (१४) पुराण वस्तु संग्रहालय, (१५) जैन मंदिर, (१६) छत्रपति प्रमिलाराजे हॉस्पिटल.

प्रमुख संस्था . . . (१) कोल्हापूर नगरपालिका, (२) शेतकरी सहकारी संघ, (३) देवल कलब, (४) कोल्हापूर स्पोर्टस असोसिएशन, (५) श्री शाहू मार्केट कमिटी.

विद्यार्थ्यांसाठीं वसतिगृहें . . . . (१) प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग, (२) शाहू मराठा बोर्डिंग, (३) जैन बोर्डिंग, (४) वैश्य बोर्डिंग, (५) मुस्लिम बोर्डिंग, (६) समस्त नामदेव बोर्डिंग, (७) सेना विद्यार्थी बोर्डिंग, (८) आत्माराम रावराणे बॅकवर्ड क्लास हॉस्टेल, (९) श्री क्षात्रजगत्गुरु वैदिक स्कूल बोर्डिंग, (१०) श्रीस्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे छत्रपति वसतिगृह, (११) महाराणी शांतादेवी गायकवाड गृहशास्त्र शिक्षणसंस्था, (१२) अनाथ महिलाश्रम, (१३) आर्यसमाज (१४) रिमांडहोम, (१५) दैवज्ञ बोर्डिंग, (१६) सारस्वत बोर्डिंग, (१७) सी. के. पी. बोर्डिंग, (१८) सायन्स कॉलेज हॉस्टेल, (१९) श्री इंदुमति बोर्डिंग, (२०) मिस क्लार्क हॉस्टेल, (२१) जैन महिलाश्रम बोर्डिंग, (२२) लक्ष्मी छत्रपति विद्यार्थी वसतिगृह, (२३) श्रीमंत महाराज छत्रपति सरकार वसतिगृह, (२४) हिंदकन्या छात्रालय, (२५) ताराराणी विद्यापीठ (वसतिगृह) (२६) ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटर हॉस्टेल.

प्रमुख लॉजिंग बोर्डींग . . (१) पद्मा गेस्ट हाऊस, (२) न्यू बादशाही लॉज (३) कोल्हापूर गेस्ट हाऊस, (४) फाळके गेस्ट हाऊस, (५) गुजरात लॉज, (६) शाहू लॉज, (७) सेरेकेन गेस्ट हाऊस.

प्रमुख सिनेमा गृहें . . . (१) राजाराम, (२) पद्मा, (३) शाहू, (४) रॉयल, (५) प्रभात, (६) उमा, (७) सरस्वती, (८) व्हीनस, (९) लिबर्टी, (१०) उषा.

नाट्यगृहें . . (१) कै. केशवराव भोसले नाट्यगृह, (२) लक्ष्मी जलसा मंदिर.

महिला संघटना . . . (१) करवीर भगिनी मंडळ, (२) महिला सेवा मंडळ, (३) वनिता समाज, राजारामपुरी,

(४) महिला मंडळ, जुना बुधवार, (५) शुक्रवार पेठ भगिनी मंडळ, (६) भगिनी मंडळ, (७) महिला मंडळ, भोसलेवाडी, (८) कदमवाडी महिला मंडळ, (९) महिला मंडळ, लाईन बाजार, (१०) राजारामपूरी महिला मंडळ, (११) महिला मंडळ, शुगर मिल.

वाचनालयें . . . . (१) करवीर नगर वाचन मंदिर, (२) भास्कर राव जाधव वाचनालय. या शिवाय लहान सहान ५७ वाचनालयें.

वृत्तपत्रें . . . . (१) दै. पुढारी, (२) दै. सत्यवादी, (३) दै. नवसंदेश, (४) दै. समाज, (५) साप्ताहिक नवसंदेश, (६) सा. गर्जना, (७) सा. लोकसेवक (८) सा. जयशिवराय, (९) सा. दिव्यप्रकाश, (१०) सा. राष्ट्रप्रगति, (११) रयत मासिक, (१३) सा. धुमकेतू, (१३) सा. किसान, (१४) सा. तरुण भारत.

महाविद्यालयें . . . (१) राजाराम कॉलेज, (२) गोपाळकृष्ण गोखले कॉलेज, (३) कीर्ति कॉलेज ऑफ आर्टस्, (४) शाहजी लॉ कॉलेज, (५) कॉमर्स कॉलेज, (६) श्रीमन्महाराणी ताराबाई टीचर्स कॉलेज, (७) जनता महाविद्यालय अर्जुन नगर.

हायस्कूल . . . (१) राजाराम हायस्कूल, (२) ब्रँच राजाराम हायस्कूल, (३) विद्यापीठ हायस्कूल, (४) प्रायव्हेट हायस्कूल, (५) शिवाजी मराठा हायस्कूल, (६) आर्यविन ख्रिश्चन हायस्कूल, (७) पद्माराजे गर्ल्स हायस्कूल, (८) महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल, (९) न्यू हायस्कूल, (१०) नागोजीराव पाटणकर हायस्कूल, (११) शाहू दयानंद फ्री हायस्कूल, (१२) म्युनिसिपल हायस्कूल, (गर्ल्स), (१३) ताराराणी विद्यापीठ (१४) विक्रम हायस्कूल, (१५) इस्थर पॅटर्न गर्ल्स हायस्कूल, (१६) कोल्हापूर हायस्कूल, (१७) छत्रपति हायस्कूल, (१८) हरिहर विद्यालय.

प्राथमिक शाळा . . . (१) नगरपालिकेच्या ४०, (२) खाजगी ५७, (३) रजिस्टरर्ड मॉंटेसरी स्कूल्स १६.

तालमी . . . . कोल्हापूर हे मल्ल विद्येचें माहेरघर आणि तालमीचें आगर आहे. शहरांत सुमारें १०० चे वर तालमी

आहेत, त्यापैकीं ५७ रजिस्टर्ड संस्था असून मोतीबाग, गंगावेश, शाहुपुरी, काळाईमाम बजापराव माने, बाराईमाम, सुबराव गवळी, महाकाली, जंगी हुसेन इत्यादि तालमीतील पैलवान विशेष प्रसिद्ध आहेत.

पुतळे	(१) श्री छत्रपति शिवाजी महाराज, शिवाजी चौक, (२) राजर्षि शाहू महाराज, दसरा चौक, (३) आईसाहेब महाराज, लक्ष्मीपुरी, (४) प्रिन्स शिवाजी महाराज, भाऊसिंगजी रोड, (५) महात्मा गांधी, वरुणतीर्थ (६) महात्मा गांधी पापाची तिकटी, (७) डॉ. बाबासाहेबआंबेडकर, व महात्मा ज्योतिबा फुले बिंदू चौक, (८) छत्रपति राजाराम महाराज, टाऊन हॉल, (९) छत्रपति शिवाजी महराज (बस्ट) वरुणतीर्थवेस, (१०) १८५७ चे क्रांतिकारक चिमासाहेब महाराज, पॉवर हौस कॉर्नर. (११) गानमहर्षि पै. अल्लादियाखाँ, देवलक्लब (१२) कलामहर्षि पै. बाबालाल, पद्माराजे गार्डन, (१३) राजर्षि शाहू महाराज (बस्ट) शाहू उद्यान, (१४) कै. गोविंदराव टेंबे राजाराम हॉल गार्डन.
फिल्म स्टुडिओज . .	(१) जयप्रभा स्टुडिओ, (२) शालिनी सिनेटोन, (३) प्रकाश फिल्म लॅबोरेटरी (जयप्रभा स्टुडिओच्या आवारांत)..
बागा . . .	पद्माराजे पार्क, टाऊन हॉल, ताराबाई पार्क, टेंबलाई बाग, शाहू उद्यान, न्यु पॅलेस उद्यान, शालिनी पॅलेस उद्यान.
सहकारी बँका . . .	(१) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ति सहाकारी बँक, (२) महालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक, (३) महावीर को-ऑपरेटिव्ह बँक, (४) श्रीशाहू को-ऑपरेटिव्ह बँक, (५) श्री वीरशैव को-ऑपरेटिव्ह बँक, (६) दि कोल्हापूर मराठा को-ऑपरेटिव्ह बँक, (७) दि कोल्हापूर अर्बन को ऑपरेटिव्ह बँक, (८) लँड मार्गेज बँक, (९) जनता सहकारी बँक. या शिवाय जिल्ह्यांत या प्रकारच्या एकूण ५३ बँका आहेत.
राजवाडे . . .	(१) जुना राजवाडा, (२) नवा राजवाडा (३) शालिनी पॅलेस.

१७ प्रेक्षणीय स्थळें

विशाळगड

आंबा घाटांतून रत्नागिरीस जाणारा ८२ मैलांचा रस्ता सिमेंट काँक्रीटचा झालेला आहे. कोल्हा-पूरपासून आंबा हें गांव चाळीस मैलांच्या अंतरावर वायव्येस वसलें आहे. आंबा गांवापासून दीड मैलावर आंबा घाट सुरू होतो. सात मैलांचा वेडयावाकडया वळणाचा हा घाट सुरूं होण्यापूर्वीच कोल्हापूरची सरहद्द संपते. कोल्हापूर व रत्नागिरी या जिल्ह्यांच्या सीमेवर सार्वजनिक बांधकाम विभागाचा डाक बंगला आहे. शाहूवाडी हा कोल्हापूर जिल्ह्याचा शेवटचा तालुका सह्याद्रीच्या शाखांनींव घनदाट झाडीनें व्यापलेला आहे. विशाळगडला जाणारा मार्ग आंबा गांवापासून पश्चिमेला वळतो. आंबा ते विशाळगड हें अंतर अवघे बारा मैलाचें पण रस्ता कच्च्या स्थितींत आहे. चढउतार तर खूपच आहेत. दगड धोंडे झाडेंझुडपें, ओढे आणि डोंगर यांनीं हा भाग व्यापून टाकलेला आहे.

आंबा सोडल्यानंतर दीड मैलावर जंगल भागांत दि आंबा टॅनिंग अॅन्ड फार्मस्युटिकल्स ही फॅक्टरी आहे. भोवतालच्या भागांतील हिरडयांची, कातडी कमावण्यास लागणारी पावडर तयार करणाऱ्या या कारखान्यांत आधुनिक यंत्र सामुग्री पाहावयास मिळते. वर्षाला ३० ते ४० हजार पोती हिरडयावर प्रक्रिया करण्याची येथें व्यवस्था आहे. येथून पुढें चार मैल गेल्यानंतर माथेरानची आठवण करून देणारा तांबडया मातीचा गर्द छायेचा एक टप्पा लागतो. आणखी तसेच पुढें गेल्यावर घोडखिंडीकडे जाणारी पायवाट कांटेरी झुडपांमधून कुठेतरी अज्ञात ठिकाणीं गेल्यासारखी वाटतें. विशाळगडापासून ही खिंड साडे आठ मैलांवर आहे. विशाळगडाच्या वाटेवरच गजापूर हें छोटें गांव आहे. गडावरच्या चौदा घरांत राहाणाऱ्या लोकांना जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा गजापूर येथूनच होत असतो. गजापूरपासून पुढें तीन मैल मोटर गाडया जाण्याची सोय आहे. विशाळगडापासून अलिकडे एक मैलावर एका वेळीं एकच वाहन जाईल अशी एक निमुळती खिंड आहे. घोडखिंडीची आठवण करून देणारी ही खिंड घोडखिंड या नांवानेंच ओळखली जाते. गडाच्या पायथ्याला खोल दरी आहे. पावनखिंडींतून येणारा पूर्वीचा रस्ता मात्र दरींतून येत असावा. पूर्व दरीच्या कांठावर उभे राहिले असतां गडाला वेढा घालणारे तटाचे बुरुज आणि माथ्यावर एक दगडी दरवाजा दिसतो. गडावर चढून जाण्याची पायवाट ओबडधोबड असून बिकट आहे. अंदाजे एक मैल अंतर चढून गेल्यावर आपण गडाच्या पठारावर येतो. येथें प्रथम पांढऱ्या शुभ्र घुमटाच्या दोन सुंदर इमारती दिसतात. त्यापैकीं एक मलिक रिहानबाबाचा दरगा १९४१ सालीं ४५ हजार रुपये खर्च करून बांधला आहे.

दुसरा दरगा मलिक मिरासाहेब यांचा असून तो १९५३ मध्यें ३५ हजार रुपये खर्चून नव्यानें बांधला आहे. एक हजार वर्षापूर्वीं मलिक रिहान या साधुपुरुषाचें येथें वास्तव्य होतें असें सांगण्यांत येतें. दरवर्षी

डिसेंबर जानेवारीमध्यें येथें मोठा उरुस भरतो. कोल्हापूर, सातारा, सांगली व निपाणी बाजूचे हजारो लोक उरुसाला येत असतात. एस्. टी.च्या खास जादा गाड्याहीं सोडण्यांत येतात. उरुसानिमित्त व्यवस्था उत्तम ठेवण्यांत येते. गडावर पिण्याचें पाणी विपुल प्रमाणांत उपलब्ध आहे. दरग्याचें बांधकाम आधुनिक असून येथील स्वच्छता व टापटीप फारच छान आहे. रिहानबाबा नवसाला पावतात, या श्रद्धेमुळें अनेक लोक नियमितपणे गुरुवारीं दर्शनाला येत असतात. येथें कधींही चोरी होत नाहीं असें एक वैशिष्टच सांगण्यांत येते. गडाचे आवार फारच मोठे आहे. दोन मैल लांब आणि एक मैल रुंद अशा या पठारावर इतिहासकालीन अवशेष फारच थोडे आहेत. गडावरची वस्ती खोलगट भागांत आहे. विशाळगडची स्वतंत्र जहागिरी असतांना बांधलेल्या कांहीं इमारती आज पडून गेल्या आहेत. अवशेषा-वरून इमारतींचा आकार, त्यांचें बांधकाम, त्यांतील सोयी यांची कल्पना येते. राजवाड्याच्या एका दालनांतून वाड्यासमोर असलेल्या बांधीव विहिरींत उतरण्यासाठीं वाट आहे. विहिरींत स्नान केल्यानंतर कपडे बदलण्यासाठी कोनाडे तयार केले असावेत असे वाटतें. शजारींच (अर्धचंद्री) तलाव आहे. हा तलाव छत्रपति शिवाजी महाराजांनीं बांधला आहे असें म्हणतात.

येथील महादेवाच्या देवालयांतील दगडावरचें आणि लांकडावरचें नक्षीकाम अव्वल दर्जाचे आहे. देवालय मात्र आज अगदीं पडक्या स्थितींत आहे. पठारावरून पश्चिम बाजूला गेल्यानंतर दोन छोट्या इमारती दिसतात. त्यांतील एक आहे रेहानबाबांचे आसन आणि दुसरी आहे अहिल्या समाधीवर बांधलेली. पहिले राजाराम छत्रपति यांच्या पत्नी अहिल्याराणी यांनीं ५ मार्च १७०० सालीं महाराजांच्या पगडी-बरोबर सहगमन केलें. १९४० सालीं राजाराम महाराजांनी त्यांच्या स्मरणार्थ ही समाधि बांधली. दोन दरगे आणि या दोन छोट्या इमारतींच फक्त चांगल्या स्थितींत आहेत. अहिल्या समाधीजवळ पूर्वेस एखादा वाडा असावा असे येथील बांधकामाच्या अवशेषावरून दिसून येते.

विशाळगडानें इतिहासकालीन अनेक घटना पाहिल्या आहेत. स्वराज्य संस्थापक छत्रपति शिवाजी महाराज यांनीं या गडाच्या आश्रयानें स्वराज्याचें राजकारण केलें. पन्हाळा आणि विशाळगड यांच्या दरम्यान असलेल्या पावनखिंडीच्या इतिहासानें हा मुलुख अविस्मरणीय केलेला आहे. गडाची नैसर्गिक रचना वैशिष्टचपूर्ण आहे. सभोवतालीं तुटलेले कडे आणि खोल भयानक दऱ्या, वरच्या विशाल-पठारावर टेहळणीसाठी मोक्याच्या जागा, मुबलक पाणी आणि निरोगी हवा, यामुळें ज्यानीं या गडाचा प्रथम आश्रय घेतला आणि त्याची सुधारणा केली त्यांच्या कल्पनेचें कौतुक करावेसें वाटतें. आज विशाळगडाकडे वळणारीं माणसे येथील सृष्टिसौंदर्यानें मोहीत होऊन जातात. देश आणि कोंकण यांच्या सीमेवर उभे राहून गतेतिहासाची परंपरा सांगणाऱ्या या गडाची महति चिरकाल टिकणारी आहे. विशाळगड सध्या सृष्टि सौंदर्यांचे देखावे चित्रित करणाऱ्या अनेक चित्रपट निर्मात्यांचें आक ्ण झाला आहे.

पन्हाळा

कोल्हापूरपासून बारा मैलांवर असलेलें पन्हाळा हें प्रसिद्ध ऐतिहासिक स्थान असून सध्या तें महाराष्ट्रांतील थंड हवेचें प्रमुख ठिकाण म्हणून ओळखलें जातें. या ठिकाणीं असलेल्या "पन्हाळगड" या किल्ल्यानें अनेक शाह्या, अमदान्या व कारकिर्दी पाहिल्या आहेत. पन्हाळ्याचे दोन भाग आहेत. एक पन्हाळा किल्ला अथवा हुजुर बाजार आणि दुसरा रविवार, मंगळवार, गुरुवार, इब्राइमपूर या पायथ्याशीं असलेल्या पेठांचा भाग. पन्हाळ्याचा माथा थंडगार झाडीनें आच्छादलेला असून फक्त पावसाळा सोडून इतर ऋतूंत या ठिकाणची हवा आल्हाद-कारक असते. या ठिकाणच्या पाण्यांत लोहाचें प्रमाण अधिक असल्यानें तें कॉलरामुक्त असल्याबद्दल प्रसिद्ध असल्याचें सांगितलें जाते. "नागझरी" या ठिकाणाहून पन्हाळ्यास पाणीपुरवठा होतो. शिवाय गडावर व पायथ्याच्या पेठांमधून अनेक लहान मोठ्या विहिरी व तलाव आहेत. तरी देखील उन्हाळ्यांत

पाण्याची टंचाई भासतेच. सादोबा तळें, सोमाळें तलाव, 'शृंगार (अंधार) बाव' या ठिकाणीं पाण्याचा भरपूर सांठा असतो.

पन्हाळा येथें १९५४ मध्यें नगरपालिका स्थापन झाली असून पन्हाळा हे "हिल स्टेशन एरिया" म्हणूनही थोडयाच दिवसापूर्वी जाहीर करण्यांत आलें आहे. हल्ली तेथील नगरपालिकेनें पन्हाळ्याची खूपच सुधारणा केली असून पूर्वीचें स्वरूप पालटून टाकलें आहे. ठिकठिकाणीं बागा केल्या आहेत, रस्ते केले आहेत, गटारें बांधली आहेत, विहिरी बांधवून घेतल्या आहेत, पाईप लाईन घातली आहे व ज्या प्रकारें पन्हाळ्याची शोभा वाढवितां येईल तेवढी वाढविली आहे. कोल्हापूर–रत्नागिरी रोडपासून वाघबिळावरुन पन्हाळ्याकडे फुटणारा तीन चार मैल लांबीचा रस्ता नुकताच डांबरी करण्यांत आला आहे.

सह्याद्रि पर्वताच्या कुशींत माथ्यावर व फाटयावर महत्त्वाचे व प्रसिद्ध असे जे कांहीं किल्ले आहेत, त्यापैकीं पन्हाळगड हा एक होय. या किल्ल्याचा परीघ सुमारें साडेचार मैलाचा आहे. या किल्ल्याचा कांहीं भाग प्रचंड नैसर्गिक कडयांनीं संरक्षित असून कांहीं भाग दगडी बांधकाम करून बुरुजानीं संरक्षित केलेला आहे. चार दरवाजा, (हल्ली नष्ट) तीन दरवाजा व वाघ दरवाजा हीं या किल्ल्याचीं मुख्य प्रवेशद्वारें आहेत. आतां या किल्ल्याचें सर्व वैभव नष्ट झालें असून त्याचे अवशेष फक्त दिसतात. त्याचप्रमाणें या ठिकाणचा राजवाडाहि काळाच्या उदरांत गडप झाला असून पाया व जोत्याचीं ठिकाणें तेवढी पाहावयास मिळतात. या किल्ल्यावरील गंगाकोठी व धर्मकोठी हीं धान्याचीं कोठारें प्रचंड आहेत. त्याचप्रमाणें नायकिणीचा सज्जा हल्लीं अगदींच मोडक्या तोडक्या स्वरूपांत उभा आहे. सज्जा कोठी मात्र चांगल्या स्थितींत आहे. या ठिकाणीं इन्स्पेक्शन बंगला करण्यांत आला आहे. पन्हाळ्यावरील संभाजी देवालयहि प्रेक्षणीय आहे. त्याचप्रमाणें सादोबा या मुसलमान संताची मशिदहि प्रसिद्ध आहे. या ठिकाणीं दरवर्षी ऊरुस (यात्रा) भरतो.


कांहीं ऐतिहासिक दाखल्यावरून इ. स. ११९१–९२ मध्यें सियहरा भोजराजा दुसरा (११७८–१२०९) यांचें येथें अधिष्ठान होते असें दिसते. त्यानेंच हा किल्ला बांधला असावा असे मानले जाते. त्यानंतर अनेक ऐतिहासिक उलथापालथी या गडावर झाल्या. हा किल्ला १६५९ मध्यें शिवाजी महाराजांच्या ताब्यांत होता. हा किल्ला काबीज करण्यासाठीं सिद्दी जोहारानें मे १६६० मध्यें वेढा दिला असतांना शिवाजी महाराजांनीं अत्यंत चातुर्यानें सुटका करून घेतली व रांगण्याकडे प्रयाण केलें होतें. हा किल्ला सिद्दी जोहारानें घेतल्यानंतर पुनः १६७३ मध्यें शिवाजी महाराजानीं काबीज केला व शेवट पर्यंत तो त्यांच्याच ताब्यांत होता. कोल्हापूरच्या गादीची स्थापना करणाऱ्या राज्यसंस्थापिका ताराबाईनें पन्हाळयावरच आपली राजधानी कांहीं वर्षे ठेवली होती. अशा अनेक ऐतिहासिक घटना या किल्ल्याशीं निगडित आहेत.

सध्या या किल्ल्यावर हॉलीडे होम्स् बांधण्यांत आलीं असून सहलीसाठीं अथवा मुक्कामासाठीं येणाऱ्या प्रवाश्यांची उत्कृष्ट सोय करण्यांत आली आहे. पन्हाळ्यावरील नयनमनोहर सृष्टीसौंदर्याचा अनेक चित्रपट निर्मात्यांनीं आपल्या चित्रपटांत उपयोग करून घेतलेला आहे.

रांगणा

सृष्टीच्या सामर्थ्याचे शिखर आणि मानवी करामतींचा कळस म्हणजेच बुलंद बाका किल्ले रांगणा. किल्ल्यांत रांगडा किल्ला रांगणाच.त्याचें अक्राळ विक्राळ रूप शतकानुशतकें कायम आहे. रांगण्याच्या रचनेला नेमकें हेंच स्थान कुणी आणि केव्हां हेरलें असावें याचा विचार न करतांच त्याची उपयुक्तता ओळखणारा दर्दी माणूस पल्लेदार दृष्टीचा असला पाहिजे हे मनाला पटते. आजच्या सुधारलेल्या साधनांच्या सहाय्यानेंहि रांगण्याच्या परिसरांत प्रवेश करणें म्हणजे एक

प्रेक्षणीय स्थळें, कोल्हापूर



दिव्य आहे. मग कांहीं शतके मागें वळून त्या काळांतील लोकांनी ही जी अजब किमया करून ठेवली आहे त्याबद्दल आश्चर्य आणि अचंबा, वाटला नहीं तरच नवल.

कोल्हापूरच्या थेट दक्षिणेला पासष्ट मैलांवर रत्नागिरी आणि कोल्हापूर जिल्ह्यांच्या सरहद्दीवर रांगणा आहे. कोल्हापूर ते गारगोटी हे अंतर ३० मैलाचें. गारगोटीचें ग्रामीण विद्यापीठ म्हणजे मौनी विद्यापीठ. येथून पुढें बावीस मैल गेल्यानंतर मौनी महाराजांच्या वास्तव्याचें ठिकाण पाटगांव येतें. हीच रांगण्याला दैनंदिन गरजेच्या वस्तू पुरविणारी पूर्वीची पेठ. एस्. टी. बसेस येथपर्यंत येतात. पाटगांवपासून सुमारें सहा मैलांवर हणमंता घाट आहे. या घाटांतून नवीन रस्ता काढून कोल्हापूर वेंगुर्लें हा हमरस्ता होण्याचा संभव आहे. घाटाच्या तोंडालाच तांबेवाडी नांवाचें छोटेंसे गांव आहे. पाटगांवापासून तांबेवाडीपर्यंतचा रस्ता अगदी ओबडधोबड असून त्यावरून फक्त मोठ्या गाड्या, जीपस् किंवा ट्रक्स् जाऊं शकतात. तांबेवाडीपासून एक पायवाट रांगण्याकडे वळते. पांच मैलाचें अंतर तोडून जाईपर्यंत तीन खोल दऱ्या ओलांडाव्या लागतात. निबिड अरण्याची आठवण करून देणाऱ्या दाट झाडींतून हा रस्ता जातो.

या जंगलांत कांहीं हिंस्त्र पशु हिंडत असतात, असें येथील रहिवाशांच्या माहितीवरून कळतें. चिक्केवाडी हें तीनचार घरांचें वस्तीवजा गांव तांबेवाडीपासून पांच मैलांवर आहे. चिक्केवाडीपासून रांगण्याची चढण सुरू होते. अंदाजें एक मैलावर झाडीझुडपांचा पहाड पालथा घातल्यानंतर रांगण्याचें पहिले प्रवेशदार आपल्या भग्न अवशेषांचें दर्शन घडवितें. तांबड्या दगडाच्या भिंतीचे फक्त काहीं भाग दिसतात. भोवती खंदकांची खुदाई स्पष्टपणें दिसतें. पुढें लागणारा सपाट भाग म्हणजे रांगण्याची इतिहासकालीन बाजारपेठ,. आंवतीभोवतीं बरींच घरें असावींत असें अनुमान काढतां येतें. पाण्याचे दगडी कुंडही दिसतात. जरा पुढें एक पडक्या अवस्थेंत असलेलें एक लहान देवालय आहे. या शिवाय बाकीचा भाग जंगल आणि दगड यांनी व्यापलेला आहे.

रांगणा किल्ल्याच्या मुख्य भागांशी हा भाग जोडणारा कडेतूट असा पूलवजा पर्वतांचा कांहीं सपाट भाग आहे. दोन्हीं बाजूला खोल दऱ्या आणि मध्येंच हा उंचसपाट भाग मुद्दाम खडक फोडून तयार केल्याप्रमाणें वाटतो. या सपाट मैदानावर उभे राहिले तर अगदी समोरच रांगण्याचा खडा बुरुज दिसतो. या बुरुजापासून दोन्हींबाजूंना तटबंदी करण्यांत आली आहे. डाव्या बाजूच्या तटाखालून अखंड कडा तोडून तयार केलेल्या पायवाटेनें किल्ल्यावर प्रवेश करण्यासाठीं पुढें जात असतां वर नजर न पोचेल इतका उंच तट आणि खाली अंत न लागणारी दरी असें विलक्षण दृश्य दिसतें. दोन फर्लांग वाटचालीनंतर रांगण्याच्या पहिल्या दरवाजांत आपण येतो. ऐतिहासिक इमारतींच्या जुन्या बांधकामाची खास वैशिष्ट्यें या ठिकाणीं अधिक प्रकर्षानें दिसतात.

मोठमोठे दगड आणि अति नाजूक नक्षीकाम ही तर सर्वत्र अनुभवास येणारी गोष्ट आहे. पहिल्या दरवाजापासून दोन्हीं बाजूंना उंच दगडी भिंती बांधून काढल्या आहेत. भिंती सध्यां पडत चालल्या आहेत. वर चढतांना लागतो दुसरा भव्य बुरुज आणि भक्कम दरवाजा. पठारावर आल्यानंतर उजव्या बाजूला पुन्हा छोट्या वाड्याचा आकार दाखविणारी एक चौकट आणि भिंत दिसते. आंत एक कायम पाणी पुरविणारी विहीर आहे. तिचें पाणी चवदार आणि स्वच्छ आहे. पुढेंच तिसरा कमानींचा दरवाजा व तांबड्या दगडांच्या भिंती. कमानींत विसाव्यासाठीं दोन्ही बाजूला ओवऱ्या. या दरवाजांतून बाहेर पडल्यावर मात्र आपण अगदीं मोकळ्या विस्तृत पठारावर येतो. एकीकडे दर्यापर्यंतची कोंकणसृष्टि आणि दुसरीकडे कोल्हापूर जिल्ह्यांतील डोंगरदऱ्यांची दौलत असा दृष्टिसुखाचा लाभ घेत उत्कंठेनें पुढे गेल्यावर एका मोठ्या तलावाच्या कांठावर आपल्याला थांबावें लागेल.

या तलावाची फक्त एक बाजू बांधीव आहे. पाण्याचा सांठा खूपच मोठा असून तो सदैव टिकतो. तलावांपासून कांहीं अंतरावर रांगणाईचें जुनें मंदिर आहे. तेथील दगडी मूर्ती फार दिवसापूर्वीची असावी असें वाटतें. वरचें पत्र्यांचें छप्पर अलिकडचें आहे. मूळच्या बांधकामापैकीं लांकडावरील नक्षीकाम उत्कृष्ट आहे. मंदिरासमोर काळचा चिऱ्यांची उंच दीपमाळ आहे. त्याठिकाणीं उघडचावर असलेल्या हनुमानाच्या मूर्तीवरून तेथेंहि कदाचित हनुमान मंदिर असावें. या मंदिरापासून थोडी चढण चढून दाट झाडींतून किल्ल्याच्या दुसऱ्या टोकाला जातां येते. हणमंता घाट, सावंतवाडी वेंगुर्ला हा भाग आणि समोरचे मनहर व मनसंतोष हे गड येथून स्पष्टपणें दिसतात. या बाजूला तीन दरवाजे आहेत. सर्वच मोडक्या स्थितींत. समोर मात्र भयाण दरी पसरलेली आहे.

रांगण्याचा विस्तार दोन मैल लांबीचा आणि अर्धा मैल रुंदीचा आहे. पाण्याच्या अनेक टाक्या या पठारावर आहेत. रायगडावरून कोंकण कर्नाटककडे जातांना छत्रपति शिवाजी महाराज या किल्ल्यावर थांबत होते, असें म्हणतात. पूर्वीच्या काळीं सहजासहजी कुणाच्याहि टप्प्यांत न येणाऱ्या जागीं रांगण्याची स्थापना आणि रचना असल्यामुळें तो आजच्या घटकेला सामान्य लोकांपासून दूरच राहिला. रांगण्याचा इतिहास जंगल पहाडांनीं दडपला गेला असल्यामुळें तो अनेकांच्या नजरेंत भरत नाहीं. पण रांगणा वगळला तर महाराष्ट्राच्या इतिहासांत अपुरेपणा राहील. ऐतिहासिक दृष्टचा गोव्यापासून पन्हाळचापर्यंतच्या प्रदेशांत हें एक महत्त्वाचें ठिकाण मानलें जात असे. रांगण्याची सहल ही शारीरिक श्रमाची कसोटी आहे.

गगनगड

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक महानतेचे मानदंड मानलेल्या सत्तावीस किल्ल्यांचा बावटा म्हणजे गगनगड. सह्याद्रीच्या पाठीवर ताठ मान करून उभ्या असलेल्या विशाळगड रांगण्यावर आणि पश्चिम दर्यावर दरारा बसविणाऱ्या विजयदुर्ग देवगडावर चौफेर नजर ठेवणारा हा गगनचुंबी गड कोंकणांतून नैसर्गिकरीत्या निर्माण झालेल्या पांच हजार फूट उंचीच्या सुळचावर तयार करण्यांत आला आहे.

कोल्हापूरच्या पश्चिमेला पस्तीस मैलांवर पूर्वीची बावडेकरांची जहागिरी व हल्लीचे गगनबावडा महालांचें मुख्य ठिकाण गगनबावडा हें गांव कोंकणांतील खोल दऱ्यांच्या कांठावर वसलें आहे. गगनबावडचास जाणारा रस्ता वाहतुकीच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचा आहे. पण भयंकर पावसामुळे तो नेहमीच चांगल्या स्थितींत राहूं शकत नाहीं. गांवांत प्रवेश करतांना सुरवातीलाच दोन रस्ते फुटलेले दिसतात. ते म्हणजे कुरूल आणि भुईबावडा या दोन घाटांमध्यें जाणारे रस्ते होत. कोल्हापूर-भुईबावडाखारेपाटण-रत्नागिरी हा जवळचा मार्ग तयार करण्यासाठीं भुईबावडा व कोल्हापूर-विजयदुर्ग या मार्गांत येणारा कुरूल घाट फोडण्याच्या सरकारी योजनेप्रमाणें १९५८ सालीं या कामांस सुरुवात करण्यांत आली आहे. सध्या निम्म्यापेक्षां अधिक काम पुरे झालें आहे.

या दोन मार्गांमुळें खारेपाटण आणि कुरूल भागांतील शेकडों वर्षांची गैरसोय दूर होणार आहे. दोन घाटांचा मध्यबिंदु म्हणजे गगनगड. गांवच्या पश्चिमेला कुरुल घाटाच्या पूर्वीच्या पायवाटेनें अर्धा मैल खाली उतरल्यानंतर खोलगट भागांत एक पाण्याचा बांधीव हौद आहे. जहागिरीच्या कारकीर्दींत १९२९ सालीं बांधलेल्या हौदावर पांचव्या जॉर्जचें नांव दिलें आहे. घाटांतून व गडावर येजा करणाऱ्या लोकांना पाण्याची सोय व्हावी म्हणून डोंगराच्या माथ्यावरून नळानें पाणी आणून तेथें सांठा केलेला आहे. शेजारीच एक पडकें निवासस्थान आहे. तेथूनच गगनबावडचाची चढण सुरू होते. मोठे आडवळणाचें अंतर तोडून वर गेल्यानंतर अखंड कातळामध्ये खोदलेली एक प्रशस्त गुहा आढळते.

गुहेंत चौंडेश्वरीची मूर्ति आहे. दत्तजयंतीला या देवीची यात्रा भरते. गगनगडस्वामी नांवाचे पाटणचे रहिवाशी योगाभ्यासानिमित्त या गुहेंत सध्या रहातात. कांहीं श्रद्धाळू मंडळी त्यांच्या दर्शनाला नियमितपणें येत असतात. गुहेच्या भोवताली बारमाही पाण्याची टांकी आहेत. आणखी थोडे वर चढून गेल्यानंतर महादेवाचे छोटे मंदिर. लागते नंदी, शेषनाग आणि गणपती अशा मूर्ती देवालयांत आहेत. छत्रपति शिवाजी महाराजांच्या गगनगडावरील वास्तव्यामध्ये ते या महादेवाच्या दर्शनाला येत असत असें सांगण्यांत येते. सुरुवातीपासून शेवटपर्यंत चढणच चढावी लागते. पुढें जात असतां पहिला दरवाजा लागतो. नुसता दरवाज्याचा आकार शिल्लक आहे. भक्कम दगडी बांधकाम हें त्याचें वैशिष्टच.

निमुळत्या वाटेनें कांहीं पावलें गेल्यानंतर आपण येतो मुख्य दरवाजांतून पठारावर. पहिलें दर्शन घडते गैबीसाहेबांच्या दरग्याचे. गडावर आज फक्त ही एकच इमारत आहे. गैबीसाहेबाच्या वास्तव्याचा काल निश्चितपणें सांगतां येत नाहीं. पूर्वी तेथें गहिनीमहाराजांची समाधि बांधण्यांत आली होती असें म्हणतात. १८४८ सालीं गडावर रहाणारे लोक गड सोडून गेले तेव्हांच हा दरगा बांधला असावा असा अंदाज आहे. दरग्याशेजारीच विठ्ठलाईच्या देवळाचा भला मोठा चौथरा आहे. चौथऱ्यावरच देवीची छोटीशी प्रतिमा बसविलेली आहे. समोर विसाव्यासाठीं दोन विशाल वृक्ष आहेत. एका कोपऱ्यांत राजवाड्याच्या जमीनदोस्त झालेल्या भिंती जुन्या बांधकामाची साक्ष देतात. वाडा भव्य असावा असें आवारावरून वाटतें. वाड्याच्या पाठीमागें तटाच्या कडेला एक भव्य तोफ पडली आहे. साडेसात फुटाच्या या तोफेवर ब्रिटिश राजमुद्रा व एक मार्क स्पष्टपणें दिसतात. तोफ चांगल्या स्थितींत असून वस्तुसंग्रहालयांत ठेवण्यास योग्य आहे. पठाराच्या मध्य भागीं एक तलाव आहे. त्याच्या पलीकडे उतरणीवर घोड्यांच्या पागा आहेत.

गगनगडाचा सारा इतिहास रोमांचकारी घटनांनीं भरलेला आहे. छत्रपति शिवाजी महाराजांची भेट अधूनमधून या गडाला होत असे. धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे यांच्या पराक्रमाला गगनगड साक्षीदार होता असें म्हटले जातें. अगदी अलिकडे बावडेकर जहागिरदारांच्या तर्फे गडावर रामाचा उत्सव साजरा केला जात असे. अत्यंत बळकट, दुर्गम आणि म्हणूनच लढावू फौजांचा रक्षक म्हणून गडाचें महत्व असामान्य आहे. बदलत्या काळाबरोबरच गगनगड म्हणजे गैबीसाहेबाचें पवित्र स्थान असेंच मानलें जाऊं लागलें आहे. गडावरून दिसणारें दऱ्याडोंगरांचें विलोभनीय दृश्य आणि घाटांचा देखावा प्रवाश्यांचा आनंद द्विगुणीत करतो. गगनगड म्हणजे तळकोंकणचा कळस.

कोल्हापूरच्या दक्षिणेला बावन्न मैलावर वेदगंगेच्या कांठीं पाटगांव येथें स्वराज्यसंस्थापक श्रीछत्रपति शिवाजी महाराज यांच्या कार्याला शुभाशिर्वाद देणाऱ्या मौनी महाराजांचें सतराव्या शतकामध्यें वास्तव्य होतें. दोन उंच टेकड्यांच्या पायथ्याला गर्द झाडींत पाटगांव वसलें आहे. निसर्गाचा वरदहस्त लाभलेलें हे चिमुकलें गांव मौनी मठामुळें लाखोंच्या कानीं तोंडीं झालें आहे. गांवांत प्रवेश करतांच मठाचें भव्य असें प्रवेशद्वार दिसते. कोरीव दगडाचा कमानीदरवाजा उंच आणि भक्कम असून कमानीवर नगारखाना आहे. आंत प्रशस्त पटांगण आहे. मठाची मुख्य इमारत दोन मजली असून आधुनिक साधनांनीं सुशोभित केलेली आहे. सभामंडपांतून आंत गेल्यानंतर गाभाऱ्यांत मौनी महाराजांची समाधि आहे. समाधिस्थ होण्यासाठीं मौनी महाराज ज्या मार्गानें जमिनीच्या पोटांत गेले तो मार्ग त्याचवेळीं बंद करण्यांत आला आहे. कांहींच्या मतें महाराज १६८० सालीं समाधिस्त झाले. तेथील वातावरण अगदी प्रशांत आणि प्रसन्न वाटतें.

मौनी मठ

मठाच्या सभोंवती बरेच मोठे आवार असून उजव्या बाजूला महाराजांचे शिष्य तूर्तगिरी यांची समाधि आहे. शेजारीच शेवटचे शिष्य रामगिरी यांचीही अगदी साधी समाधि आहे. मठाच्या पाठीमागें

देवस्थान कचेरी व त्याच इमारतीच्या कोपऱ्यांत भंडारघर अशी व्यवस्था दिसते. मठाच्या डाव्या बाजूला मौनी महाराजांनीं १६७६ सालीं ज्या ठिकाणीं शिवाजी महाराजांना आशीर्वाद दिला त्या पवित्र स्थानांची स्मृति म्हणून मौनी महाराजांची छोटीशी प्रतिमा बसविण्यांत आली आहे. रथसप्तमीला येथें मोठा उत्सव होतो. दर सोमवारींही भक्तगणांची गर्दी असते.

मठाच्या पाठीमागें सबंध जंगलाचा भाग असून दोन फर्लांगावर डोंगराच्या दरडी कडेला भद्रकाली देवीचें इतिहासकालीन देवालय आहे. देवळाचा दर्शनी भाग म्हणजे इटालियन पद्धतीचा आठ खांबी मंडप. भोवती वीस कमानी असलेल्या ओवऱ्या. समोर उंच अशा दीपमाळा. प्रवेशद्वाराचें बांधकाम बळकट दगडी आहे. प्रवेश करतांच हनुमान मूर्तीचें दर्शन घडतें. भद्रकाली देवालयाच्या अगदी समोर महादेवाचें मंदिर असून शेजारी शिवकुंज उद्यान आहे.

मौनी विद्यापीठ

मौनी महाराजांच्या स्मरणार्थ गारगोटी येथे मौनी विद्यापीठ ही ग्रामीण भागांत ज्ञानदानाचें काम करणारी संस्था चालविण्यांत येत आहे. गारगोटीपासून सुमारे सहा मैलांवर भुदरगड आहे. गडावर जाण्यासाठीं बरीच अवघड चढण चढावी लागते. पठारावर तलाव, देवालय व इतर कांहीं अवशेष पहावयास मिळतात.

जोतिबा डोंगर

कोल्हापूरच्या वायव्येस ९ मैलांवर जोतिबाचा डोंगर असून तेथें ज्योतिर्लिंगाचें पवित्र स्थान आहे. कोल्हापूर ते जोतिबा हा डांबरी रस्ता करण्यांत आला असून त्याची लांबी १२ मैल आहे. प्रत्येक चैत्र पौर्णिमेस या ठिकाणीं प्रचंड यात्रा भरते. या जोतिबा यात्रेसाठीं सबंध दक्षिण महाराष्ट्रांतीलच नव्हे तर आसपासच्या सात शे ते आठ शे मैल लांबीच्या टापूंतूनहि यात्रेकरू येतात. "जोतीबा यात्रा" ही महाराष्ट्रांतील एक मोठी यात्रा होय. सुमारें दीड लाखांवर यात्रेकरू प्रतिवर्षीं या ठिकाणीं येतात. या ठिकाणास मौजे वाडी–रत्नागिरी असें कागदोपत्रीं नांव आहे. श्रावण षष्टी, नवरात्रांतील जागर आणि प्रत्येक पौर्णिमेसहि या ठिकाणीं यात्रा भरते. चैत्र पौर्णिमेसहि ज़ोतीबाची पालखी लाखो लोकांच्या मिरवणुकीनें यमाईच्या लग्नासाठीं जाते. तसेंच इतर यात्रेच्या दिवशींहि पालखी निघते. गुलाल खोबरें हें या देवस्थानाचें भक्तिचिन्ह आहे.

विश्रांति गृह

जोतिबा डोंगरावर १९५९ मध्यें सरकारनें एक विश्रांतिगृह बांधलें आहे. त्याशिवाय गांवांत व मंदिरामध्यें सर्वत्र विजेची सोय केली आहे. जोतिर्लिंग देवस्थानाची सर्व व्यवस्था सरकारनियुक्त देवस्थान मंडळाकडे असून या ठिकाणीं देवस्थान कामगार व इतर नोकरवर्ग व्यवस्था पाहण्याचें काम करीत असतो. यात्रेची व्यवस्था ग्रामपंचायतीमार्फत केली जाते.

खिद्रापूर

शिरोळ पासून आग्नेय दिशेस १२ मैलांवर व जयसिंगपूरपासून स्टेशनच्या दक्षिणेस आठ मैलांवर कृष्णा नदीच्या कांठीं हें ठिकाण असून कोपेश्वराचें देवालय हें या ठिकाणचें प्रमुख आकर्षण आहे. या देवालयाच्या भिंती काळ्या फत्तराच्या कोरलेल्या असून या ठिकाणीं असलेले दोन भव्य मंडप हे उत्कृष्ट नक्षी–खोदकामाचे नमुने आहेत. तसेंच खांबहि खोदलेले असून उघडा स्वर्गमंडप, नगारखाना, स्तंभ हे प्रेक्षणीय आहेत. हें देवालय हेमाडपंती पद्धतीचें असून देवगिरीच्या यादवांपैकी सिंहदेवाचा शके ११३५ (इ. स. १२१३) मधील देवनागरी लिपींतील शिलालेख येथें आहे. या ठिकाणीं लहानसें जैनमंदिरहि आहे. प्रत्येक वर्षीं माघ महिन्यांत (जानेवारी फेब्रुवारीच्या दरम्यान) येथें लहानशी यात्रा भरते.

शिरोळच्या दक्षिणेस ३ मैलांवर ज्या ठिकाणीं कृष्णा व पंचगंगा या नद्यांचा संगम होतो, त्या स्थानीं नरसोबावाडी हें पवित्र तीर्थक्षेत्र आहे. या संगमाच्या ठिकाणीं नरसिंह सरस्वती यांनीं १२

वर्षे वास्तव्य केल्यानें त्यांच्या नांवावरूनच या स्थानास नरसिंह वाडी, नरसोबावाडी हे नामाभिधान प्राप्त झालें असावें. या ठिकाणीं श्री दत्तात्रेयाचें एक व नारायण स्वामींचें एक अशीं दोन मोठी देवालयें आहेत. शेंकडों भक्त या ठिकाणास नेहमी भेट देत असतात. या संगमाचें ठिकाणीं १४३ फूट लांबींचा व ६७ फूट रुंदीचा दगडी घाटहि आहे. माघ वद्य पंचमीपासून सबंध महिनाभर (फेब्रुवारी–मार्चमध्यें) या ठिकाणीं यात्रा भरते व त्याचप्रमाणें आश्विन वद्य द्वादशीसहि या ठिकाणीं मोठी यात्रा भरते. ज्या दिवशीं श्रीदत्तात्रय या जगांतून अदृश्य झाले तो हा दिवस होय अशी भक्तांची समजूत आहे. दर पौर्णिमेसहि या ठिकाणीं शेकडों भक्त स्नानासाठीं व देवदर्शनासाठीं येत असतात.

नरसोबावाडी

कोल्हापूरच्या वायव्येस चार मैलांवर भोगावती व कासारी या नद्यांचा संगम होतो, त्या स्थानास प्रयाग या नांवानें संबोधले जातें. याठिकाणीं दत्ताचें मंदिर असून मकरसंक्रातीपासून महिनाभर यात्रा असते. यावेळीं कोल्हापूर व आसपासच्या भागांतील शेकडों लोक दररोज स्नानासाठीं व दत्तदर्शनासाठीं जमतात व वनभोजन करतात.

प्रयाग

बाहुबली

हातकणंगले नजिक असलेले जैन समाजाचें पवित्र क्षेत्र बाहुबली आणि रामलिंग ही ठिकाणेंहि प्रेक्षणीय आहेत. त्याचप्रमाणें शिरोळ तालुक्यांतील कुरुंदवाड येथें कृष्णानदीवर असलेला प्रचंड घाटहि पाहण्यासारखा आहे.

---

१८. लोकजीवन

कोल्हापूर जिल्ह्यांतील लोकांची राहणी "मराठमोळचा" धाटणीची आहे. गलीं कित्येक वर्षें छत्रपतींच्या अमदानींत गेल्यामुळें लोकांच्या वागण्यामध्यें एक प्रकारचा दरबारी व खानदानी रुबाबदारपणा आणि वेगळीच ऐट दिसून येते. त्यांच्यांत कलासक्ती आहे, खिलाडूवृत्ति आहे, व सर्वसामान्य जनतेंतहि मल्लविद्येबद्दल आवड दर्शविणारा मर्दानी झोक आहे.

जातिसंख्या

या जिल्ह्यांत भारतामधील अनेक जाति-जमातीचे लोक गुण्यागोविंदानें राहत आहेत. जिल्ह्यांत हिंदु, मुसलमान, जैन, ख्रिश्चन, लिंगायत, पारशी, रजपूत, सिंधी, बंगाली, मलबारी. मद्रासी, भय्ये, शीख, मारवाडी आदि सर्व प्रकारचे लोक थोडयाबहुत प्रमाणांत आहेत, अर्थात् हिंदु समाज मोठा आहे. जिल्ह्याची भाषा मराठी आहे. परंतु, कानडी, उर्दू, गुजराथी, सिंधी या भाषा बोलणारे थोडे थोडे लोकहि आहेत. हिंदूंचीं असंख्य देवळें आपलें वैशिष्टच टिकवून आहेत. त्याचबरोबर जैनांच्या वस्त्या, लिंगायतांचे मठ, मुसलमानांच्या मशिदी व दर्गे ख्रिस्तांचें चर्चहि आढळतात.

खेडयांचा जिल्हा

कोल्हापूर जिल्ह्यांतील बहुसंख्य लोक खेडयांत राहणारेच आहेत. जिल्ह्यांतील कोल्हापूर हें सर्वांत मोठें व एकमेव शहर असून त्याखालोखाल, इचलकरंजी हें अलिकडेच औद्योगिक प्रगतीमुळें विस्तार पावलेलें शहर आहे. बाकीच्या ग्रामीण भागांतील खेडूत जनतेची राहणी साधी व गरिबीची आहे. घरें माती, विटा, दगड, कौलें, पत्रे, मंगलोरी कौलें यांचीं बांधलेली असून झोपडयांचेंहि प्रमाण बरेंच आहे. त्याचबरोबर कांहीं गांवांतून आता जुन्या प्रचंड वाडयांच्या जागीं सिमेंट कॉंक्रीटची विशाल घरेंहि दिसूं लागलीं आहेत.

रोजचें जेवण

सर्वसाधारण बहुजन समाजांतील लोकांचें रोजचें जेवण बव्हंशी भात, भाकर हेंच आहे. कांही भागांत ज्वारीची भाकर, तर कांहीं भागांत नाचण्याची अथवा बाजरीची भाकरी केली जाते. तसेंच बऱ्याच लोकांच्या खाण्यामध्यें भाज्या, डाळीची आमटी, गव्हाच्या पात्या, मांस, अंडीं, दही, दूध, तूप लोणी वगैरे जिन्नसहि असतात.

पोषाख

पुरुषांच्या पोषाखाच्या बाबतींत ग्रामीण भागांत धोतर, कुडते, मुंडासे व कांहीं मागासलेल्या व गरीब समाजांत धोतराऐवजी लंगोट एवढीच जरुरीचीं वस्त्रें म्हणून वापरलीं जातात. शहरी जीवनाच्या संपर्कांत आलेल्या लोकांमध्यें विजार, पँट, शर्ट, कोट, टोपी घालण्याचें बरेंच प्रमाण दिसून येते. मात्र पूर्वी नोकरी अथवा अन्य कांहीं कारणास्तव छत्रपतींच्या सरकार दरबारी वावरणाऱ्या लोकांमध्यें विशिष्ट ऐटबाज पद्धतीनें बांधला जाणारा "कोल्हापुरी फेटा" देखील कधी कधी दृष्टीस पडतो. स्त्रियांच्या पोषाखामध्यें ग्रामीण भागांत लुगडें, चोळी आणि शहरीं संपर्कामुळें गोल

साड्या व पोलकीं दिसतात. शहरीं भागांत स्त्री-पुरुषांच्या पोषाखामध्यें आधुनिक फॅशन भरपूर वाढलेली आहे. या भागांत गुढीपाडवा, बेंदूर, गणशोत्सव, गौरी, दिवाळी, दसरा, भवानी-उत्सव, मकर. संक्रांत, होळीपूजन, रंगपंचमी, नागपंचमी वगैरे सण मोठ्या प्रमाणांत साजरे केले जातात.

कोल्हापूरचे लोक क्रीडानैपुण्याविषयीं सर्वत्र विख्यात आहेत. लोकांमध्यें खेळ खेळण्याची त्याचबरोबर आवडीनें खेळ बघण्याची प्रवृत्ति आहे. कोल्हापूर शहरांत गल्लोगल्लीं आणि जिल्ह्यामध्यें खेडोपाडी असंख्य तालमी आणि मर्दानी खेळाचे आखाडे आहेत. या भागांत तालमींतील लाल माती जन्मांत अंगास न लागलेला स्थानिक माणूस विरळाच. कुस्ती व इतर कांहीं खेळांच्या बाबतींत इथल्या खेळाडूंनीं भारतीय कीर्ति तर संपादन केली आहेच पण कांहींनीं कोल्हापूरला जागतिक लौकिक प्राप्त करून दिला आहे.

क्रीडा नैपुण्य

कोल्हापूरची कुस्तीपरंपरा जशी उज्ज्वल आहे, तशीच नाटचकला व गायनकलाहि चांगल्या प्रकारें सांभाळल्या गेल्या आहेत. कोल्हापुरांतील पैगंबरवासी अल्लादियाँ खाँसाहेब, कै. केशवराव भोसले, कै. गोविंदराव टेंबे, कै. नटवर्य दत्तोपंत भोसले, महाराष्ट्रकोकीळ श्री. शंकरराव सरनाईक आदि श्रेष्ठ गायन महर्षींच्या स्वरांनीं रसिकांना एकेकाळीं मुग्ध करून सोडलें होतें. तसेंच चित्रकलेच्या व शिल्पकलेच्या बाबतींतहि पैगंबरवासी आबालाल रहिमान, कै. कलामहर्षि बाबूराव पेंटर, कै. आनंदराव पेंटर, सर्वश्री माधवराव बागल, बाबा गजबर, जी. कांबळे, गणपतराव वडणगेकर प्रभृति कलावंताचीं नांवें सर्व महाराष्ट्राला परिचित आहेत.

नाटच व गायन कला

त्याचप्रमाणें चित्रपट व्यवसायांतहि कोल्हापूरनें एकेकाळीं भरघोस यश संपादून चित्रपट व्यवसायांत मानाचें स्थान पटकविलें आहे. निर्माते व दिग्दर्शक श्री. व्ही. शांताराम हे मूळचे कोल्हापूरचेच. राष्ट्र पतिपदक विजेते सिनेदिग्दर्शक श्री. माधव शिंदे, श्री. भालजी पेंढारकर, कै. मा. विनायक, श्री. अनंत माने, श्री. दत्ता माने श्री. दिनकर द. पाटील, श्री. दत्ता धर्माधिकारी, श्री. राम गबाळे, श्री. यशवंत पेठकर हेहि कोल्हापूरचेच. आज भारतीय चित्र व्यवसायांत असलेले कलावंत श्री. बाबूराव पेंढारकर, मा. विठ्ठल दामुआण्णा मालवणकर, चंद्रकात व सूर्यकांत हे सारे कोल्हापुराचेच.

चित्रपट सृष्टि

साहित्याच्या बाबतींतहि कोल्हापूरची भूमि संपन्न आहे. प्रख्यात साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर, हे कोल्हापूरचे नागरिक आहेत. प्रसिद्ध कादंबरीकार श्री. ना. सी. फडके तसेंच कै. माधवराव पटवर्धन कै. द. सी. पंगु, श्री. वि. अ. कुळकर्णी, कै. डॉ. रा. चिं. श्रीखंडे, प. स. देसाई यांनीं साहित्य क्षेत्रांतील आपल्या उत्कर्षाचे दिवस कोल्हापुरांतच व्यतीत केले. आजहि आघाडीवर असलेल्या साहित्यिकांत अनेक साहित्यिक कोल्हापुरांतील आहेत.

साहित्य सेवा

शाहिरी कलेच्या बाबतींतहि कोल्हापूर आघाडीवर आहे. कोल्हापुरच्या अनेक तालमीमधून व आखाडयामधून तसेंच खेडोंपाडीं असंख्य शाहीर व त्यांचीं पथकें आहेत. शाहिरी वाङमयांत मोलाची भर घालणारे कवि लहरी हैदर यांना महाराष्ट्रांतील अनेक शाहीर गुरुस्थानीं मानतात. शाहीर पिराजीराव सरनाईक, शाहीर श्रीपतराव लोखंडे, शाहीर ना. ब. निकम यांचे कार्यक्रम सर्वत्र धुमधडाक्यानें चालू असतात.

शाहिरी कला

क्रिकेट क्षेत्रामध्यें अखिल भारतीय कीर्तीचें स्थान मिळविणारे व भारताचे एककाळचे कप्तान, अष्टपैलू खेळाडू श्री. विजय हजारे हे कोल्हापूरचेच आहेत. तसेंच कै. सयाजीराव धनवडे, सर्वश्री आर. बी. निंबालकर, बी. बी. निंबाळकर, जे. एम. घोरपडे, एस. आर. पाटील, इत्यादि क्रिकेट पटूंनीहि मैदान गाजविलें आहे.

१९६१ च्या खानेसुमारीनुसार कोल्हापूर जिल्ह्यांतील तालुक्यांची व मोठया शहरांची लोकसंख्या

तालुका अथवा शहर	तालुक्यांतील एकूण गांवें	पुरुष संख्या		स्त्रीसंख्या		लोकसंख्या	
		साक्षर	एकूण	साक्षर	एकूण	साक्षर	एकूण
शाहूवाडी	१३१	१३,३९६	४९,५०५	२,५१८	५१,००१३	१५,९१४	१,००,५१८
पन्हाळा (महाल)	१०२	२०,५३३	५७,५१३	४,२१८	५६,५३७	२४,७५१	१,१४,०५०
हातकणंगले	५३	३७,६५५	९१,६४९	९,१०१	८३,८१३	४६,७५६	१,७५,५६२
इचलकरंजी (शहर)	—	१५,९०५	२७,८२१	५,०९६	२३,१३३	२१,००१	५०,९५४
शिरोळ	४८	३७,६६५	७७,८१२	११,४३७	७३,३१८	४९,१०२	१,५१,१३०
करवीर	१०५	२७,२८२	८१,७०९	४,२०७	७८,२८४	३१,४६९	१,५९,९९३
कोल्हापूर (शहर)	...	६५,७५२	९९,६७६	३४,६५५	८७,६३०	१,००,४०७	१,८७,३०६
बावडा (महाल)	७६	७,९६३	२७,६२६	२,३६०	३१,४४३	१०,३२३	५९,०९९
राधानगरी	१०८	१६,३९५	५१,८८६	२,५७५	५१,०६२	१८,९७०	१,०२,९४८
कागल	८०	२४,१०५	६५,३८८	४,८२१	६३,४६४	२८,९२६	१,२८,८५२
भुदरगड	९६	१४,५३९	३९,१८०	२,८९४	३९,४६१	१७,४३३	७८,६४१
आजरा महाल	८०	९२,२८	३२,९३१	२,१६०	३५,३५४	११,३८८	६८,२८५
गडहिंगलज	८८	२३,२२०	६४,१४९	५,८६०	६३,४९५	२९,०८०	१,२७,६४४
चंदगड	१३०	१०,९९२	४६,५२७	२,४४९	४६,९२१	१३,४४१	९३,४४३
जिल्ह्याची एकूण संख्या	१,०९७	३,२४,६३०	८,१३,३७२	९४,३५१	७,८५,०२८	४,१८,९८१	१५,९८,४००

१९. वृत्तपत्रें, साप्ताहिकें व मासिकें

पुण्या–मुंबईच्या खालोखाल कोल्हापूरची वृत्तपत्र व्यवसायाची परंपरा जुनी व तितकीच प्रगल्भ आहे. पूर्वीच्या संस्थानी राजवटीपासून कोल्हापूरच्या वृत्तपत्रांचा संसार नीटनेटकेपणानें आणि जिद्दीनें चालू आहे. कोल्हापूरच्या नियतकालिकांनीं कोल्हापूरच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक सुधारणांना आणि विकासाला चांगलाच हातभार लावलेला आहे. कोल्हापुरांत दैनिकें, साप्ताहिकें, द्वि-साप्ताहिकें, पाक्षिकें, मासिकें, वगैरे सर्व प्रकारचीं नियतकालिकें नियमितपणें प्रसिद्ध होतात. त्यांतील कांहींची संक्षिप्त माहिती खालील प्रमाणें आहे.

(१) दैनिक पुढारी २४ वें वर्ष.
(२) दैनिक सत्यवादी ३६ वें वर्ष.
(३) दैनिक नवसंदेश, ४ थें वर्ष.
(४) सायंदैनिक समाज, २३ वें वर्ष.

वरील दैनिकें सबंध दक्षिण महाराष्ट्रामध्यें रोज ताज्या बातम्या पुरविण्याचें कार्य करतात. या दैनिकांतून प्रामुख्यानें जिल्ह्यांतील बातम्यांवर अधिक भर देण्यांत येतो, व राज्य पातळी वरील बातम्या, राष्ट्रीय बातम्या, आंतरराष्ट्रीय बातम्या यांचाहि जरूर तेवढा समावेश केलेला असतो. दैनिक सत्यवादी व दैनिक नवसंदेश हीं दैनिकें कोल्हापूर व सांगली या केंद्रांतून एकाच वेळीं प्रसिद्ध होतात. "विद्या-विलास" नांवाचें दैनिक पूर्वी कोल्हापुरांत बरींच वर्षें प्रसिद्ध होत असे, पण अलिकडे तें बंद पडलें आहे.

कोल्हापूर शहरांत व जिल्ह्यांत प्रसिद्ध होणारीं निरनिराळीं इतर नियतकालिकें पुढील प्रमाणें आहेत.

साप्ताहिकाचें नांव

(१) लोकसेवक (२) गर्जना (३) नवसंदेश (४) राष्ट्रप्रगति (५) जयशिवराय (६) धूमकेतू (७) दिव्यप्रसाद (८) कोल्हापूर समाचार (९) किसान (इचलकरंजी) (१०) रंजन (सिनेविषयक) (११) ललकार (कोल्हापूर व सांगली) (१२) प्रजा (१३) समाजवाद (निमशिरगांव, ता. शिरोळ (१४) सावधान (१५) द्विसाप्ताहिक तरुण भारत (चंदगड) (१६) रयत मासिक (१७) उटकर

पंचायत राज्य

दिनांक १ मे, १९६२ पासून " महाराष्ट्रांत लोकशाही विकेंद्रीकरण कायदा अंमलांत आला असून त्यानुसार लवकरच जिल्हा परिषदांच्या निवडणुका होतील. ही घटना महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनांत मोठें परिवर्तन घडवून आणणारी आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागांतील आजचें जीवन आणि १५ वर्षापूर्वीचें जीवन यांत बराच मोठा फरक पडला आहे. सर्वसामान्य शेतकरी आतां विकास कार्याविषयीं जागरुक होत असल्यामुळें परिणामतः राजकीय दृष्टयाहि जागृत होत चालला आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांची आणि कामकऱ्यांची अस्मिता जागृत झाली आहे आणि म्हणूनच, या जागृत नवीन पिढीच्या आकांक्षा पूर्ण करणारा लोकशाही विकेंद्रीकरणाचा हा धाडसी प्रयोग करण्यांत येत आहे.

लोकशाही विकेंद्रीकरणाची नवी योजना, हें योग्य दिशेनें धैर्यानें टाकलेलें पाऊल असून जिल्हा हा या योजनेचा मूलभूत घटक होय. बलवंतराय मेहता समितीनें सुचविल्याप्रमाणें तालुका हें मूलभूत विकास क्षेत्र न स्वीकारण्यास कांहीं कारणें आहेत. पहिले कारण असें कीं लोकल बोर्डस्, स्कूल बोर्डस्, विकास मंडळें इत्यादि स्थानिक स्वरूपाच्या संस्था आजवर जिल्हा पातळीवर काम करीत आल्या आहेत तेव्हां या नवीन योजनेचा सांगाडा उभारण्यासाठीं, या परंपरेचा भक्कम आधार घेणें हितावह आणि सोयीचें ठरणार आहे. जनतेला संस्थांचा विचार जिल्हा पातळीवरून करण्याची संवय जडली आहे. तिचाच उपयोग करणें इष्ट होईल. दुसरें असें कीं, " जिल्हा " हाच घटक मानला तर स्थानिक नेतृत्वाच्या वाढीला पुरेसा वाव मिळेल. तिसरें म्हणजे योजनाबद्ध कार्यक्रम अंमलांत आणण्याच्या मार्गात, लहान घटकामुळें अनेक अडचणी उपस्थित होण्याची शक्यता आहे. शिवाय साधनसामग्री, निरनिराळया कार्यातील एकसूत्रीपणा, कर्मचारी आणि कामगार इत्यादि बाबतींत जिल्हा हेंच अत्यंत सोयिस्कर क्षेत्र आहे.

बलवंतराय समितीच्या अहवालांत अप्रत्यक्ष निवडणुकीची कल्पना मांडण्यांत आली असली तरी आपल्या राज्यांत जिल्हा परिषदा प्रत्यक्ष मतदानानें निवडल्या जाणार आहेत. कारण अप्रत्यक्ष निवणुकांबाबत लोकांना पुरेसा उत्साह वाटणार नाहीं. त्यामुळें एकदा ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या कीं, मग लोकांचा जिल्हा परिषदांशीं तसा प्रत्यक्ष संबंध उरणार नाहीं. तेव्हां ज्या पातळीवरील संघटनेच्या हातीं खरी सत्ता असेल, त्या संघटनेच्या निवडणुका प्रत्यक्ष मतदानानेंच व्हावयास पाहिजे. म्हणून जिल्हा परिषदांच्या निवडणुका प्रत्यक्ष होणें श्रेयस्कर आहे.

विकास गटाचा अध्यक्ष, जिल्हा सहकारी संघटनेचा प्रमुख व इतर अशाच प्रकारच्या संघटनांचे प्रमुख जिल्हा परिषदांचे सभासद राहणार असले तरी प्रत्यक्ष निवडणुका लढविण्याची गरज नाहीं. त्यांची निवड अप्रत्यक्षरीत्या होईल.

जिल्हाधिकाऱ्यांचें कार्यक्षेत्र परिषद कार्यापासून अलग ठेवण्यांत आलेले आहे. जिल्हाधिकाऱ्यांचा परिषदेशीं संबंध येतो तो केवळ परिषदेचे नोकर निवडण्यासाठीं असलेल्या समितीचे सदस्य या

नात्यानें; पण त्यामुळें जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाचें महत्त्व संपुष्टांत येईल असें मानण्याचें कारण नाहीं- कारण जिल्हाधिकाऱ्याला अन्य अनेक प्रकारचीं कामें जबाबदारीनें पार पाडावयाचीं असून त्या दृष्टीनें त्याला भरीव अधिकारहि देण्यांत आलेले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकाराचें व कार्यक्षेत्राचें स्थूल-मानानें पुढील स्वरुप राहील.

राज्य सरकारच्या आदेशानुसार जिल्हाधिकाऱ्याला जिल्हा परिषदेच्या कामकाजासंबंधीं कोणतीहि माहिती अगर आंकडेवारी मागविण्याचा अधिकार आहे.

जिल्हा परिषद अगर पंचायत समिती यांच्या ठरावाच्या अंमल बजावणीनें अगर अन्य कोणत्याही आदेशामुळें शांतताभंग होईल, अगर जनतेस त्यामुळें त्रास होईल असें जिल्हाधिकाऱ्याचें मत असलें तर आपल्या लेखी आदेशानें अशी अंमलबजावणी स्थगित करण्याचा त्याला अधिकार आहे. मात्र या आदेशाची प्रत संबंधित परिषद व कमिशनर यांच्याकडे पाठविली पाहिजे. कमिशनरना सदर आदेशांत जरुर तो फेरफार करण्याचा अधिकार आहे.

निकडीच्या प्रसंगी सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितता याबाबतींत कांहीं विशेष असाधारण काम पार पाडणें असल्यास ती बाब परिषदेच्या कक्षेंतील असली तरी जिल्हाधिकाऱ्याला त्या संबंधी जरुर ती व्यवस्था करण्याचा अधिकार आहे व यासाठीं होणारा खर्च अगर द्यावयाच्या मेहनताना परिषदेनें देण्याची सूचना करण्याचा जिल्हाधिकाऱ्याला अधिकार आहे.

जिल्हा परिषदेच्या कार्यासाठीं घ्यावयाच्या नोकरांची निवड करण्यासाठीं या कायद्यान्वयें अस्तित्वांत येणाऱ्या समितीवर जिल्हाधिकारी पदसिद्ध सभासद आहेत.

जिल्ह्यांतील कायदा व सुव्यवस्था पालनाची जबाबदारी सर्वस्वी जिल्हाधिकाऱ्यांची आहे.

लोकशाही विकेंद्रीकरण कायदा अंमलांत आल्यापासून म्हणजेच १ मे, १९६२ पासून आपल्या राज्यांतील प्रत्येक जिल्ह्यांत जिल्हा परिषदेची स्थापना करण्यांत आली आहे. या परिषदेवरील प्रतिनिधी जनतेनें निवडून द्यावयाचे असून जास्तीत जास्त ३५,००० लोकसंख्येला एक या प्रमाणांत हे प्रतिनिधी निवडले जातील. या परिषदेत प्रतिनिधींची संख्या जास्तींत जास्त साठ आणि कमीत कमी चाळीस राहील. त्यांत एक स्त्री प्रतिनिधी (सभासद), अनुसूचित जाति आणि संयुक्त सहकारी संस्थेचे अध्यक्ष हे सहयोगी सभासद म्हणून राहतील.

ही परिषद जिल्ह्यांतील विकास कार्याबावत पूर्ण जबाबदार राहणार आहे. आणि म्हणून परिषदेच्या स्थायी समितीत अर्थसमिति, बांधकाम समिति, कृषी समिति, सहकार समिति, शिक्षण समिति आणि आरोग्य समिति अशा अनेक समित्या असतील. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष राहतील.

जिल्हा परिषदेसाठीं एक मुख्य कार्यकारी अधिकारी आणि दुसरा उपमुख्य अधिकारी यांची नियुक्ती राज्य शासनाकडून करण्यांत आली आहे.

जिल्ह्यांतील प्रत्येक गटासाठीं पंचायत समिति असेल आणि ती लोकांनीं निवडून द्यायची आहे. या समितीनें निवडून आलेले सभासद, एक स्वीकृत सभासद, शेतकी सहकारी संस्थेचे अध्यक्ष, गटांतील स्त्रिया, अनुसूचित जाति आणि जमाति यांचा प्रतिनिधी समितींत निवडून आलेला नसल्यास प्रत्येकीं एक आणि पंचायतीच्या सभासदांनीं निवडून दिलेले दोन सरपंच इतके सदस्य असतील.

पंचायत समितीसाठीं एक गटविकास अधिकाऱ्यांची नेमणूक झाली आहे. गटविकास अधिकारी हा पंचायत समितीचा पदसिद्ध चिटणीस असेल. पंचायत समितीचे सभापति आणि उपसभापति सभासदांनीं निवडून द्यायचे आहेत.

जिल्हा परिषदेवर कोणत्याहि विकास कार्याची अंमलबजावणी अगर देखभाल करण्याची जबाबदारी सोपविण्यांत येईल आणि जिल्हा परिषद शासनाचे या बाबतींत एजन्ट म्हणून काम पाहील. जिल्हा परिषद शक्यतो सर्व कामें पंचायत समित्या द्वारें पार पाडील. कांहीं ठराविक कामें पंचायत समित्यांमार्फतच पार पाडलीं जातील. जिल्हा परिषदेकडे पुढील कामें सोपविण्यांत आलीं आहेत.

शेतकी

शेतकी शाळा स्थापन करणें, त्यांची व्यवस्था ठेवणें, त्या सुस्थितींत राखणें आणि त्यांना अनुदानें देणें (सहाय्यित शेतकी शाळांना अनुदान देणें या बाबी समाविष्ट करून) परंतु त्यांत पुढील गोष्टींचा समावेश होणार नाहीं:–

(एक) अभ्यासक्रम ठरवून देणें.
(दोन) पाठ्य पुस्तकें विहित करणें,
(तीन) शेतकी शाळांची तपासणी, आणि;
(चार) वार्षिक परीक्षा घेणें.

पीक स्पर्धा.

पीक संरक्षण.

पीक मोहिमा (खरीप आणि रब्बी पिकांच्या मोहिमा आणि प्रकृष्ट भात शेतीची लागवड धरून.)

मिश्र खतें व स्थानिक खतें.

रासायनिक खतें, शेतीचीं अवजारें आणि शेतीसाठीं लागणारें लोखंड, पोलाद आणि सीमेंट यांचें वांटप.

सुधारलेल्या शेतीपद्धतीचें प्रात्यक्षिक.

दुय्यम बीज केंद्रांचें आदर्श प्रात्यक्षिक.

सुधारलेल्या बियाणांचीं आयात व वांटप.

गुदामें बांधणें आणि त्यांची व्यवस्था ठेवणें.

शेतीचीं प्रगति व सुधारणा.

घातक वनस्पतींचा नाश करणें.

अन्यस्थानीय झाडें लावून तीं आपल्या प्रदेशांत वाढविणें.

पशुसंवर्धन

पशु वैद्यकीय सहाय्य. (जिल्ह्यांतील गुरांचीं रुग्णालयें वगळून परंतु गुरांचे दवाखाने, पशु-वैद्यकीय सहाय्य केंद्रें आणि खेड्यांतील पशुवैद्यकीय पेटचा समाविष्ट करून.)

गुरांच्या, घोड्यांच्या आणि इतर पशुधनाच्या पैदाशीची सुधारणा (यांत कृत्रिम रेतन उप-केंद्रें, प्रमुख ग्राम केंद्रें, वळू बैलांचीं प्रमुख केंद्रें, वैरण सुधारण्याच्या जागा, वैरण मुरावयाचे खड्डे, तालुका आणि जिल्हा पशुधन सुधारणा संघ व इतर तत्सम संस्था स्थापणें आणि मेंढ्यांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वांटप यांचा समावेश होतो.

सुधारलेल्या कोंबड्या पुरविणें. .

गुरांचीं प्रदर्शनें व मेळावे भरविणें.

जंगलें

गांवजंगलें व कुरणें (यांत कुरणाच्या व जळण कारणांकरितां गांवजंगलांचा विकास करावयाच्या उपाययोजनांचा समावेश होतो.)

समाज कल्याण

मागासलेल्या वर्गांचा शैक्षणिक विकास–यांत पुढील बाबींसंबंधीच्या उपाययोजनांचा समावेश होतो :

मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, नादाऱ्या व परीक्षेची फी देणें, आणि

मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांकरितां वसतिगृहें आणि शाळा स्थापन करणें आणि त्यांची व्यवस्था ठेवणें. यांत वसतिगृहांचें बांधकाम आणि त्यांची व्यवस्था करणें यासाठीं सहाय्यित वसतिगृहांस अनुदानें देण्याचा आणि अशा वसतिगृहांस आणि शाळांस इतर सहाय्य देण्याचा समावेश होतो. परंतु त्यांतून जिल्ह्यापेक्षां अधिक क्षेत्रासाठींचीं वसतिगृहें वगळण्यांत येतील.

मागासलेल्या वर्गांचा आर्थिक विकास, यांत पुढील बाबींचा समावेश होतो:–

शेतीची साधनसामग्री खरेदी करण्यासाठीं व्यक्तिशः शेतकऱ्यांस कर्जाच्या व अर्थ-सहाय्याच्या स्वरूपांत आर्थिक सहाय्य देणें;

कुटीरोद्योग आणि उद्योगधंदे यासाठीं व्यक्तिशः कारागिरांस कर्जाच्या व अर्थ सहाय्याच्या स्वरूपांत आर्थिक साहाय्य देणें;

विमुक्त जातींना चरखे पुरविणें.

मागासलेल्या क्षेत्रांत दळणवळणाचा विकास करणें;

सहकारी स्टोअर्सची व्यवस्था ठेवणें आणि कर्मचाऱ्यांच्या व्यवस्थेसाठीं बहुउद्देशीय सहकारी संस्थांस अर्थ सहाय्य देणें (ज्यांचें खेळतें भांडवल, प्रत्येकीं पांच लाख रुपयांहून अधिक नाहीं आणि ज्यांचें अधिकार क्षेत्र जिल्ह्यापेक्षां कमी आहे अशा सहकारी संस्थांशीं संबंध येत असेल तेथवर);

हस्तव्यवसायाच्या केंद्रांची स्थापना करणें ; आणि गुरांच्या पैदाशीचा आणि कुक्कुटप्रजनन केंद्राचा विकास.

अस्पृश्यतेचें निवारण-यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो :–

हरिजन सप्ताह साजरे करणें;

झुणका–भाकर कार्यक्रम;

सवर्ण हिंदु आणि हरिजन यांच्यांतील आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देणें; आणि

अस्पृश्यता निवारणासाठीं उत्कृष्ट काम करणाऱ्या खेड्यांस बक्षिसें देणें.

मागासलेल्या वर्गाच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम, यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो:–

महिलांच्या आणि बालकांच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम व योजना;

बालवाड्यांची स्थापना करणें व त्यांची व्यवस्था ठेवणें;

मागासलेल्या वर्गाच्या विकासासाठीं प्रचार व प्रसिद्धि सुरू करणें;

मागासलेल्या वर्गासाठीं करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणें.

सामाजिक मेळे भरविणें;

मागासलेल्या वर्गासाठीं संस्कार केंद्रे, सामूहिक व करमणुकीचीं केंद्रें आणि सामूहिक सभागृहें.

विमुक्त जातींना कपडे पुरविणें.

औषधी खरेदी करण्यासाठीं व्यक्तींना आर्थिक-सहाय्य देणें आणि स्वतः होऊन मदत देऊं केलेल्या संस्थांना, वैद्यकीय मदत देण्यासाठीं, अनुदानें देणें;

मागासलेल्या वर्गाच्या इसमांसाठीं घरांची तरतूद करणें; आणि

पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची तरतूद करणें;

मागासलेल्या वर्गाचें प्रशिक्षण, यांत पुढील बाबींचा समावेश होतो:—

प्रशिक्षण शिबिरांचें आयोजन करणें; आणि

तांत्रिक प्रशिक्षण आणि पारंपारिक व्यवसायांच्या सुधारलेल्या पद्धतींचें प्रशिक्षण

शिक्षण

प्राथमिक शाळांची आणि मूलोद्योग शाळांची स्थापना, व्यवस्था, त्या सुस्थितींत ठेवणें, त्यांची तपासणी करणें आणि त्यांना भेटी देणें, सहाय्यित शाळांना अनुदानें देणें, समाविष्ट करून पुढील गोष्टीं-संबंधीच्या बाबी वगळून :—

अभ्यासक्रम ठरवून देणें;

पाठ्य पुस्तकें ठरविणें.

शिष्यवृत्त्या देण्यासाठीं परीक्षा घेणें;

विदर्भातील प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा आणि चौथ्या वर्गाच्या परीक्षा घेणें; आणि

मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७, अन्वयें राज्य सरकारकडे निहित केलेले इतर अधिकार.

माध्यमिक शाळांची स्थापना, त्या सुस्थितींत ठेवणें, त्यांची तपासणी करणें आणि त्यांना भेटी देणें, परंतु त्यांतून पुढील गोष्टी वगळण्यांत आल्या पाहिजेत :—

अभ्यासक्रम ठरविणें;

पाठ्य-पुस्तकें ठरविणें;

परिक्षण अनुदानाचे दर आणि त्यासाठींच्या शर्ती;

उच्च शाळांचें उच्चतर माध्यमिक शाळांत रूपांतर करण्यासाठीं परवानगी देणें;

फीचे दर;

मान्यतेच्या सर्वसाधारण शर्ती ठरविणें;

प्राथमिक आणि उच्च शाळांच्या शिष्यवृत्तीसाठीं परीक्षा घेणें; आणि

सहाय्यक-अनुदान-संहितेनुसार, शिक्षण-संचालकांकडे विशेषरीत्या सोंपविण्यांत किंवा राज्य सरकारांकरितां राखून ठेवण्यांत येतील असे इतर अधिकार.

खाजगी माध्यमिक शाळांच्या बाबतींत, अनुदानें व कर्जें याबाबत केवळ शिफारस करणें आणि शिक्षणसंचालकांची मंजुरी मिळाल्यानंतर त्यांचें वांटप करणें.

प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या संबंधांत विद्यार्थ्यांस कर्जें आणि शिष्यवृत्त्या देणें.

माध्यमिक शाळांच्या इमारती बांधणें आणि त्या सुस्थितींत ठेवणें.

इतर शैक्षणिक उद्दिष्टें.

शाळांसाठीं साधनसामग्री व क्रीडांगणें यांची तरतूद करणें.

वैद्यकीय

तालुका दवाखाने आणि तालुका दवाखान्यांच्या दर्जांत वाढ करणें.

सिव्हिल आणि कॉटेज रुग्णालयें, त्याचप्रमाणें सिव्हिल रुग्णालयाप्रमाणें असलेलीं इतर मोठीं

सरकारी रुग्णालयें वगळून इतर रुग्णालयें.
वैद्यक व्यवसायींची अर्थ-सहाय्यित केंद्रें.
ग्रामीण वैद्यकीय मदत केंद्रें आणि सार्वजनिक वैद्यकीय मदत.
पिसाळलेली कुत्रीं चावल्यानंतर, निर्धन इसमावर त्यासाठीं प्रतिबंधक असा इलाज करणाऱ्या संस्थांना आर्थिक-सहाय्य देणें.
खाजगी धर्मार्थ रुग्णालयें, औषधालयें, प्रसूतिगृहें आणि तत्सम इतर संस्था.

आयुर्वेद

आयुर्वेदिक व युनानी दवाखाने (यांत अशा दवाखान्यांना अनुदानें देण्याचा समावेश होतो.)
खेडयांतील आयुर्वेदिक औषधांच्या पेटयांतील औषधांचा सांठा पुन्हां भरून काढणें.

सार्वजनिक आरोग्य

प्राथमिक आरोग्य केंद्रें.
फिरती आरोग्य पथकें.
वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यासाठींची एकत्रित पथकें.
देवीप्रतिबंधक लस टोचणें.
शालेय आरोग्य सेवा.
' यॉज ' रोगाविरुद्ध उपचारासाठीं उपाययोजना.
प्रसूति व शिशुकल्याण केंद्रें.
खेडयांत औषधी पेटया ठेवणें.
आरोग्य शिक्षणासाठीं सोयी.
ग्रामीण साफसफाई.
सार्वजनिक आरोग्य रक्षणासाठीं आवश्यक ती उपाययोजना करणें.
गलिच्छ वस्त्यांचें पुनर्वसन (त्या कारणांसाठीं खाजगी व्यक्तीस किंवा संस्थांस कर्जें देण्याचा समावेश करून.)

इमारती व दळणवळण

ग्रामीण रस्ते;
इतर जिल्हा रस्ते;
प्रमुख जिल्हा रस्ते; आणि
वरील रस्त्यांवरील पूल;
यांचें बांधकाम, ते सुस्थितींत राखणें व त्यांची दुरुस्ती.
ग्रामीण उद्यानें आणि बगीचे (राष्ट्रीय उद्यानें आणि बगीचे वगळून.)
जिल्हा परिषदेच्या गरजांच्या संबंधांतील प्रशासनविषयक आणि इतर इमारतींचें बांधकाम.
रस्त्यांव्यतिरिक्त दळणवळणाचीं इतर साधनें.
सार्वजनिक नावा.
रस्त्याच्या आजूबाजूला झाडें लावणें.
छोटे लोहमार्ग व ट्रामचे मार्ग.
टेलिफोन लाईन्स.

सार्वजनिक आरोग्यविषयक इंजीनियरिंगचीं कामें

ग्रामीण पाणीपुरवठा
ग्रामीण विभागांतील जत्रांसाठीं सुरक्षित पाणीपुरवठा.
ग्रामीण गटारें.
पिण्यासाठीं, स्नानासाठीं किंवा स्वयंपाकासाठीं लागणारें पाणी दूषित होऊं नये म्हणून त्याचें संरक्षण करण्यासाठीं बांधकाम.

(प्रत्येक बाबतींत पांच लाख रुपयांहून अधिक भांडवली खर्चाच्या योजना वगळून)

पाटबंधारे

छोटी पाटबंधाऱ्यांचीं कामें [प्रत्येकीं २५० एकर किंवा त्याहून कमी एकर (जमीन) भिजविणारीं जलसिंचनाचीं कामें.]

उद्योगधंदे व कुटीरउद्योग

स्थानिक उद्योगधंदे
स्थानिक कला.

(कुटीरोद्योग व लहान प्रमाणावरील उद्योगधंदे यांचे बाबतींत दहा हजार रुपयांपर्यंतचीं कर्जें मंजूर करण्याच्या मर्यादेपर्यंत.)

जिल्ह्यापेक्षां मोठ्या असलेल्या क्षेत्रासाठीं असलेल्या संशोधन संस्था आणि संस्था वगळून प्रशिक्षण संस्था आणि शाळा.
प्रशिक्षण–उत्पादन केंद्रें आणि उत्पादन केंद्रें.
विक्री भांडारें व विक्रीचीं दुकानें.
वैयक्तिकरीत्या कारागीरांस सहायक अनुदानें व कर्जें देणें.
प्रशिक्षण घेणारांस विद्यावेतनें देणें.
कुटीर उद्योग आणि ग्रामोद्योग यांची वाढ व विकास.
कुटीर उद्योग किंवा ग्रामोद्योग यांतील उत्पादनासाठीं विक्रीच्या सोयी उपलब्ध करून देणें.
औद्योगिक संस्थांस सहाय्यक अनुदानें व कर्जें देणें.
हातमाग.
वजनें व मापें अधिनियम यांच्या अंमलबजावणीशीं संबंधित असलेलें अंमल-बजावणीचें काम.

सहकार

सहकारी संस्थांची नोंदणी (ज्या संस्थांचें खेळतें भांडवल पांच लाख रुपयांहून अधिक नसेल आणि ज्यांचें अधिकारक्षेत्र एका जिल्ह्यापेक्षां कमी आहे, केवळ अशाच संस्थांच्या बाबतींत.)

वरील नोंद ७५ मध्यें निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या संस्थांच्या उपविधींस मंजूरी.

वरील नोंद ७५ मध्यें निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या संस्थाचे सदस्य होण्यास प्रवेश न मिळाल्यामुळें केलेलीं अपीलें.

सहकारी संस्थांवरील, प्रशासनविषयक देखरेख (केवळ संस्थांनीं आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांनीं अंगिकारलेला, व्यापाराचा दर्जा सुधारण्याच्या तसेंच त्याच्या कामांची व्याप्ति वाढण्याच्या दृष्टीनें संस्थांचें सर्वसाधारण कामकाज, त्यांची व्यवस्था आणि त्यांची आर्थिक परिस्थिति यांची तपासणी करण्याच्या मर्यादेपर्यंतच.)

(टीपः– नोंदी ७५, ७६, ७७ आणि ७८ मध्यें दिलेलीं वरील कामें, जिल्हा परिषदेखालीं काम करणाऱ्या सहाय्यक रजिस्ट्रारनें, सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारनें केलेले नमुनेवजा उपविधी आणि काढलेल्या सूचना यानुसार पार पाडावयाचीं आहेत. जेव्हां एखाद्या नवीन प्रकारच्या सहकारी संस्थेची नोंदणी

करावयाची असेल व तिच्यासाठीं नमुनेवजा उपविधि उपलब्ध नसतील तेव्हां तिचे उपविधि, अशा संस्थांची नोंदणी करण्यापूर्वी सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारकडून प्रथम संमत करून घेतले पाहिजेत.)

सहकारी संस्थांची वाढ आणि व्याप्ति वाढविणें (सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या बाबतींत.)

राज्य सरकारकडून आर्थिक-साहाय्य मिळण्यासाठीं सहकारी संस्थांच्या अर्जाचें प्रवर्तन करणें.

शेअर भांडवलांत सहभागी होण्याच्या बाबतींत सहकारी संस्थांचें (सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारकडून निर्दिष्ट करण्यांत येतील अशा) अर्जाचें, संयुक्त संस्थांकडे प्रवर्तक करणें.

ज्या बाबतींत, सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारनें घालून दिलेले शर्तीस अधीन राहून राज्य सरकार शेअर घेऊं शकते त्या बाबतींत सहकारी संस्थांचे शेअर घेणें.

शेतीच्या उत्पन्नाच्या बाजारांवरील देखरेख व नियंत्रण (हें देखरेखीचें व नियंत्रणाचें काम केवळ जिल्हा पातळीवरीलच असेल)

प्रकाशन

फिरत्या प्रकाशन गाड्या.

जिल्हा प्रदर्शनें आयोजित करणें.

करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारें प्रसिद्धि.

ग्रामीण विभागासाठीं नभोवाणीचे कार्यक्रम.

सामूहिक विकास

सामूहिक विकास कार्यक्रम.

स्थानिक विकास कामांचा कार्यक्रम.

समाज शिक्षण

सामूहिक मनोरंजन केंद्रें.

प्रौढ साक्षरता केंद्रें.

क्रीडा, खेळ, क्रीडांगणें, सामग्री, इत्यादि आणि कल्याणकारी संघटना.

किसान मेळे.

बाहेरील भागांना भेटी देण्याचा कार्यक्रम आंखणें.

माहिती वितरण.

अल्पमुदतीचीं शिबिरें.

महिला संघटना व कल्याण.

शिशु–संघटना व कल्याण.

फिरत्या चित्रपट गाड्या.

ग्रंथालय आणि वाचनालयें.

जत्रा, देखावे आणि प्रदर्शन.

ग्रामीण घर बांधणी.

ग्रामीण घर बांधणी.

संकीर्ण

ग्रामोद्धार.

आदर्श गांवें वसविणें (त्यासाठींची अनुदानें आणि कर्जें धरून.)

खेड्यांचें आर्थिक कल्याण.

लोकांचें आरोग्य सुरक्षितता, सुख किंवा सोय यांची ज्यामुळें वाढ होण्याचा संभव आहे अशी स्थानिक स्वरूपाचीं कामें.

बाजार.

धर्मशाळा, विश्रामगृहें, मुशाफिरखाने, सराई वगैरे.

चावड्या.

इतर सार्वजनिक संस्था.

औद्योगिक बेकारी वगळून (इतर) स्थानिक बेकारी.

गांवठाणांची सुधारणा करणें व तीं वाढविणें (त्या कारणासाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्जें धरून.)

नवीन गांवठाणें वसविणें (त्या कारणांसाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्जें धरून.)

जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचें स्वास्थ्य.

जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांसाठीं घरांची तरतूद.

सार्वजनिक जागांत आणि उद्यानांत झाडें लावणें व त्यांची जोपासना करणें.

रानटी जनावरांचा नाश करण्याबाबत बक्षिसें.

जाहीर सत्कार, समारंभ आणि मनोरंजन.

स्थानिक यात्रांबाबत व्यवस्था करणें.

दफन भूमि व दहन भूमि (प्रेतांची विल्हेवाट लावण्याचें काम धरून.)

ग्राम पंचायतीचे पंच, सरपंच, आणि बिनसरकारी इसम यांचीं संमेलनें.

स्थानिक भटक्या गरीब लोकांसाठीं मदत.

गरीबांसाठीं घरांची व्यवस्था करणें.

गटयादी

ही कामें पंचायत समितीच्या अधिकार क्षेत्रांतील

शेतकी

खरीप व रबी पीक मोहिमा;

प्रकृष्ट भातशेतीची लागवड;

शेतीची प्रगति व सुधारणा;

सुधारलेल्या शेतीपद्धतीचें प्रात्यक्षिक व त्याबाबत प्रचार करणें आणि नमुनेदार शेतकीच्या संस्था स्थापन करणें व त्या सुस्थितींत ठेवणें.

शेतीविषयक सुधारलेल्या अवजारांचा प्रचार करणें;

फळें व भाजीपाला यांच्या उत्पादनांत वाढ करणें.

गुदामें बांधणें व त्यांची व्यवस्था ठेवणें;

रासायनिक खतें, शेतीचीं अवजारें व शेतीसाठीं लागणारें लोखंड, पोलाद व सिमेंट यांचें वांटप करणें.

पशु संवर्धन

खेड्यांतील पशुवैद्यकीय पेट्या;

पशु वैद्यकीय साहाय्य केंद्रें;

तालुका पशुधन सुधारणा संघ व तशाच प्रकारची संस्था स्थापन करणें.

वैरण सुधारण्याच्या जागा;
वैरण मुरवावयाचे खड्डे;
कोंबड्यांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वांटप;
मेंढ्यांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वांटप;
गुराढोरांचीं प्रदर्शनें व मेळावे भरविणें;

जंगले

गांव जंगलें व कुरणें. (चांगल्या प्रतीचें गवत उगविणें या गोष्टींचा समावेश करून);
कुरण व जळण यांच्या कारणासाठीं गांव शिवारांच्या विकासासाठीं उपाय योजना;

समाज कल्याण

मागासलेल्या वर्गांचा आर्थिक विकास, यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो:–
शेतीची साधनसामुग्री खरेदी करण्यासाठीं कर्जे व अर्थसहाय्य यांच्या रूपानें व्यक्तिशः शेतकऱ्यास आर्थिक साहाय्य देणें;
कुटीरोद्योग व व्यवसाय यांसाठीं कर्जे व अर्थ सहाय्य यांच्या रूपानें व्यक्तिशः कारागिरांना आर्थिक साहाय्य देणें.
विमुक्त जातींना चरखे पुरविणें;
हस्तव्यवसाय केंद्रांची स्थापना करणें;
अस्पृश्यता निवारण, यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो :–
हरिजन सप्ताह साजरे करणें;
सवर्ण हिंदु व हरिजन यांच्यांतील आंतरजातीय विवाहांस प्रोत्साहन देणें; आणि
मागासलेल्या वर्गाच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम, यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो:–
महिलांच्या व बालकांच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम व योजना;
बालवाड्यांची स्थापना करणें व त्यांची व्यवस्था ठेवणें;
मागासलेल्या वर्गाच्या विकासासाठीं प्रचार व अशा कार्यक्रमास प्रसिद्धी देणें;
मागासलेल्या वर्गांसाठीं करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणें;
सामाजिक मेळे भरविणें;
मागासलेल्या वर्गांसाठीं संस्कार केंद्रें, सामूहिक व करमणुकीची केन्द्रे आणि सामूहिक सभागृहें;
विमुक्त जातींना कपडे पुरविणें;
औषधे खरेदी करण्यासाठीं व्यक्तींना आर्थिक साहाय्य देणें आणि स्वतःहून मदत देऊं केलेल्या संस्थांना वैद्यकीय मदत देण्यासाठीं अनुदानें देणें;
मागासलेल्या वर्गाच्या इसमांसाठीं घरांची तरतूद करणें; आणि
पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची तरतूद करणें.

शिक्षण

प्राथमिक शाळेच्या इमारती बांधणें व त्या सुस्थितींत ठेवणें.
प्राथमिक शाळांसाठीं साहित्य व खेळाची मैदानें यांची तरतूद करणें.

वैद्यकीय

वैद्यक व्यवसायींची अर्थ सहाय्यित केंद्रें;
ग्रामीण वैद्यकीय मदत केंद्रें;

आयुर्वेद

खेड्यांतील आयुर्वेदिक औषधांच्या पेट्यांतील औषधांचा सांठा पुन्हा भरून काढणें

सार्वजनिक आरोग्य

प्रसूति व शिशुकल्याण केंद्रें;
खेड्यांत औषधी पेट्या ठेवणें;
ग्रामीण साफसफाई;
सार्वजनिक आरोग्य रक्षणासाठीं आवश्यक ती उपाययोजना करणें;

इमारती व दळणवळण

ग्रामीण रस्ते बांधणें, ते सुस्थितींत ठेवणें व त्यांच्या दुरुस्त्या;
ग्रामीण रस्त्यावर पूल व नाले बांधणें;
सार्वजनिक (तरी) नावा.
रस्त्यांच्या आजूबाजूस झाडें लावणें;

सार्वजनिक आरोग्यविषयक इंजिनीअरींगची कामें

ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या विहिरी;
गावांत जमिनीच्या पृष्ठभागांवर गटारे बांधणें.

कुटीरोद्योग

वैयक्तिकरीत्या कारागीरांस सहाय्यक अनुदानें व कर्जें देणें;
कुटीरोद्योग व ग्रामोद्योग यांची वाढ व विकास;

सहकार

सहकारी चळवळीची वाढ करणें व तिची व्याप्ति वाढविणें;

प्रकाशन

ग्रामीण नभोवाणी कार्यक्रम;
करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारें प्रसिद्धी;

सामाजिक विकास

समाज विकास कार्यक्रम;
स्थानिक विकास कामांचा कार्यक्रम.

समाजशिक्षण

समाज मनोरंजन केंद्रें;
प्रौढ साक्षरता केंद्रें;
क्रीडा, खेळ, क्रीडांगणें, सामुग्री आणि कल्याणकारी संघटना;
शेतकऱ्यांचे मेळावे;
बाहेरील भागांना भेटी देण्याचा कार्यक्रम आंखणें;
माहिती वितरण;
अल्पमुदतीचीं शिबिरें;
महिला संघटना व कल्याण;
शिशु संघटना व कल्याण;

फिरत्या चित्रपट गाड्या;
ग्रंथालयें व वाचनालयें;
ग्रंथालयें व वाचनालयें;
जत्रा, देखावे व प्रदर्शनें;

संकीर्ण

ग्रामीण घर बांधणी;
ग्रामोद्धार;
आदर्श गांवे बसविणें (त्यासाठींची अनुदानें व कर्जें धरून);
खेड्यांचे आर्थिक कल्याण;
लोकांचें आरोग्य, सुरक्षितता, सुख किंवा सोय यांची ज्यामुळें वाढ होण्याचा संभव आहे अशी स्थानिक स्वरूपाचीं कामें;
बाजार;
धर्मशाळा, विश्रांतिगृहें, मुशाफिरखाने, सराई वगैरे;
चावड्या;
इतर सार्वजनिक संस्था;
औद्योगिक बेकारी वगळून इतर स्थानिक बेकारी;
गांवठाणाची सुधारणा करणें व ती वाढविणें (त्यासाठीं द्यावयाची अनुदानें व कर्जें धरून.)
नवीन गांवठाण वसविणें (त्यासाठीं द्यावयाची अनुदानें व कर्जें धरून) •
सार्वजनिक जागा व बागा यामध्यें झाडे लावणें व त्यांची जोपासना करणें;
रानटी जनावरांचा नाश करण्याबाबत बक्षिसे
जाहीर सत्कार व समारंभ आणि मनोरंजन
स्थानिक यात्रांबाबत व्यवस्था करणें
ग्रामपंचायतींचे पंच, सरपंच व बिन-सरकारी इसम यांची संमेलनें;
स्थानिक भटक्या गरीब लोकांसाठीं मदत ;
गरीबांसाठीं घरांची व्यवस्था करणें.

४०३